एकमेका साह्य करू ।
अवघे धरू सुपंथ ।।

आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित

# बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव

(आयडेंटी फिकेशन नं. पी.यु./पी.एन./अे.सी./०७६/१९८९)

ता.आंबेगाव, जि.पुणे ४१२४०८

2021-22

आज़ादी का अमृत महोत्सव

# युवातरंग

२०२१-२२



प्राचार्य डॉ.इंद्रजित भाऊराव जाधव यांच्या सेवापूर्ती निमित्त सत्कार करताना
राज्याचे गृहमंत्री मा.ना.दिलीपरावजी वळसे पाटील साहेब, समवेत संस्थेचे मान्यवर.




पंचायत समिती, आरोग्य विभाग, घोडेगाव यांनी आयोजित केलेल्या मोफत लसीकरण कार्यक्रम प्रसंगी
संस्थेचे अध्यक्ष श्री.सुरेशशेठ भिमाजीशेठ काळे, सोबत इतर मान्यवर



ड्रोनद्वारे टिपलेले महाविद्यालयाचे एक दृष्य

पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय (O.T.S.P.)
अनुदान योजने अंतर्गत बास्केटबॉलचे
अत्याधुनिक ॲक्रेलिक सिन्थेटीक (मैदान) कोर्ट





महाविद्यालयातील वाणिज्य विभागप्रमुख
प्रा.भागवत माणिकराव पवार यांच्या सेवापूर्तीनिमित्त
त्यांचा सत्कार करताना न्यू इंग्लिश मेडिअम स्कुलचे
चेअरमन मा.श्री.अजित काळे, समवेत इतर मान्यवर

प्राचार्य डॉ.इंद्रजित भाऊराव जाधव यांच्या सेवापूर्तीनिमित्त
संपादित केलेल्या सेवापूर्ती या गौरवग्रंथाचे प्रकाशन करताना
महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री मा.ना.दिलीपराव वळसे पाटील
समेवत इतर मान्यवर






• आमच्या महाविद्यालयाचा निसर्गरम्य परिसर •

एकमेका साह्य करू ।
अवघे धरू सुपंथ ।।

Ambegaon Taluka Vidya Vikas Mandal

# बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव


• घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे ४१२४०८ • दूरध्वनी : (०२१३३) २४४२८२
• ई-मेल : bdkcollege_ghodegaon@rediffmail.com • वेबसाईट : www.bdkalecollege.in




आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित

# बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव

ता.आंबेगाव, जि.पुणे ४१२४०८

- Website : **www.bdkalecollege.in**
- Email : **bdkcollege_ghodegaon@rediffmail.com**

**नियतकालिक संपादक मंडळ**

अध्यक्ष : **प्राचार्य डॉ.इंद्रजित भाऊराव जाधव**

संपादक : **प्रा.डॉ.पुरुषोत्तम दत्तात्रय काळे**

**संपादक मंडळ सदस्य**

**प्रा.डॉ.ज्ञानेश्वर अंबादास वाल्हेकर**
**प्रा.सोमनाथ किसन जगताप**
**प्रा.डॉ.चांगुणा विठ्ठल कदम**
**प्रा.स्वप्निल ज्ञानेश्वर डोके**
**प्रा.अर्चना रामदास औताडे**
**प्रा.पोपट माणिक माने**
**श्री.अशोक गेनभाऊ काळे**

**वितरण व्यवस्था**

**प्रा.कैलास गोरख उंबरे** (ग्रंथपाल)

**श्री.ज्ञानेश्वर गोविंद वायाळ** (ग्रंथपाल परिचर)

**छायाचित्रण सहकार्य**

मेहेर आर्ट - **श्री.संजय मेहेर**

विकास फोटो - **श्री.विकास गाडे**

**प्रकाशक**

**प्राचार्य डॉ.इंद्रजित भाऊराव जाधव**
बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव,
ता.आंबेगाव, जि.पुणे. फोन नं. ०२१३३ - २४४२८२

युवातरंगमध्ये प्रकाशित झालेल्या लेखनाशी संपादक मंडळ
तसेच प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# युवातरंग २०२१-२२

## दि प्रेस अँड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स अॅक्ट

प्रकाशकाचे नाव : **प्राचार्य डॉ.इंद्रजित भाऊराव जाधव**

पत्ता : बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता.आंबेगाव, जि.पुणे ४१२४०८
www.bdkalecollege.in

संपादक : **प्रा.डॉ.पुरुषोत्तम दत्तात्रय काळे**

राष्ट्रीयत्व : **भारतीय**

पत्ता : **बी.डी.काळे महाविद्यालय,** घोडेगाव
ता.आंबेगाव, जि.पुणे ४१२४०८

प्रकाशन काळ : **वार्षिक**

मुद्रकाचे नाव : **प्रिन्ट ओम ऑफसेट,** सातारा

राष्ट्रीयत्व : **भारतीय**

पत्ता : **२६९/२, दौलतनगर, सातारा. फोन नं. ०२१६२-२३४०४९**
printom269@gmail.com

मी प्राचार्य डॉ.इंद्रजित भाऊराव जाधव जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे.

**प्रकाशक : प्राचार्य डॉ.इंद्रजित भाऊराव जाधव**
**बी.डी.काळे महाविद्यालय घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे.** फोन नं. ०२१३३ - २४४२८२
युवातरंगमध्ये प्रकाशित झालेल्या लेखनाशी संपादक मंडळ तसेच प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

॥ एकमेका साह्य करू । अवघे धरू सुपंथ ॥
आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित
**बी.डी.काळे महाविद्यालय,घोडेगाव**

# ॥ स्मृतिगंध ॥

## महाविद्यालय स्थापनेपासूनचे संस्थेचे अध्यक्ष व महाविद्यालयीन व्यवस्थापन समितीचे चेअरमन



**मा.स्व.दत्तात्रय (दादा) कृष्णाजी पाटील काळे**
संस्थापक मा.सचिव व अध्यक्ष
(१९९३ ते २००७)



**मा.स्व.बाळासाहेब (अण्णा) धोंडीबा काळे, माजी आमदार**
महाविद्यालय व्यवस्थापन समितीचे
पहिले चेअरमन (१९८९ ते २००६)



**मा.स्व.गेनभाऊ (बाबा) विठ्ठल काळे**
माजी अध्यक्ष
(१९८५ ते १९९३)



**मा.स्व.दत्तात्रय (आबा) किसन काळे**
माजी अध्यक्ष
(१३-४-२००७ ते २-११-२००७)



**मा.स्व.सुमतीलालशेठ नेमचंद शहा**
माजी अध्यक्ष
(२४-११-२००७ ते १६-८-२००८)



**मा.स्व.कैलासशेठ गजाननशेठ काळे**
माजी अध्यक्ष
(२०१२ ते २०१७)

॥ एकमेका साह्य करू । अवघे धरू सुपंथ ॥

आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित

**बी.डी.काळे महाविद्यालय,घोडेगाव**

# ।। संस्था स्थापनेपासूनचे अध्यक्ष ।।

आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात ज्ञानाची गंगा सुरू करणारे संस्था स्थापनेपासूनचे अध्यक्ष

## सन १९५२ ते २०२२ पर्यंत

| अ.क्र. | अध्यक्षांचे नाव | कालावधी |
|---|---|---|
| १) | मा.स्व.गंगाधरशेठ भाऊशेठ होनराव | १९५४ ते १९६२ |
| २) | मा.स्व.बाबुराव भिमाजी काळे | १९६२ ते १९६३ |
| ३) | मा.स्व.गंगाधरशेठ भाऊशेठ होनराव | १९६२ ते १९६७ |
| ४) | मा.स्व.सूर्यकांतशेठ नेमचंद शहा | १९६७ ते १९७३ |
| ५) | मा.स्व.गंगाधरशेठ भाऊशेठ होनराव | १९७३ ते १९७४ |
| ६) | मा.स्व.सतुजी हरिभाऊ मंडलिक | १९७४ ते १९८१ |
| ७) | मा.स्व.डॉ.चंद्रकांत मोरेश्वर पोतनीस | १९८१ ते १९८३ |
| ८) | मा.स्व.वसंतराव मार्तंडराव काळे | १९८३ ते १९८५ |
| ९) | मा.स्व.गेनभाऊ विठ्ठलराव काळे | १९८५ ते १९९३ |
| १०) | मा.स्व.दत्तात्रय कृष्णाजी पा.काळे | १९९३ ते २००७ |
| ११) | मा.स्व.दत्तात्रय किसनराव पा.काळे | १३/०४/२००७ ते ०२/११/२००७ |
| १२) | मा.स्व.सुमतीलाल नेमचंद शहा | २४/११/२००७ ते १६/०८/२००८ |
| १३) | मा.श्री.चंदुशेठ नारोमल फेरवाणी | २००८ ते २०१२ |
| १४) | मा.स्व.कैलासशेठ गजाननशेठ पा.काळे | २०१२ ते २०१७ |
| १५) | मा.श्री.अजित दत्तात्रय काळे | २०१७ ते २०२१ |
| १६) | मा.श्री.सुरेशेठ भिमाजीशेठ काळे | २०२१ ते २०२२ |
| १७) | मा.श्री.अजित दत्तात्रय काळे | २०२२ ते ........ |

# ॥ कार्यकारी मंडळ : २०१७ ते २०२२ ॥



**मा.अजित दत्तात्रय काळे**
अध्यक्ष



**मा.तुकाराम नामदेवराव काळे**
उपाध्यक्ष,चेअरमन, वसतिगृह कमिटी



**मा.सुरेशशेठ भिमाजी काळे**
कार्याध्यक्ष



**ॲड.मुकूंद भगवंतराव काळे**
मानद सचिव



**मा.शिवाजी गोविंद घोडेकर**
सहसचिव व खजिनदार



**डॉ.विलास नथुराम काळे**
चेअरमन, महाविद्यालय विकास समिती



**ॲड.संजय दत्तात्रय आर्विकर**
चेअरमन, न्यू इ.मि.स्कू.कमिटी



**मा.संतोष पुरुषोत्तम भास्कर**
चेअरमन, समन्वय समिती



**मा.जयसिंगराव बा.काळे**
संचालक



**मा.स्व.रामशेठ गजाजनशेठ काळे**
संचालक



**मा.शिवदास मधुकर काळे**
संचालक



**मा.जितेंद्र प्रकाश जोशी**
संचालक



मा.सोपान सखाराम काळे
संचालक



मा.प्रशांत बाळासाहेब काळे
संचालक



मा.सोमनाथ वसंतराव काळे
संचालक



मा.विश्वास अरविंद काळे
संचालक



मा.डॉ.इंद्रजित भाऊराव जाधव
प्राचार्य बी.डी.काळे महाविद्यालय



मा.भगवान धोंडीभाऊ माळवे
प्राचार्य, जनता विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय



मा.सुरेश अनंथा मुळे
मुख्याध्यापक मु.प्र.पिंपळगाव (घोडे)



श्रीमती मेरीफ्लोरा डिसोझा
प्राचार्या न्यू इंग्लिश मि स्कूल



मा.कैलासबुवा भिमाजीशेठ काळे
सल्लागार



मा.निळकंठ एकनाथशेठ होनराव
सल्लागार



मा.उदय सूर्यकांतशेठ शहा
सल्लागार



मा.इनुस अहमद मुलाणी
सल्लागार



मा.किशोर हनुमान काळे
सल्लागार

।। एकमेका साह्य करू । अवघे धरू सुपंथ ।।

आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित

**बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव**

## ।। महाविद्यालय विकास समिती २०१७-२०२२ ।।


मा.श्री.ॲड.संजय दत्तात्रय आर्विकर
चेअरमन


मा.श्री.सुरेशशेठ भिमाजी काळे
सदस्य


मा.ॲड.मुकूंद भगवंतराव काळे
सदस्य


मा.श्री.अजित दत्तात्रय काळे
सदस्य


मा.श्री.निलेश रविंद्र काण्णव
सदस्य


मा.श्री.दिलीप विठ्ठलराव काळे
सदस्य


मा.डॉ.इंद्रजित भाऊराव जाधव
प्राचार्य,सचिव


मा.प्रा.डॉ.नाथा रामभाऊ मोकाटे
सदस्य


मा.प्रा.सोमनाथ किसन जगताप
सदस्य


मा.प्रा.डॉ.ज्ञानेश्वर अंबादास वाल्हेकर
सदस्य


मा.प्रा.डॉ.सौ.छाया दिनेश जाधव
सदस्य


मा.प्रा.डॉ.प्रभाकर रामजी मोकळ
सदस्य


मा.श्री.अशोक गेनभाऊ काळे
सदस्य

।। एकमेका साह्य करू । अवघे धरू सुपंथ ।।

आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित
**बी.डी.काळे महाविद्यालय,घोडेगाव**

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून महाविद्यालयास प्राप्त झालेले विविध पुरस्कार

| अ.क्र. | पुरस्काराचे नाव | कालावधी |
|---|---|---|
| १) | एन.एस.एस.कार्यक्रमाची उत्कृष्ट अमंलबजावणी करणारे महाविद्यालय पुरस्कार | २००५-२००६ |
| २) | एन.एस.एस. उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार : प्रा.डॉ.नाथा मोकाटे | २००५-२००६ |
| ३) | एन.एस.एस. उत्कृष्ट स्वयंसेविका पुरस्कार : कु.रूपाली भोर | २००५-२००६ |
| ४) | एन.एस.एस. उत्कृष्ट स्वयंसेविका पुरस्कार : कु.अश्विनी झोडगे | २००८-२००९ |
| ५) | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत ग्रामीण विभागातील सर्वोकृष्ट शिक्षक पुरस्कार : डॉ.श्रीमती छाया जाधव | २००९-२०१० |
| ६) | विद्यार्थी कल्याण मंडळाचा उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार | २०१२-२०१३ |
| ७) | उत्कृष्ट विद्यार्थी कल्याण अधिकारी पुरस्कार : प्रा.राजेंद्र जोशी | २०१२-२०१३ |
| ८) | कमवा व शिका योजनेत उत्कृष्ट काम केल्याबद्दल श्रीमती निलिमाताई पवार सुवर्णपदक : कु.हर्षला गडदे | २०१६-२०१७ |
| ९) | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा गुणवंत शिक्षकेतर सेवक पुरस्कार : श्री.उदय नांगरे | २०१७-२०१८ |
| १०) | महाविद्यालयास आजीवन अध्ययन व विस्तार कार्य उत्तम केल्याबद्दल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा उत्कृष्ट महाविद्यालय जगन्नाथ राठी पुरस्कार | २०१७-२०१८ |
| ११) | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना - उत्कृष्ठ स्वयंसेवक पुरस्कार कु.अश्विनी मंडलिक | २०१७-२०१८ |

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत महाविद्यालयाचे नाव आपल्या ज्ञानाने सुवर्णाक्षराने लिहिणारे आमचे गुणवान विद्यार्थी

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | विभाग | सन |
|---|---|---|---|
| १) | हनुमंत रामचंद्र गव्हाणे । पुणे विद्यापीठात प्रथम | राज्यशास्त्र | १९९७ |
| २) | दिपक रामचंद्र घोईरत । पुणे विद्यापीठात द्वितीय | अर्थशास्त्र | २००७ |
| ३) | जालिंदर लक्ष्मण खुटाण । पुणे विद्यापीठात द्वितीय | राज्यशास्त्र | २००८ |
| ४) | सोमनाथ लक्ष्मण फलके । पुणे विद्यापीठात चतुर्थ | राज्यशास्त्र | २००८ |








प्रोफेसर डॉ.ज्ञानेश्वर अंबादास वाल्हेकर
मराठी विभागप्रमुख यांची प्राध्यापकपदी
आणि उपप्राचार्य पदी पदोन्नती झाल्याबद्दल





प्रोफेसर डॉ.बाळू वामन गव्हाळे
अर्थशास्त्र विभागप्रमुख यांची प्राध्यापकपदी
पदोन्नती झाल्याबद्दल



प्रोफेसर डॉ.प्रभांकर रामजी मोकळ
वाणिज्य विभागप्रमुख यांची प्राध्यापक पदी
पदोन्नती झाल्याबद्दल



प्रोफेसर डॉ.गुलाबराव गोपाळा पारखे
भूगोल विभागप्रमुख यांची प्राध्यापक पदी
पदोन्नती झाल्याबद्दल



प्रा.भाऊसाहेब गंगाधर थोरात
मल्लखांब व क्रॉसकंट्री संघ विद्यापीट
निवड समिती अध्यक्ष म्हणून निवड



श्री.नितीन रणजीत बटुळे
(मराठी विभागाचे माजी विद्यार्थी)
सेट परिक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल



श्री.चंद्रकांत भवारी
(मराठी विभागाचे माजी विद्यार्थी)
नेट परिक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल



युवातरंग
२०२१-२२

# मा.प्राचार्यांचे मनोगत...

मा.प्राचार्यांचे मनोगत...

मा.प्राचार्यांचे मनोगत...

बी.डी.काळे महाविद्यालयाचा शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२०२२ या दोन शैक्षणिक वर्षातील 'युवातरंग' हे नियतकालिक प्रकाशित करताना मन:स्वी आनंद होत आहे. युवातरंगचा हा द्वैवार्षिकांक महाविद्यालयातील दोन वर्षातील विविध शैक्षणिक आणि विद्यार्थी व समाजकेंद्रीत उपक्रमांनी भरलेला असतो. युवातरंगचा अंक नेहमीप्रमाणे वेगळेपण घेऊन येत असतो. युवातरंगच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, वाचन व लेखनाबाबत रुची निर्माण व्हावी तसेच शिक्षक विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी विविध उपक्रम राबवून केलेल्या कामगिरीबद्दल त्यांचे कौतुक करण्यासाठी दरवर्षी 'युवातरंग' हे नियतकालिक प्रकाशित केले जाते. या वर्षी कोव्हिड महामारीमुळे द्वैवार्षिक अंक काढला आहे.

महाविद्यालय हे उच्च शिक्षण देणारे महत्वाचे शैक्षणिक केंद्र असते. सन १९८९ साली घोडेगांव येथे हे वरिष्ठ महाविद्यालय सुरु झाले. त्यामुळे ग्रामीण, अदिवासी व दुर्गम भागातील असंख्य विद्यार्थ्यांची विशेषत: विद्यार्थिनींची उच्च शिक्षण घेण्याची सोय जाली. गेल्या दोन्ही शैक्षणिक वर्षात महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा, नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांचे समुपदेशन, ग्रंथप्रदर्शन, कॉलेज कट्टा, क्रिडा महोत्सव, युवक महोत्सव, युवा व्यासपीठ हे भीत्तीपत्रक, स्टाफ ॲकॅडमी, लेखक आपल्या भेटीला इ. उपक्रम राबवून विद्यार्थ्यांची सर्वांगीण जडण घडण होईल याकडे विशेष लक्ष दिले आहे.

महाविद्यालय हे परिसरातील जनसामान्यांच्या शैक्षणिक आशा आकांक्षांच्या पूर्तीसाठी कार्यरत रहावे अशी अपेक्षा असते. या बाबत महाविद्यालयाने सतत जागृत राहून विविध समाजोपयोगी, कृतीशील

उपक्रमांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचून जनसामान्यांचे विश्वासाचे शैक्षणिक केंद्र बनले आहे. या महाविद्यालयात कार्यरत असलेले प्राध्यापक आपापल्या विषयात तज्ज्ञ आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, हितासाठी सतत कार्यरत राहणारे आहेत. आपुलकीनं कार्यरत असणारा प्रशासकीय कर्मचारी वर्ग यांचाही महाविद्यायाच्या प्रगतित मोलाचा वाटा आहे.

विद्यार्थ्यांनी आंतरमहाविद्यालयीन, विभागीय व विद्यापीठस्तरावर होणाऱ्या विविध क्रिडास्पर्धेत सहभाग घेऊन नैपुण्य मिळविले आहे. तसेच वक्तृत्व व निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन महाविद्यालयास नावलौकिक मिळवून दिले आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेकडे विशेष लक्ष दिले जात आहे. परंतु सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या दोन्ही शैक्षणिक वर्षात कोव्हिड महामारीमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वर्गात येऊन शिक्षण घेणे अशक्य झाले. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान झाले. याची खंत मनामध्ये आहे. दोन वर्षांच्या काळात संस्थापक, प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, पालक, समाज ही उच्च शिक्षणातील शैक्षणिक साखळी विस्कळीत झाली. त्याचा उच्च शिक्षणावर मोठा परिणाम झाला आहे. ही वास्तवता आपण विसरू शकत नाही. कोव्हिड सारख्या महामारीला आपण सामोरं जाऊन शैक्षणिक वर्षाच्या अंतिम टप्प्यात उच्च शिक्षणातील प्रगतीच्या वाटेवर आपण आहोत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अशा परिस्थितीतही संपादक मंडळाने 'युवातरंगचा' द्वैवार्षिक अंक काढण्याचा निर्णय घेतला याबद्दल संपादक मंडळाचे अभिनंदन !

चालू शैक्षणिक वर्षातील द्वैवार्षिक अंकाची जबाबदारी प्रा.डॉ.पुरुषोत्तम काळे यांनी त्यांच्या संपादक मंडळातील सहकाऱ्यांबरोबर नेटकेपणाने पार पाडली आहे. त्यांचे अभिनंदन ! प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचे लेख, महाविद्यालयातील विविध विभागाचे अहवाल तसेच महाविद्यालयात आयोजित शैक्षणिक आणि शिक्षणपुरक उपक्रमाचे अहवाल या अंकात असल्यामूळे सन २०२०-२१,२०२१-२२ या वर्षातील महाविद्यालयीन कामगिरीचे प्रतिबिंब युवातरंच्या अंकातून पडलेले दिसते. या नियतकालिकामूळे विद्यार्थ्यांच्या कला गुणांना व सृजनशीलतेला वाव देता आला. याचा मनस्वी आनंद होत आहे. ज्या ज्या घटकांनी हा अंक उत्तम दर्जाचा होण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य केले आहे, त्या सर्वांचे तसेच संस्थेचे सन्माननीय पदाधिकारी, संचालक, सल्लागार मंडळ, सर्व प्राध्यापक, संपादक मंडळ व शिक्षकेतर सहकारी, तसेच विद्यार्थी वर्ग या सर्वांचा मी आभारी आहे.

धन्यवाद !

**डॉ.इंद्रजित भाऊराव जाधव**
प्राचार्य,बी.डी.काळे महाविद्यालय,घोडेगाव





युवातरंग
२०२१-२२

# संपादकीय...

संपादकीय
पुनश्च हरी ओम....

'युवातरंग' या आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित बी.डी.काळे महाविद्यालयाच्या नियतकालिकाचा २०२१-२२ चा वार्षिकांक प्रकाशित करताना मनामध्ये समाधानाची भावना आहे. करोना विषाणूची महासाथ आटोक्यात आली आहे. सर्व सामाजिक व्यवहार पूर्वपदावर आलेले आहेत. या महासाथीमुळे आणि शासकीय निर्बंधामुळे शैक्षणिक संस्था वर्षभर बंद होत्या. महाविद्यालयातील अध्यापनाचे कार्य 'ऑनलाईन' पध्दतीचे व्याख्याने घेऊन पूर्ण करावे लागले. विद्यापीठाच्या परीक्षाही 'ऑनलाईन' घ्याव्या लागल्या. महाविद्यालये बंद असल्याने राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी कल्याण मंडळ आणि इतर विभागांचे कार्यक्रम वर्षभर झाले नाहीत. जे मोजके कार्यक्रम झाले ते 'ऑनलाईन' स्वरुपात घेण्यात आले. करोना महासाथीमुळे आणि महाविद्यालय बंद असल्याने गतवर्षी 'युवातरंग' चा अंक प्रकाशित होऊ शकला नाही.

'युवातरंग' बी.डी.काळे महाविद्यायाच्या विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्याच्या अभिव्यक्तीचे व्यासपीठ आहे. वैविध्यपूर्ण विषयांवर विद्यार्थ्यांनी लेखन करावे, यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले जाते. प्राध्यापक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. लेखनासाठी वाचन करावे लागते. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, एखाद्या विषयावर लेखन करताना अनुषंगिक वाचनाकरिता ग्रंथ कसे निवडावेत आणि सुसूत्ररित्या लेखन कसे करावे, याबाबत प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामुळे विद्यार्थ्यांचे स्वतंत्र विचार करून लेखन

करण्याची क्षमता उत्पन्न व्हावी, वैविध्यपूर्ण वाचनामुळे ते बहुश्रुत व्हावेत आणि त्यांचे विद्यार्थी म्हणूनच नव्हे तर एक आदर्श नागरिक म्हणून व्यक्तिमत्व घडावे हा यामागील उद्देश आहे.

बी.डी.काळे महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सुविधा, आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळाचे संचालक मंडळ, विविध विभागांचे झालेले कार्यक्रम याविषयीची माहिती या अंकात दिलेली आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.इंद्रजित भाऊराव जाधव हे ३१ मे २०२२ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांचा सेवापूर्ती कार्यक्रमाची छायाचित्रे या अंकात आहेत. मा.डॉ.इंद्रजित जाधव सरांचा सेवापूर्ती निमित्त सत्कार मा.नामदार दिलीपराव वळसे पाटील साहेबांच्या हस्ते, संस्थेतर्फे करण्यात आला. मा.डॉ.जाधव सरांना कार्यासाठी आणि उत्तम दीर्घायुरारोग्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा !

वैविध्यपूर्ण विषयांवरील विद्यार्थ्यांच्या कविता आणि लेखांबरोबरच महाविद्यालयातील व्यासंगी प्राध्यापकांनी अभ्यासपूर्ण लेख 'युवातरंग' मध्ये लिहिले आहेत. हे लेखन त्यांच्या आस्था विषयातील मर्मदृष्टी दर्शविणारे आहेत.

प्रा.डॉ.ज्ञानेश्वर वाल्हेकर यांची महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य म्हणून निवड झाली. त्याबद्दल सरांचे हार्दिक अभिनंदन. अंकाच्या निर्मितीमध्ये महाविद्यालायाचे प्रभारी प्राचार्य डॉ.ज्ञानेश्वर वाल्हेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

करोना महासाथीचे कृष्णमळभ दूर होऊन पुन्हा जनजीवन पूर्वपदावर येत असताना महाविद्यालयातील अध्ययन-अध्यापन कार्य नव्या उर्जेसह सुरु झाले आहे. विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान भरुन काढण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रयत्न सुरु झालेले आहेत. ही अतीव समाधानाची बाब आहे. 'युवातरंग' च्या निर्मितीमध्ये संपादक मंडळातील सर्व सहकारी प्राध्यापकांनी, कार्यालयीन अधिक्षकांनी आणि शिक्षकेतर सहकाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. नियतकालिकाची छपाई सुबक स्वरुपात, आकर्षक मुखपृष्ठ आणि छायाचित्रांसह ओम प्रिंट, सातारा यांनी केली आहे. प्रिंट ओमचे श्री.संदेश शहा यांनी वेळोवेळी मौलिक सूचना केल्या. आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष मा.अजित काळे, सचिव मा.विश्वासराजे काळे आणि महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा.ॲड.मुकूंद काळे यांनी आस्थापूर्ण चौकशी करून मार्गदर्शन केले. वरील सर्व मान्यवरांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

**प्रा.डॉ.पुरुषोत्तम काळे**
**संपादक, 'युवातरंग' नियतकालिक**



घोडेगाव (ता. आंबेगाव) : बी. डी. काळे महाविद्यालयात सैन्य व पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन करताना मान्यवर.


# घोडेगावात सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षण

# काळे महाविद्यालयातर्फे शिबिरामध्ये व्याख्यानमाला


घोडेगाव, ता. ५ : घोडेगाव (ता. आंबेगाव) येथील बी. डी. काळे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे श्रमसंस्कार शिबिर ... येथे झाले.

# घोडेगाव महाविद्यालयात ऑनलाइन कविसंमेलन

# प्रा. नितीन बढुळे सेट परीक्षा उत्तीर्ण



# उपप्राचार्यपदी डॉ. वाल्हेकर यांची नेमणूक



मंचर : घोडेगाव (ता. आंबेगाव) येथील आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित बी. डी. काळे महाविद्यालयाच्या उपप्राचार्यपदी मराठी विभागप्रमुख डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर यांची नेमणूक झाली.



बी. डी. काळे महाविद्यालयात बोलताना इंजिनिअर दिलीप मेदगे.

# शिक्षकांबद्दलचा आदर होतोय कमी : मेदगे

मंचर : शिक्षक आणि विद्यार्थी हे गुरु-शिष्याचे नाते आहे.

# मराठी भाषेचे संवर्धन काळाची गरज - मडावी

## काळे महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन सप्ताह



भीमाशंकर कारखान्यास भेट दिलेल्या विद्यार्थी.

# काळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची सहल

## दरेकरवाडीत विद्यार्थ्यांकडून वृक्षारोपण



दरेकरवाडी (ता. आंबेगाव) : वृक्षारोपणप्रसंगी उपस्थित मान्यवर.

## घोडेगावात मराठी भाषा गौरव दिन

घोडेगाव, ता. ४ : येथील बी. डी. काळे महाविद्यालयातील मराठी व पदव्युत्तर मराठी विभागाच्या वतीने ऑनलाइन मराठी भाषा गौरव दिनाचे नुकतेच आयोजन केले. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून मंचर येथील ज्येष्ठ आदिवासी साहित्यिक बाबाराव मुसळे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. इंद्रजित जाधव हे होते. मराठी राज्य भाषा दिन व कविवर्य कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांच्या जयंती निमित्ताने कथा, आत्मकथा आणि कादंबरीची निर्मिती प्रक्रिया या विषयावर बोलताना मुसळे म्हणाले की, भाषेतूनच साहित्याची निर्मिती होते आणि साहित्य हे सामाजिकतेची दृष्टी घेऊन जन्मास येते. त्यांच्या भाकर, अस्वस्थ, दाहो, मी मुद्दा मुकलेला या कथा, कादंबरी, आत्मकथा आणि कविता संग्रहातील साहित्य सर्व सामान्य वंचित माणसांच्या व्यथा, वेदनांना घेऊन जन्मास आले असून ते आपले अस्तित्व, हक्क, अधिकारांसाठी संघर्ष करते. मराठी भाषेत आणि बोलीभाषेत ते समृद्ध झाल्याने त्याचे अनुवाद राष्ट्रीय भाषा हिंदीतही झालेले आहेत.

याप्रसंगी त्यांनी आपल्या भाकर या कथा संग्रहातील अशी प्रेमाच्या किंकाळ्या ही उपेक्षांच्या समस्या आणि त्यांच्या जगण्याचे जिवंत चित्रण उभे करणारी कथा तसेच आत्मकथनातील अविस्मरणातील झोपडपट्टी पाडल्यानंतर बेघर झिंग्याची होणारी तगमग व त्याचेसाठी म्हणे देवून केलेला संघर्ष, मोर्चात भेटलेली पोर म्हणून जगणारी माय आणि तिच्या मृत्यूनंतर तिच्यासाठी लुगडे नेवून अंत्यच्या वाटेवर तिच्या चितेजवळ आक्रोशातील साहित्यातून बाबाराव मुसळे यांनी आपल्या व्याख्यानात प्रभावीपणे मांडली. प्रा. डॉ. पुरुषोत्तम काळे यांनी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केले. तर प्रा. पोपटराव माने यांनी सूत्रसंचालन व आभार केले.

उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

## आंतरविभागीय क्रॉसकंट्री स्पर्धेत शुभम, भाग्यश्री विजेते



## काळे महाविद्यालयात ओपन जिमचे उद्घाटन

घोडेगाव : येथील आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित बी.डी. काळे महाविद्यालयासाठी पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या व्यायामशाळा विकास अनुदान योजनेअंतर्गत ओपन जिम उभारण्यात आली. त्याचे उद्घाटन घोडेगाव पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक लहू थाटे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळाचे कार्याध्यक्ष सुरेश काळे, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन ॲड. संजय आर्वीकर, एम.सी.व्ही.सी.चे चेअरमन प्रा. शिवदास काळे, प्राचार्य डॉ. इंद्रजित जाधव, उपप्राचार्य प्रा. भागवत पवार, अधिक्षक अशोक काळे, महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेतर वर्ग व विद्यार्थी हजर होते. यात विविध व्यायाम प्रकारच्या एकूण सात व्यायाम साहित्याचा समावेश आहे. प्रत्येक व्यायाम साहित्यावर कशा प्रकारे व्यायाम करावा याचे प्रात्यक्षिकही शारीरिक शिक्षण संचालक प्रा. भाऊसाहेब थोरात यांनी या वेळी करून दाखविले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.वल्लभ करंदीकर यांनी केले.



घोडेगाव येथील बी. डी. काळे महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना एड्सबाबत माहिती देण्यात आली.

## बी. डी. काळे महाविद्यालयात व्याख्यान

मंचर : घोडेगाव (ता. आंबेगाव) येथील बी. डी. काळे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने एड्स दिनानिमित्त व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आय. बी. जाधव होते. यावेळी कार्यक्रम अधिकारी डॉ. वल्लभ करंदीकर यांनी एड्सबाबत राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यांना माहिती दिली. एड्स जनजागृतीविषयक ध्वनिफीत व पोस्टरचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. प्रा. एस. डी. डोके, प्रा. सृष्टी बोऱ्हाडे यावेळी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. माणिक बोऱ्हाडे यांनी केले. प्रा. पोपट माने यांनी आभार मानले.

» अवतीभवती

## घोडेगावच्या काळे महाविद्यालयात रस्ता सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांची प्रतिज्ञा

घोडेगाव : आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित बी. डी. काळे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि विद्यार्थी विकास मंडळाच्यावतीने रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात आले. रस्ता सुरक्षेबाबत या वेळी विद्यार्थ्यांनी प्रतिज्ञा घेतली. विद्यार्थ्यांना लायसन, वाहतुकीचे नियम मोडल्यावर होणारा दंड, वेग मर्यादा आदींबाबत माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आय. बी. जाधव हे होते. उपप्राचार्य प्रा. बी. एस. पवार, प्रा. पोपटराव माने, प्रा. शीतल बोराडे, प्रा. अदिती काळे या वेळी उपस्थित होते. या अभियानासाठी घोडेगाव पोलिस पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रदीप पवार यांचे सहकार्य लाभले. महामार्ग पोलिस उपनिरीक्षक संजय सुतनासे यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन केले. ए. एस. शिंगाडे यांनी रस्ते सुरक्षिततेबाबत तरुणांच्या जबाबदाऱ्या समजावून सांगितल्या. वाहतूक पोलिस संपत कायगुडे, गोरक्ष पठारे, तानाजी फलके, विजय लेंभे, सागर कैंगले आदी या वेळी उपस्थित होते. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. वल्लभ करंदीकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. चांगुणा कदम यांनी केले. विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. गुलाबराव पारखे यांनी आभार मानले.

राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद

विश्वविद्यालय अनुदान आयोग का स्वायत्त संस्थान

NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL

An Autonomous Institution of the University Grants Commission

# Certificate of Accreditation

The Executive Committee of the
National Assessment and Accreditation Council
on the recommendation of the duly appointed
Peer Team is pleased to declare the
Ambegaon Taluka Vidya Vikas Mandal's
B. D. Kale Mahavidyalaya
Ghodegaon, Tal. Ambegaon, Dist. Pune,
affiliated to Savitribai Phule Pune University, Maharashtra as
Accredited
with CGPA of 2.52 on seven point scale
at B+ grade
valid up to August 15, 2023

Date : August 16, 2018

Director

EC(SC)/31/RAR/MHCOGN10748

# प्रशासकीय



## प्राचार्य

दूरदृष्टी नेतृत्त्व
**मा.प्राचार्य**
**डॉ.इंद्रजित भाऊराव जाधव**



कला विद्याशाखेतील सर्व शिक्षक वृंद



वाणिज्य विद्याशाखेतील सर्व शिक्षक वृंद



बी.बी.ए (सी.ए.) विभागातील शिक्षक वृंद



युवातरंग संपादक मंडळ



विज्ञानशाखेतील शिक्षक वृंद



महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी व सेवक वृंद

## ।। क्षणचित्रे ।।



प्राचार्य डॉ.इंद्रजित भाऊराव जाधव यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभाच्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना राज्याचे गृहमंत्री मा.ना.दिलीपराव वळसे पाटील साहेब सोबत व्यासपीठावर संस्थेचे मान्यवर



महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलन प्रसंगी घोडेगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक मा.किशोर वागज यांचा सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष मा.सुरेशशेठ काळे व सोबत मान्यवर.



कोरोना काळात विद्यार्थ्यांचे लसीकरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता तो एक क्षण




स्नेहसंमेलन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन ॲड.संजय आर्विकर, सोबत इतर मान्यवर




आमोंडी येथील रा.से.सो. हिवाळी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना घोडेगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मा.जीवन माने, सोबत व्यासपीठावर संस्थेचे मान्यवर व ग्रामस्थ.




आमोंडी येथे संपन्न झालेल्या रा.से.सो. हिवाळी शिबिराच्या समारोप प्रसंगी मनोगत व्यक्त करताना घोडेगाव येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे अधिकारी मा.बळवंत गायकवाड, सोबत इतर मान्यवर

# ।। क्षणचित्रे ।।



वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी जनरल चॅम्पियनशीप स्वीकारताना खेळाडू.



वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी जनरल चॅम्पियनशीप स्वीकारताना महाविद्यालयीन विद्यार्थिनी.



विविध गुणदर्शन प्रसंगी नृत्य सादर करताना विद्यार्थिनी.



विविध गुणदर्शन प्रसंगी नृत्य सादर करताना विद्यार्थी व विद्यार्थिनी.



प्राणीशास्त्र विभागाने पक्षी व प्राण्यांसाठी अन्न व पाण्याची व्यवस्था करणारे छायाचित्र.



आमोंडी येथे संपन्न झालेल्या रा.से.सो. हिवाळी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना पंचायत समितीचे सभापती मा.संजय गवारी, सोबत इतर मान्यवर

# ।। क्षणचित्रे ।।



बी.सी.ए. विभाग आयोजित ॲनिमेशन शाळेत मार्गदर्शन करताना
श्री.पवन पाटील, पुणे



शिक्षक दिनानिमित्त मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य
डॉ.इंद्रजित जाधव, सोबत संस्थेचे मान्यवर



ग्राहक पंचायत समितीचे श्री.रमेश टाकळकर मार्गदर्शन करताना.




सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्ताने महाविद्यालयातील मुलींचा
फेटा बांधून सन्मान करतानाचा एक क्षण



विज्ञान विभागाची अभ्यास सहल श्री.भिमाशंकर सहकारी साखर कारखाना,
पारगाव येथे संपन्न झाली.



विज्ञान विभागाची अभ्यास सहल राजगुरूनगर येथील कांदा-लसूण
संशोधन केंद्र येथे संपन्न झाली.

## ।। क्षणचित्रे ।।



आमोंडी येथील रा.से.सो. हिवाळी शिबिराचे उद्‌घाटन करताना तहसिलदार मा.रमा जोशी मॅडम, सोबत इतर मान्यवर



दरेकरवाडी येथे वृक्षारोपण करताना माजी सभापती मा.कैलासबुवा काळे



३६ महाराष्ट्र बटालियनचा पी. अे. स्टाफ



रा. से. सो. शिबिरात विद्यार्थिनी गट चर्चेत सहभाग घेताना.



राज्यशास्त्र विभाग आयोजित मतदार नोंदणी प्रसंगी तहसिलदार मा.रमा जोशी व इतर



महाविद्यालयातील करिअर कट्ट्याची माहिती देताना प्रा.सुनिल नेवकर

## ।। क्षणचित्रे ।।



विज्ञान विभागाची अभ्यास सहल श्रीक्षेत्र भिमाशंकर येथे संपन्न झाली.



आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री (मुले व मुली) स्पर्धा सहभागी संघ



आंतर महाविद्यालयीन कबड्डी (मुले) स्पर्धा सहभागी संघ



आंतर विभागीय क्रॉसकंट्री स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री.सुरेशशेठ काळे



आंतर महाविद्यालयीन आर्चरी (मुले व मुली) स्पर्धा सहभागी संघ



निर्भया पथकाच्या प्रसंगी महाविद्यालयात मार्गदर्शन करताना
घोडेगाव पोलीस स्टेशनचे पी.एस.आय. श्री.किरण भालेकर, सोबत इतर मान्यवर

# ।। क्षणचित्रे ।।



आंतर महाविद्यालयीन मल्लखांब स्पर्धा (मुली) विजयी संघ.




बी.सी.ए. विभागाची अभ्यास सहल,
घोडेगाव येथील मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालय येथे संपन्न झाली.




राज्यशास्त्र विभागाने आयोजित केलेला मतदान जागृती कार्यक्रम.




आमोंडी येथे संपन्न झालेल्या रा.से.यो. शिबिरात वृक्षारोपण जनजागृतीपर मिरवणूक संपन्न झाली.



युवा व्यासपीठाचे प्रकाशन प्रसंगी मान्यवर, श्री.खेडेकर साहेब,
ITDP, घोडेगाव, पुणे




'मानवी हक्क' या विषयावर मार्गदर्शन करताना इतिहास विभागप्रमुख
मा.डॉ.नाथा मोकाटे

# ।। क्षणचित्रे ।।



राज्यशास्त्र विभाग आयोजित संविधान दिनाच्या प्रसंगी प्रतिज्ञा घेताना मान्यवर



मराठी विभाग आयोजित मराठी भाषा पंधरावडा निमित्ताने आयोजित केलेल्या ऑनलाईन कविसंमेनाचे क्षणचित्र.



मराठी विभाग आयोजित ऑनलाईल व्याख्यान सादर करताना सुप्रसिद्ध कवयित्री मा.उषाकिरण आत्राम, गोंदिया



रस्ते सुरक्षा विषयक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



कोव्हिड १९ महामारीच्या काळात मास्क वाटप करताना महाविद्यालयाचे विद्यार्थी.



वार्षिक क्रीडा महोत्सव प्रसंगी व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन करताना उपप्राचार्य प्रा.डॉ.ज्ञानेश्वर वाल्हेकर सोबत प्राचार्य डॉ.इंद्रजित जाधव

# ।। क्षणचित्रे ।।



ओपन जिमचे उद्घाटन करताना
सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.लहू थाटे साहेब



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतर विभागीय क्रॉसकंट्री स्पर्धा उद्घाटन करताना
पोलीस उपनिरीक्षक श्री.अनिल चव्हाण साहेब



आंतर महाविद्यालयीन योगासन स्पर्धा (मुली) उपविजेता संघ.



आंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा (मुली) उपविजेता संघ.



सावित्रीबाई फुले जयंती निमित्ताने गुणवंत महिला खेळाडूंचा सन्मान



वार्षिक क्रीडा महोत्सवातील रंगलेला महिला कबड्डीचा सामना

## ।। महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी ।।


Bhilare Akshata Prabhakar
F.Y. B.Com.


Sneha Avinash Awate
S.Y. B.Com.


Ankita Vilas kale
S.Y. B.Com.


Sulakshana Vijay Mohandule
T.Y.B.Com


Atharva Karpe
F.Y.B.B.A.(CA) fnl


Atharv Karpe
S.Y.B.B.A.(CA) fnl


Kokane Pratiksha
T.Y.B.B.A.(CA) fnl


Karandikar Atharva Vallabh
(F.Y.B.Sc)


Sutar Priyanka Gulab
S.Y. B.Sc.


Lande Siddhesh Arjun
T.Y. B.Sc.


Patil Pradunya
F.Y.B.A.


Bheke Prandya Dattatray
F.Y.B.A.


Walunj Pankaj
S.Y.B.A.


Kengale Ganesh Sanjay
T.Y.B.A.


Priyanka Machave
M.A. Part II


Aherkar Kiran
M.Com

।। एकमेका साह्य करू । अवघे धरू सुपंथ ।।
आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित
**बी.डी.काळे महाविद्यालय,घोडेगाव**

## क्रिडा विभाग

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतर विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी पुणे जिल्हा संघात निवड झालेले खेळाडू





अश्विनी जोशी
क्रिकेट



सेजल काळे
क्रिकेट



अपेक्षा पोटुकले
रोप मल्लखांब



गौरी सोनवणे
रोप मल्लखांब



प्रणाली गव्हाणे
रोप मल्लखांब



शुभम संजय कानसकर
पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ
कबड्डी स्पर्धेसाठी विद्यापीठ संघात निवड
अमरावती (महाराष्ट्र)



युवराज सोपान शेलार
जनरल चॅम्पीयनशीप
२०२१-२२



आश्लेषा हरिश्चंद्र काळे
विभागीय क्रिकेट संघात निवड
जनरल चॅम्पीयनशीप
२०२१-२२

# भावपूर्ण श्रद्धांजली

गेल्या शैक्षणिक वर्षात देशातील
शास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील
प्रख्यात विचारवंत, साहित्यिक, कलावंत, शेतकरी,
देशाच्या सीमेचे संरक्षण करताना ज्यांना वीरगती
प्राप्त झाली असे वीर जवान, कोविड १९ विषाणूच्या
महासाथीतील रुग्ण, डॉक्टर्स, परिचारीका, कोविड योद्धे
तसेच संस्थेचे सभासद, संस्थेचे हितचिंतक
कालवश झाले त्यांना युवातरंगची

**भावपूर्ण श्रद्धांजली....!**

# अंतरंग


**गद्य विभाग**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | माणसांच्या गर्दीत माणूस शोधतेय मी | अपेक्षा प्रदिप बांबळे | प्रथम वर्ष कला | ३ |
| २) | मोबाईल एक व्यसन | साक्षी सिताराम गधडे | द्वितीय वर्ष वाणिज्य | ५ |
| ३) | मराठी अमुची राजभाषा असे | उज्ज्वला गुलाब सुतार | एम.ए.द्वितीय वर्ष | ७ |
| ४) | आभासी चलन | ऐश्वर्या राहुल डाके | तृतीय वर्ष वाणिज्य | ९ |
| ५) | गंध फुलांचा सांगून गेला | प्रणाली भागवत | तृतीय वर्ष वाणिज्य | ११ |
| ६) | सूर्यनमस्कार - एक सर्वांग परिपूर्ण व्यायाम | प्रा.भाऊसाहेब गंगाधर थोरात | शारीरिक शिक्षण संचालक | १२ |
| ७) | इतिहास विषयातील करिअरच्या संधी | आशुतोष नवनाथ सैद | तृतीय वर्ष कला | १५ |
| ८) | बालपणाचा पुनर्शोध | तेजल सावळेराम विरणक | तृतीय वर्ष वाणिज्य | १६ |
| ९) | फसव्या जाहिराती | प्रीती नवनाथ काळे | द्वितीय वर्ष वाणिज्य | १७ |
| १०) | वाचते व्हा ! | नेहा शरद गवारी | प्रथम वर्ष कला | १९ |
| ११) | मोडी लिपी | साहिल अजमुद्दीन तांबोळी | इतिहास विभाग | २० |
| १२) | लोकराजा राजर्षी शाहू | प्रविण बापू लेंभे | तृतीय वर्ष कला | २२ |
| १३) | अनाथांची माय - सिंधुताई सपकाळ | प्रतिभा किसन बोऱ्हाडे | द्वितीय वर्ष कला | २५ |
| १४) | ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ - डॉ.गेल ऑम्वेट (Gail Omvedt) | प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम | इतिहास विभाग | २७ |
| १५) | एन.एस.एस. शिबिरांची तरुणांच्या व्यक्तिमत्व विकासातील भूमिका | तन्वी जालिंदर देशमुख | द्वितीय वर्ष कला | २९ |
| १६) | भारतातील बेरोजगारी | सुनंदा सखाराम असवले | तृतीय वर्ष कला | ३० |
| १७) | नोबेल पारितोषिक विजेते भारतीय अर्थशास्त्रज्ञ : अमर्त्य सेन | श्वेता जगन्नाथ ओव्हाळ | तृतीय वर्ष कला | ३२ |
| १८) | रशिया-युक्रेन युद्ध | प्रा. सुनील लक्ष्मण नेवकर | राज्यशास्त्र विभाग | ३४ |
| 19) | Choice-Based Credit System : A System of Opportunities | Dr. Vallabh Karandikar | Dept Of English | 37 |
| 20) | The Contribution of the IPL To The Current Sports Landscape | Prof. Aditi D. Kale | Dept. of BBA & Com. | 39 |
| 21) | Career Opportunities In Commerce | Kaushal Deepak Kale | T.Y.B.Com. | 41 |
| 22) | "World Environment Day" 2010 to Now | Prof.  Archna R. Autade | Dept. of Botany | 45 |

पद्य विभाग



| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | पाठीशी कृष्ण हवा | अंकिता अविनाश काळे | द्वितीय वर्ष वाणिज्य | १० |
| २) | फौजी | पल्लवी अशोक गधडे | द्वितीय वर्ष वाणिज्य | १४ |
| ३) | प्रिय सखा.... | प्रा. शितल बोऱ्हाडे | वाणिज्य विभाग | २१ |
| ४) | कविता | सायली काशिनाथ घुले | द्वितीय वर्ष एम. ए. | २१ |
| ५) | आयुष्य | तेजस्वी संतोष भारमळ | दूवितीय वर्ष कला | २४ |
| ६) | आयुष्याचे पुस्तक | अपेक्षा महादू गिजरे | प्रथम वर्ष वाणिज्य | २४ |
| ७) | बालपणीचे दिवस | गौरी मनोज सोनवणे | द्वितीय वर्ष वाणिज्य | २६ |
| ८) | प्रिय शिक्षक | श्रुती दत्तात्रय तळेकर | प्रथम वर्ष वाणिज्य | २६ |
| ९) | आयुष्याचा धडा... | ऋषिकेश जगदाळे | प्रथम वर्ष विज्ञान | ३१ |
| १०) | सूर्यास्त | प्रा. रेश्मा मनोज शिंदे | वाणिज्य विभाग | ३१ |



अहवाल विभाग



| | | |
|---|---|---|
| १) | आजीवन अध्ययन व विस्तार विभाग | ४७ |
| २) | परीक्षा समिती | ४८ |
| ३) | राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) | ४९ |
| ४) | राष्ट्रीय सेवा योजना | ५० |
| ५) | शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग | ५१ |
| ६) | ग्रंथालय विभाग | ५३ |
| ७) | स्पर्धा परीक्षा समिती | ५४ |
| ८) | वाङ्मय मंडळ | ५६ |
| ९) | उद्योजकता विकास केंद्र | ५६ |
| १०) | प्रसिद्धी समिती | ५६ |
| ११) | प्राध्यापक ज्ञानवर्धक सभा | ५७ |
| १२) | पालक शिक्षक संघ | ५७ |
| 13) | Placement Cell | 58 |
| १४) | वादविवाद वक्तृत्व व निबंध लेखन समिती | ५८ |
| १५) | सांस्कृतिक कार्यक्रम समिती | ५९ |
| १६) | विद्यार्थी विकास मंडळ | ६० |
| १७) | वार्षिक पारितोषिक वितरण व युवक महोत्सव | ६० |
| १८) | कमवा व शिका योजना | ६० |
| १९) | इतिहास विभाग | ६१ |
| २०) | राज्यशास्त्र विभाग | ६२ |
| २१) | मराठी विभाग | ६६ |
| २२) | वाणिज्य विभाग | ६७ |
| २३) | अर्थशास्त्र विभाग | ६९ |
| 24) | विज्ञान विभाग | 71 |
| | Parent's Meeting | 71 |
| | Short Term Course on Introduction to Soil and Water Aanalysis | 72 |
| | C-MET Program | 72 |
| | Bhimashankar Sugar factory Visit | 72 |
| | सेंद्रिय शेती सर्वेक्षण | ७२ |
| | GMRT Science Exhibition Feb. 2021 | 73 |
| | Bhimashankar Botanical Excursion | 73 |
| 25) | Department of English | 73 |
| 26) | DEPARTMENT OF BBA (CA) | 75 |
| २७) | भूगोल विभाग | ७७ |
| २८) | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र, मुक्त विद्यापीठ,नाशिक | ७९ |

चिंतनपर

# माणसांच्या गर्दीत माणूस शोधतेय मी

अपेक्षा प्रदिप बांबळे
प्रथम वर्ष कला

''तुम्ही कितीही हुशार असाल पण,
जर तुम्हाला माणसाशी कसं वागायचं
हेच माहिती नसेल तर तुमच्या
हुशारीचा काहीच उपयोग नाही.''

निसर्गाच्या अलौकिक निर्मितीतून बहरलेल्या सृष्टीत सगळ्यात बुध्दिमान प्राणी म्हणजे मनुष्य. हेच नव्हे तर मन, भावना, इच्छा, संवेदना यांचा सुंदर मिलाप आणि स्वतःच्या मनपटलावर काम, क्रोध, मद, मत्सर, अहंकार या षडरिपुच्या लपंडावात गुरफटलेला हा माणूस.

माणूस सुखाचा तर अनुभव घेतोय, सगळ्या भोवतालच्या सुखसोईचा उपभोग घेतोय पण, माणसातली माणुसकी मात्र कुठेतरी हरवत जाताना आपल्याला पहायला मिळतेय. यावरुन बहिणाबाईंना असा प्रश्न पडला की,


''माणसा माणसा कधी होशील माणूस
लोभासाठी झाला माणसाचा रे काणूस.''

विद्येचे माहेरघर असलेले पुणे शहर येथे चार कुत्र्यांना रॉकेल टाकून मारले. सख्ख्या भावनेच बहिणीला भर रस्त्यावर चाकूने वार करुन मारले, गाडीवरुन पडलेले दोन तरुण मदतीची याचना करत असताना कोणीही त्यांना मदत केली नाही. याऊलट मोबाईलमध्ये त्या घटनेचे शूटिंग करण्यात व्यस्त होते. कदाचित त्या गर्दीत एकही माणूस नसावा.

सुखसमृध्दीच्या या गराड्यात अडकलेल्या आणि तथाकथित प्रगतीच्या हव्यासाने घेरलेल्या माणसाला समाधान आणि आनंदाच्या गोष्टीचा विसर पडला आहे. पण संवाद मात्र त्याने हरवला.

या लोभापायी माणसातील माणसाचा घात झाला आहे. हव्यासापायी माणूस स्वार्थी होत चालला आहे. शहरीकरणाच्या नावाखाली त्याने प्रचंड वृक्षतोड केली. त्यामुळे त्याचा वाईट परिणामही त्याला भोगावा लागतोय.

झाडे नसतील तर आपणही जगू शकणार नाही याची जाणीव त्याला प्रकर्षाने या दोन वर्षात जाणवली. जेव्हा मोफत मिळणारा प्राणवायू त्याला कोरोना काळात विकत घ्यावा लागला आणि आता प्लास्टिकच्या वापराबाबतीतही आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामाबाबत त्याला जाणीव झाली आहे. त्यामुळे आता प्लास्टिकच्या वापराबाबत तो जागृत झाला आणि प्लास्टिक बंदी करण्यात आली.



माणसाच्या स्वार्थीपणामुळे जन्मदाते आईवडील वृध्दाश्रमात रवाना झाले तर, हव्यासापायी नातेवाईकापासून तो दुरावत चालला आहे. आजकाल आपण सोशल मिडियाच्या माध्यमातून हजारोंच्या संख्येने मित्र-मैत्रीणी बनवतोय परंतु प्रत्यक्षात कितीजण एकमेकांना ओळखतात किंवा वारंवार भेटून एकमेकांची प्रेमाने विचारपूस करतात याचे प्रमाण खूपच कमी आहे किंवा हा एक संशोधनाचा विषय होऊ शकतो.

आजच्या या काळात स्त्री-सुरक्षितता हा विषय सुद्धा खूप महत्वाचा आहे. शालेय मुलींपासून तर वयस्कर स्त्रियापर्यंत कुणीही या समाजात सुरक्षित नाही. रोज किती अत्याचाराच्या, चोरी लबाडीच्या, हिंसाचाराच्या तसेच हत्येच्या, फसवणुकीच्या बातम्या आपल्याला ऐकायला मिळतात. याचं साधं सोपे उदाहरण घेतलं तर एखाद्या अपघातस्थळी प्राण वाचविण्याचा प्रयत्न करण्याऐवजी लुटमारीचे प्रकार घडताना आपल्याला बऱ्याचदा बघायला मिळतात. मुलीवर भर रस्त्यात अत्याचार, ॲसिड हल्ला किंवा छेड काढण्याचे प्रकार ऐकायला मिळतात. ही निर्घुणतेची परिसीमाच नाही का ?

या सर्व गोष्टीवरुन मला असं वाटतं की, आपल्या देशात या लोभी माणसांच्या गर्दीत अजूनही खूप चांगल्या अशा व्यक्तीदेखील आहेत ज्यामध्ये गोरगरिबांना मोफत उपचार करणारे, त्यांची निस्वार्थपणे सेवा करणारे डॉ. प्रकाश बाबा आमटे, मदर तेरेसा असतील, तसेच मुलींना शिक्षणाची दारे उघडी करुन देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले असतील, तसेच आजच्या काळातील अनेक समाजसेवक असतील.

ज्यादिवशी आपण गोरगरीब मुलांच्या हातात पाटी देऊ, स्त्री जन्माचं स्वागत करु तसेच आपल्या स्वभावातील स्वार्थीपणा कमी होईल त्यावेळीच आपल्याला गर्दीतला माणूस दिसेल.

''हव्यास हा सुखाचा, कल्लोळ वासनांचा,
जळत्या चितेवरी ह्या, माणूस शोधतो मी,
हे धर्म, पंथ जाती, शोधून सर्व आलो
भिंतीपल्याड यांच्या माणूस शोधतो मी.''

✦ ✦ ✦ ✦

## त्याचा अभिमान वाटेल

मृत व्यक्तीला खांदा देण्याचे काम कितीही पवित्र आणि परोपकारी असले तरी जो मृत झाला आहे त्याला त्याचा काहीच उपयोग नसतो. पण किती मृतांना खांदा दिला, यापेक्षा किती जिवंत माणसांना हात दिला यावर आपली माणुसकी ठरत असते. माणूस मृत झाला की, ही बातमी कळताच धावून जाणारी माणसं तो जिवंत असताना त्याच्या पडत्या काळात का बरं धावून जात नाहीत ?

खरं तर माणूस गेल्यानंतर धावणाऱ्या माणसांची धावपळ व्यर्थ असते. कारण तुम्ही नाही गेला तरी इतर लोक त्याला दहन केल्याशिवाय राहणार नाहीत. पण ही व्यर्थ धावपळ करणारेच खूप लोक आहेत.

खरं तर आजकालच्या या खोट्या दिखाव्याच्या शर्यतीत, तू मोठा की, मी मोठा ही क्षणभंगूर श्रीमंती दाखवण्याची गरज नाही, यातून माणूस माणसाला व आपुलकीच्या नात्याला विसरत चाललाय...

म्हणूनच सांगावेसे वाटते, जिवंतपणी जिवंत माणसांसाठी, जिवंत असणाऱ्या व अडचणीत सापडलेल्या एकाला तरी आयुष्यात खरा प्रामाणिक हात द्या... झालं गेलं विसरुन, तुझं माझं सोडून माणूस व्हा... मरेपर्यंत त्याचा अभिमान वाटेल.

**शिवानी विजय लोहकरे**
**प्रथम वर्ष कला**



*मोठेपणा येण्यासाठी आधी कष्ट सोसावे लागतात.*

वैचारिक

# मोबाईल एक व्यसन

साक्षी सिताराम गधडे
द्वितीय वर्ष वाणिज्य

एखाद्या गोष्टीच्या अति अधीन जाणे म्हणजे व्यसनाधीन होणे. चांगली असो अगर वाईट परंतु प्रमाण जास्त वाढले म्हणजे त्याचे रूपांतर व्यसनात होते. मोबाईलला हात लावला म्हणून नवऱ्याने बायकोला बेदम मारले, ही बातमी टीव्हीवर पाहिली आणि या मोबाईल नावाच्या मानवचलित यंत्राने माणसाच्या जीवनात केलेल्या आगमनाचे माणसाला लागलेले त्याचे व्यसन हे नक्कीच जीवघेणे आहे असे वाटू लागले. ज्या महापुरुषाने मोबाईलला जन्मास घातले तो धन्य. मोबाईलचे वाढते चमत्कार दिवसेंदिवस अनुभवास येऊ लागले. हा दिसतो लहान पण भल्याभल्यांनाही वेडं करून सोडलंय याने. वरवर दिसायला फुलपाखरासारखा पण आतून मात्र गांधील माशी समान कोणाच्या भावनांना कुठे दंश करील आणि कुठे त्या उत्तेजित होतील याचा भरवसा नाही. लहान तोंडी मोठा घास असा याचा स्वभाव. कुठल्याही गोष्टीचा अतिरेक हा विनाशास कारणीभूत ठरतो, तद्वत आज मानवी पिढीबद्दल झाले आहे. लोक एक वेळ पायात चप्पल घालायची विसरतील, अंगात शर्ट घालायचा विसरतील, पण मोबाईल मात्र हातात किंवा खिशात असल्याशिवाय एक पाऊलही पुढे टाकण्यास धजावणार नाहीत. चुकून मोबाईल जर विसरला, तर आयुष्याचा जोडीदार हरवल्यावर हुरहुर मनाला लागावी एवढा प्रत्येकाला याचा लळा लागला आहे. या निर्जीव वस्तूनं माणसाला प्रमाणापेक्षा जास्त आपलसं केलं आहे. लोकांना अन्न पाण्यापेक्षाही याचा मोह जास्त वाटू लागला आहे. ही काय किमया केली या छोट्याशा वस्तूने, की लहान थोरांना पूर्ण बिघडवून ठेवलं आहे.

मोबाईलचा इतिहास पाहिला तर तीन दशकांपेक्षा जास्त नाही. सुरुवातीच्या काळात फक्त एकमेकांशी संवाद साधण्यास मोबाईलचा वापर होत होता. जसजसा मोबाईल कात टाकत गेला तसतसा त्याचा वेग जास्त वाढत गेला. आज सगळं जग या छोट्या वस्तूंमध्ये सामावलेले आहे. लेखन, वाचन, टीव्ही, रेडिओ एवढेच नव्हे तर संगणकाचे कामही आज मोबाईल करत आहे. हा अविश्वसनीय बदल झाल्यामुळेच मोबाईलला हल्ली स्मार्टफोन हे आधुनिक नाव देण्यात आले आहे. अल्पावधीतच सर्वांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा हा एक किमयागार ठरला आहे. ज्या ठिकाणी माणूस त्या ठिकाणी मोबाईल. मोबाईल शिवाय हे समीकरण आज होऊ शकत नाही. माणसाला त्याची सावली जशी सोडत नाही अग्नीला उष्णता सोडत नाही तसा मोबाईल पासून माणूस क्षणभरही वेगळा राहू शकत नाही. आनंद असो अगर दुःख कुठल्याही प्रसंगी आपल्याला साथ देणारे साधन म्हणजे आज मोबाईल आहे, याला मोबाईलचा एक सद्गुणच म्हणावा लागेल. स्वतः संवेदनाहीन असला तरी संवेदनशील माणसाच्या ह्दयाला पाझर फोडण्याची ताकत त्याच्यामध्ये आहे. चोर-पोलिसांचा खेळ खेळण्यात मोबाईल फारच पटाईत खोटं बोलण्याचे प्रशिक्षण घ्यावे तर मोबाइलकडूनच.

मोबाईलमुळे माणसातला माणूस हरवला आहे. माणसात बसून एकटेपणाचा गुण माणसाच्या अंगी रुजला आहे. उठताना मोबाईल, बसताना मोबाईल, खाताना मोबाईल, चालतानाही मोबाईल, गाडीवर मोबाईल, अहो एवढंच काय तर बाथरूममध्ये सुध्दा मोबाईल, हा अतिरेकपणाचा कळस झाला. कोणत्या वस्तूच्या किती आहारी जावं हे मात्र माणसाने विचार करण्यासारखे आहे. थोडा जरी वेळ मिळाला तरी काढला मोबाईल की लागले हे स्वतःत रमायला. सुरुवातीच्या



काळात दळणवळण तथा संदेशवहनाचे साधन होते, तेच मृत्यूच्या खाईपर्यंत घेऊन जाणारे साधन झालं आहे.

गेम्सचं तर विचारूच नका, प्रचंड धुमाकूळ घातला आहे या डिजिटल गेम्सने. पब्जी सारख्या गेमने तर कित्येकांना मृत्यूच्या स्वाधीन केले आहे. काहींना गेम खेळू दिलं नाही म्हणून आपल्या जवळच्यांचाच घात केला आहे. मोबाईल दळणवळणाचे साधन राहिले नसून मृत्यूचा एक सापळाच झाला आहे. मोबाईलचा वापर किती करावा याला काहीच मर्यादा उरली नाही. मोबाईलचा अतिरिक्त वापर आज सर्वांच्याच विनाशाला कारणीभूत ठरला आहे. सतत मोबाईलकडे पाहिल्याने डोळ्यावर होत असलेले विघातक परिणाम काहींना जाणवू लागले आहेत. डोळ्यांना नंबर लागणे, दिसण्यास कमी होणे. मोबाईलमुळे कितीतरी मनोरुग्ण सुध्दा झालेले आहेत. मोबाईलमुळे माणसाला एकलकोंडेपणा चिकटला आहे. कोणाशी कसला संवाद नाही. त्यामुळे प्रेम, आपुलकी, सहानुभूती या प्रत्येकाच्या भावना अतृप्तच राहत आहेत. एकमेकांबरोबरचे संवाद, संभाषण कमी झाले. परिणामी एकमेकांच्या सुख दुःखात सहभागी होणे, इतरांना आपले मानणे या गोष्टी आज दुरापास्त झालेल्या आहेत. एखाद्याला आजारपणात भेटायला गेल्यावर आजारी व्यक्तीची चौकशी करण्याऐवजी स्वतःच्या मोबाईल मध्ये दंग होऊन माणसे बसतात. मोबाईलच्या अतिरेकामुळे विविध आजार उत्पन्न झाले आहेत.

पूर्वीच्या काळी परगावी काही काम असेल तर पत्रलेखन अथवा त्या गावी जाऊन निरोप दिला जात असे. काळ बदलल्यामुळे आज ती गरज राहिलेली नाही. आजच्या पिढीचा गैरसमज आहे की, मोबाईल मुळे आपला वेळ वाचतो, परंतु वाचलेल्या वेळेचा आपण किती सदुपयोग करतो हे महत्त्वाचे आहे. कारण क्षणात मोबाईलद्वारे निरोप देऊन आपण मोकळे होतो. खरं आहे की मोबाईलमुळे वेळ वाचतो, पण बाकी वेळ आपण सत्कारणी लागतो का ? काम न करता नुसते बसून कुठला शारीरिक व्यायाम नाही की काम नाही, त्यापेक्षा परगावी जाऊन निरोप दिला तर शारीरिक व्यायाम होत असे, एकमेकांबद्दल प्रेम आदरभाव वाढत असे.

घरामध्ये सगळ्यांकडे जर स्मार्टफोन असेल तर घरात कसलाही संवाद घडून येत नाही. जो तो आपल्या मोबाईलमध्ये व्यस्त. त्या घरातलं घरपण हरवून जातं. एकत्र बसून संवाद साधल्याने प्रेम आपुलकी नक्कीच वाढीस लागते. परस्पर विचारांची देवाण-घेवाण होते, एकमेकांचा सन्मान केला जातो, जिव्हाळा उत्पन्न होतो. मोबाईल हा आज एक स्लो पॉयझन सारखा झाला आहे. याचे वाढते प्रमाण एक दिवस माणसाला विनाशाकडे घेऊन जाणार आहे. मोबाईल वापरण्याचा काहीतरी वेळ असावा, पण दुर्दैवाने इतर काम आपण थोड्या प्रमाणात करतो आणि दिवसातला बराचसा वेळ मोबाईलच्या दुनियेत रममाण होतो. मोबाईलचा ना कुठला शारीरिक फायदा ना मानसिक. मानसिक स्वास्थ्य मात्र नक्कीच मोबाईलमुळे बिघडले जात आहे.

आता तर नेटवर्क कंपनीने देऊ केलेला डेटा संपवण्यासाठी जशी पाहणाऱ्यांची आणि मोबाईलच्या बॅटरीची स्पर्धाच आहे. अनलिमिटेड व्हॉइसकॉलमुळे तर लोक आपले काम सोडून फोनवर तासन-तास बोलत राहतात. काय बोलावं याचे तर भानच राहिले नाही. फक्त अमर्यादित मिळतंय म्हणून कसाही वापर करायचा हा माणसाचा मूळ स्वभाव गुणधर्म. ''फुकटचे धावलं बापलेक धावलं''अशी गत झाली आहे लोकांची. याचा आपल्या जीवनावर विघातक परिणामबरोबरच आपला अमूल्य वेळ ही आपण विनाकारण खर्ची घालत आहोत याचे भान ठेवणे गरजेचे आहे.

मोबाईलने लोकांचे ''विनाशकाले विपरीत बुध्दी'' असे झाले आहे. अगदी वयोवृद्ध मंडळी सुद्धा याला अपवाद राहिली नाही मोबाईल सारख्या एवढ्या छोट्या वस्तूंना आज मानवाचा एवढा विकसित मेंदू असूनही त्यावर कब्जा मिळवला आहे. मग प्रश्न असा पडतो की, मानवाने मोबाईलला निर्माण केला आहे की, मोबाईलने मानवाला. आपण तयार केलेल्या वस्तूच्या आपणच आधीन जात असू तर, आपल्या बुद्धीची वाटचाल कुठे होत आहे, हेही ध्यानी घ्यायला हवे. आपणच निर्माण केलेली वस्तू आपल्यासाठी हानीकारक ठरत आहे. या व्यसनातून बाहेर येण्यासाठी प्रबोधन होणे गरजेचे आहे नाहीतर घोडामैदान समोरच आहे. त्याचे परिणाम अल्पावधीतच प्रत्येकाला कळणार आहे. त्याकरिता आपला सावध पवित्रा असावा म्हणजे ही एक भविष्यात येणाऱ्या संकटाची चाहूलच आहे. मोबाईलचा गरजेपुरताच वापर करा अनावश्यक फोटोज, व्हिडिओज पोस्ट टाकणे आणि पाहणे टाळावे. विनाकारण फालतू गेम्स खेळत बसणे ही नक्कीच धोक्याचे आहे.

जवळजवळ बहुतांश व्यक्ती या व्यसनात अडकून पडल्यामुळे एक दिवस आपले स्वास्थ्य गमावून बसणार आहेत, त्याकरता वेळीच खबरदारी घ्यावी. चार तास मोबाईल पाहणाऱ्यांनी दोन तास, दोन तास पाहणाऱ्यांनी एक तास आणि एक तास पाहणाऱ्यांनी अर्ध्या तास यासाठी प्रयत्न करावा तरच आपण भविष्यात आनंदी आणि समाधानी जीवन जगू व इतरांनाही जगू देवू हे निश्चित आहे.

✦ ✦ ✦ ✦



*कायद्यापुढे सगळे लहान आहेत.*

ललित

# मराठी अमुची राजभाषा असे

उज्ज्वला गुलाब सुतार
एम.ए.द्वितीय वर्ष

"लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढया जगात माय मानतो मराठी"

२७ फेब्रुवारी मराठी साहित्याचे भूषण वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस. आज महाराष्ट्रात सर्वत्र मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. मराठी भाषेला सन्मान मिळवून देण्यासाठी कुसुमाग्रजांनी आयुष्यभर प्रयत्न केले. विशाखा हा कवितासंग्रह आणि नटसम्राट हे नाटक या त्यांच्या दोन गाजलेल्या साहित्यकृती. मराठी माणसाच्या मनावर या साहित्यकृती कित्येक दशके गारूड घालून आहे. त्यांच्या साहित्य सेवेसाठी त्यांना ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. मराठी राजभाषा दिन या दिवसाला मराठी भाषा दिवस, मराठी भाषा गौरव दिन, मराठी भाषा दिन अशा विविध नावाने संबोधले जाते.

मराठी भाषा ही भारतातील प्रमुख भाषांपैकी एक आहे. मराठी भाषा जगातील लोकसंख्येत सर्वाधिक बोलली जाणारी पंधरावी भाषा आहे, तर भारतातील लोकसंख्येत बोलली जाणारी तिसरी भाषा आहे. मराठी भाषेचा उगम नवव्या शतकापासून झालेला आपल्याला दिसतो. पैठण येथील सातवाहन साम्राज्याने महाराष्ट्री भाषेचा प्रशासनात सर्वप्रथम वापर केला. देवगिरीच्या यादव काळात मराठी भाषेची समृद्धी, भरभराट झाली. इसवी सन बाराशे अष्ट्याहत्तर मध्ये म्हाइंभट यांनी लिळाचरित्र लिहिले आणि संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की -

"माझी मराठीची बोलू कौतुके,
परी अमृताहे पैजा जिंके"


म्हणजेच आपली मायबोली अमृतालाही पैजेत जिंकेल अशी आहे. संत एकनाथ महाराजांनी मराठी भाषेतून भारूडे लिहिली. अशा अनेक संतांनी मराठी भाषेचा उपयोग आपल्या जीवनामध्ये केला आहे. अशा प्रकारे अतिप्राचीन व समृद्ध अशी परंपरा मराठी भाषेला आहे. जननी, जन्मभूमी यांच्याबरोबरच माणसाला प्रिय असते ती त्याची जन्मभाषा, मातृभाषा म्हणजेच मायबोली. महाराष्ट्रातील सर्वजण आम्ही मोठ्या अभिमानाने सांगतो,

'मराठी असे आमची मायबोली
जरी भिन्न धर्मानुयायी असू'

आपली मायबोली फार पुरातन आहे. मराठी भाषेची परंपरा फार उज्वल आहे. मराठी भाषा ही नवव्या शतकापासून प्रचलित आहे. तिची निर्मिती संस्कृत पासून झाली आहे. महाराष्ट्र आणि गोवा या दोन राज्यांची मराठी ही अधिकृत राजभाषा आहे. मराठीत फार मोठे लेखक तसेच कवी होऊन गेले आणि आजही आहेत. उदाहरणार्थ वि. स. खांडेकर, बाबासाहेब पुरंदरे, अच्युत गोडबोले इत्यादी. मराठी भाषा ही शब्दसंपत्ती, काव्य संपत्ती, साहित्य संपत्ती यांनी समृद्ध आहे. मराठी भाषा ही महाराष्ट्र राज्याची अधिकृत भाषा आहे. आपल्या भारत देशातील २२ अधिकृत भाषांपैकी मराठी भाषा ही एक भाषा आहे. मराठी भाषा ही जास्त प्रमाणात महाराष्ट्र राज्यामध्ये वापरली जाते. गोवा, गुजरात, मध्यप्रदेश, तामिळनाडू, छत्तीसगड या ठिकाणी-सुद्धा मराठी भाषा बोलली जाते. आपली मराठी भाषाही भारत देशात तर बोलली जातेच त्याचबरोबर फिजी, मॉरिशस व इस्त्राईल या देशातही बोलली जाते. अनेक संतांनी मराठी भाषेचा उपयोग आपल्या जीवनामध्ये केला. संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ मराठी भाषेतून लिहिला. अनेक संतांनी मराठी भाषेची रचना करून मराठीमध्ये भर घातली.

संतांनी त्यांच्या साहित्यातून मराठी भाषेचा गौरव केला आहे. आपल्या देशातील कवी, लेखक यांनी आपल्या लेखणीतून तसेच कवितांमधून मराठी साहित्यात मोलाचे योगदान दिले. छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्या मातीचे रक्षण केल्यामुळे मराठी भाषा सुध्दा सुरक्षित झाली.

मराठी भाषेला अजूनही अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झालेला नाही. मराठी ही मृत्युपंथाला लागलेली भाषा आहे, असे इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी म्हटले आहे. मराठी भाषेची होत असलेली दुर्दशा दिवसेंदिवस वाढत आहे. मराठी भाषेची स्थिती बदलणे काळाची गरज आहे. हल्लीच्या पिढीला मराठी भाषा बोलण्याची लाज वाटते यापेक्षा वाईट काय असेल ? बोलण्याबरोबरच आपली मातृभाषा असण्याचा अभिमान बाळगला पाहिजे. आपण मराठी भाषेला विश्वभाषा होण्याचा सन्मान प्राप्त करून दिला पाहिजे. आज आमच्या मराठीचा इतिहास रूढ होण्याची गरज आहे. भाषा व वाङ्‌मयाच्या पातळीवर कथा, काव्य, नाटक, सिनेमा, कादंबरी, आत्मकथन गीत हे सारं समृध्द लेखन मराठीत दृष्ट लागावी इतकं श्रेष्ठ लिहिलं गेलं पाहिजे. मराठी भाषेने प्रत्येकाला जगण्याचा मार्ग आणि ओळख दिली आहे.



मराठी भाषेच्या सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन केले पाहिजे. मराठी माणूस आणि त्याची साहित्य कृती आणि साहित्य रूची जोपर्यंत आहे तोपर्यंत मराठी भाषेला मरण नाही. कवी कुसुमाग्रजही सांगतात-

"माझ्या मराठी मातीचा,
लावा ललाटास टिळा,
हिच्या संगाने जागल्या,
दऱ्याखोऱ्यांतील शिळा"

'मराठी असे आमुची मायबोली, जरी आज ती राजभाषा नसे ।' असे कवी माधव ज्युलियन यांनी म्हटले आहे. त्या काळात मराठीला राज्यभाषेचे स्थान नव्हते. तरीही प्रत्येक मराठी भाषेचा प्रखर अभिमान वाटत होता आणि आता तर मराठी ही महाराष्ट्राची राज्यभाषा आहे. माझ्या मराठीला फार मोठी जुनी परंपरा आहे. अगदी नवव्या-दहाव्या शतकात मराठीत कोरलेले शिलालेख आज उपलब्ध आहेत. तेराव्या शतकात लिहिलेली 'ज्ञानेश्वरी' हा मराठी भाषेतील प्राचीन ग्रंथ, तेव्हापासून आजपर्यंत मराठी भाषा अनेक अंगांनी समृध्द होत गेली आहे.

"घासल्याशिवाय धार नाही
तलवारीच्या पातीला
मराठीशिवाय अर्थ नाही
महाराष्ट्राच्या मातीला....."

आपली मराठी भाषा सामर्थ्यवान आहे. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आपण मराठीचा जास्तीत जास्त वापर केला पाहिजे. तरच मराठी राजभाषा दिन साजरा करण्याला खरा अर्थ प्राप्त होईल. त्यासाठी मराठी राजभाषा दिनाच्या निमित्ताने शाळा-कॉलेजमध्ये निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आयोजित केल्या पाहिजेत. तसेच मराठी नाटके, काव्य संमेलन, मराठी संगीताचे कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत. आता ज्ञानाची कोणतीही शाखा मराठीला अनोळखी राहिलेली नाही. विज्ञान, यंत्रशास्त्र, तंत्रशास्त्र, वैद्यक, न्याय, सर्व शास्त्रे, विविध कला इत्यादी अनेक विषयांवर शेकडो उत्तमोत्तम ग्रंथ मराठी भाषेत लिहिले जातात, ज्ञानेश्वरांपासून आजच्या अनेक नामवंत लेखकांपर्यंत अनेकांनी उत्तमोत्तम वाङ्‌मय निर्माण केले आहे.

मराठी भाषेतील ग्रंथाचे आता अनेक भाषांमध्ये भाषांतर झालेले आहे. माझी मराठी भाषा अमृताहूनही श्रेष्ठ दर्जाची आहे. अशा या मराठीचा मला खूप अभिमान वाटतो.

"वाहते रक्तात माझ्या मराठी
गर्वाने सांगतो, आहे मी मराठी,
संस्कृती माझी माय ती मराठी
अभिमानाची ती माय मराठी"

✦ ✦ ✦ ✦



*जगात असे एकच न्यायालय आहे की जेथे सर्व गुन्हे माफ होतात ते म्हणजे आईचे प्रेम.*

माहितीपर

# आभासी चलन

ऐश्वर्या राहुल डाके
तृतीय वर्ष वाणिज्य

मानवाने जसजशी प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरू केली तसतशा त्याच्या गरजा वाढू लागल्या. आपल्या नानाविध गरजा भागविण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व वस्तू एकट्याने निर्माण करणे एका व्यक्तीला अशक्य होऊ लागले त्यामुळे गरजांच्या पूर्ततेसाठी माणूस दुसऱ्यांवर अवलंबून राहू लागला. त्यामुळे आपण निर्माण करीत असलेल्या वस्तूंच्या बदली हव्या असलेल्या अन् या सर्व वस्तू मिळविण्याचा तो प्रयत्न करू लागला. परिणामी वस्तूविनिमयाची पद्धती अस्तित्वात आली. परंतु, या पद्धतीत अनेक अडचणी होत्या. या अडचणी टाळून देवघेव सुलभ व्हावी, या दृष्टीने एकाच वस्तूचा विनिमय माध्यम म्हणून शोध घेणे क्रमप्राप्त झाले. मानवाने जेव्हा विनिमयाचे माध्यम म्हणून एका वस्तूची निवड केली तेव्हा चलन अस्तित्वात आले.

चलन व्यवस्थेच्या इतिहासाच्या एका टप्प्यावर सोने, चांदी, तांबे अशा धातूंची नाणी उपयोगात होती. त्यानंतर कागदी चलनाच्या नोटा वापरात आल्या. बँक व्यवस्था वाढत गेली तसे फक्त चलनावरच नव्हे तर, बँकेत ठेवलेल्या रकमेच्या आधारे व्यवहार होऊ लागले. दुसऱ्या महायुद्धानंतर प्रमुख देशांची अर्थव्यवस्था खिळखिळी झाली. देशाच्या चलनाच्या विनिमय दरात सुसूत्रता आणणे आवश्यक झाले. १९४४ मध्ये ब्रिटन बॉड्स मधील आंतरराष्ट्रीय परिषदेत आंतरराष्ट्रीय चलन नियंत्रणाची नवीन प्रणाली जन्माला आली.

सध्या सर्वत्र चर्चेत असणाऱ्या अगदी अल्पावधीत प्रचंड फायदा मिळवून देणाऱ्या आणि तरुण पिढीला अगदी वेगाने आकर्षित करणाऱ्या क्रिप्टोकरन्सी बाबतीत बोलायचे झाले तर, जेव्हापासून जगाला 'बिटकॉइन' आणि 'एथेरियम' यांसारख्या दिग्गज क्रिप्टोकरन्सी सोबत ओळख झाली तेव्हापासून जगभरात एका नव्या पर्वाला सुरुवात झाली.

'आभासी चलन' ही संकल्पना आता जवळपास दशकभर जुनी झाली आहे. आभासी चलन अर्थात क्रिप्टोकरन्सी हे संगणकीय अल्गोरिदमच्या आधारे निर्माण करण्यात आलेले चलन आहे. इतर सर्व कागदी चलन व्यवहारात आणताना त्याला सरकारी पाठबळ असते. पण सोने, हे कोणत्याही सार्वभौम सत्तेच्या पाठिंब्याशिवाय जगात सर्वत्र चलन म्हणून चालू शकते. सर्वाधिक जोखीमही आजच्या डिजिटल जगात अशाच प्रकारच्या चलनाची संकल्पना व क्रिप्टोकरन्सी रूपाने प्रकटली आहे.

क्रिप्टोकरन्सी ही एक इलेक्ट्रॉनिक प्रणाली आहे. तिचा वापर आपण इंटरनेटच्या माध्यमातून नेहमीच साधारण चलना ऐवजी



वस्तू किंवा सेवा खरेदीसाठी करू शकतो. सोप्या भाषेत म्हणायचे झाले तर क्रिप्टोकरन्सी ही एक डिजिटल मालमत्ता आहे. ज्याच्यावर सेंट्रल बँक किंवा कोणत्याही इतर आर्थिक संस्थांचे कोणतेच नियंत्रण नसते. या चलनाला आभासी चलन संबोधले जाते.

क्रिप्टोकरन्सीचे अनेक प्रकार आहेत. परंतु, या सर्व क्रिप्टोकरन्सीमध्ये जगात सर्वात लोकप्रिय झालेली करन्सी म्हणजे 'बिटकॉइन' . २००९ मध्ये 'सातशी नाकामोतो' नावाच्या एका अभियंत्याने बिटकॉइन ही संकल्पना जन्माला घातली. एक संगणकीय प्रोग्राममधील गणितीय आकडेमोड करून बिटकॉईन अस्तित्वात आले. त्यानंतर गेल्या दशकभरात शेकडो प्रकारच्या क्रिप्टोकरन्सी संगणकीय जगतात निर्माण झाल्या. मात्र बिटकॉईन या आद्य आभासी चलनाचे मूल्य तर आकाशाला गवसणी घालत आहे. भारतीय रुपयाच्या चौकटीत सांगायचे झाले तर एका बिटकॉईनचे मूल्य जवळपास ३८ लाख ६१ हजार रुपये इतके आहे. म्हणूनच आजच्या काळात अनेक प्रोग्रामर या बिटकॉईनला अधिक सुरक्षित आणि मजबूत बनविण्यासाठी प्रयत्न करीत आहे. बिटकॉईनची सुरुवात करण्यामागचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे, चलन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी कोणत्याही तृतीय पक्षाच्या किंवा केंद्र सरकारच्या हस्तक्षेपाशिवाय पाठवणे हा होता. जगभरात यासाठी लागणारे सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहेत.

ज्याप्रमाणे नाण्याला दोन बाजू असतात त्याचप्रमाणे क्रिप्टोकरेन्सीचे तोटे देखील आहेत, हे विसरून चालणार नाही. क्रिप्टोकरन्सी हे एक प्रकारे सरकारच्या चलन निर्मितीच्या अधिकाराला दिलेले आव्हानच. देशाच्या सीमा क्रिप्टोवर बंधन घालू शकत नाही, त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यवहारात सरकारी नियंत्रण धाब्यावर बसवले जाते, म्हणूनच व्हर्चुअल चलनाला आधुनिक काळातील महामारी असे म्हटले जाते. याचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे ही चलने आभासी आहेत, सरकारी नियंत्रणाबाहेर आहेत, त्यांच्या किंमती अतिशय धोकादायकपणे चढतात आणि गडबडतात. अनेक अवैध आणि बेकायदा व्यवहार यात बेमालूमपणे करणे शक्य असल्याने अंडरवर्ल्डचाही मोठा हात त्यात आहे. डार्क नेट मध्ये अशी चलने सर्रास वापरली जातात. हॅकिंगमुळे क्रिप्टो एक्सचेंजचे कोट्यावधी डॉलर चोरीला गेल्यामुळे ते एक्सचेंजमध्ये बुडाले व अनेकांना फटका बसला या सगळ्यांची सरकारला मोठी डोकेदुखी आहे.

२००० च्या आसपास हजारो डॉट कॉम कंपन्या कावळ्याच्या छत्र्यांप्रमाणे वाढल्या आणि कोसळल्या तेव्हा अनेकांचे शंभर टक्के नुकसान झाले. आज वीस वर्षानंतर मागे पाहताना जगातील सर्वात मौल्यवान कंपन्यांमध्ये ॲमेझॉन, गुगल, फेसबुक सारख्या डॉट कॉम कंपन्या आघाडीवर आहेत हेही नजरेआड करून चालणार नाही.

आज बिटकॉइनसह शेकडो आभासी चलने अस्तित्वात आहेत. जी अनेक देशांच्या मध्यवर्ती बँकांच्या नियमनाच्या कक्षेबाहेर आहेत. एल साल्वाडोर व्यतिरिक्त जगातील इतर कोणत्याही देशाने बिटकॉईनला अधिकृत व्यवहाराचा दर्जा दिलेला नाही. परंतु, जगभरात ज्या पद्धतीने या चलनांची खरेदी-विक्रीच्या गुंतवणुकीचा पर्याय म्हणून स्पर्धा सुरू आहे ते पाहता जगभरातील अर्थतज्ज्ञ आणि सरकारचे कान टवकारले आहेत.

आज जरी आभासी चलन कायद्याच्या चौकटीत बसत नाही तरीही, या आभासी चलनांची उलाढाल अब्जावधी डॉलरच्या घरात आहे. यामुळे नफा जास्त असला तरी यामध्ये तोट्याचे गणितही त्याच प्रमाणामध्ये असते. म्हणूनच एखादे नवे तंत्रज्ञान वा नवा प्रवाह थोपवता येत नाही. विचार करावा लागतो तो, नियमांचा. त्यादृष्टीने सरकारला पावले उचलावी लागतील. सर्वसामान्यांच्या दृष्टीने मात्र हा आगीशी खेळ आहे, म्हणून सरकारने यावर नियमन करण्याचा निर्णय घेतला आहे.

✦ ✦ ✦

## पाठीशी कृष्ण हवा



मौनानं होतं एवढं रामायण
हे माहीत असतं तर
शब्दांच्याच स्वाधीन झाले असते,
पण शब्दांनी नेली असती मिरवणूक
भलत्याच दिशेला.
शब्द म्हणजे अंध कौरव;
ओठात एक, पोटात भलतंच.
मौनाचं रामायण सहन करता येतं
सीता होऊन,
पण शब्दांचं महाभारत सोसायला
पाठीशी कृष्ण हवा.

**अंकिता अविनाश काळे**
**द्वितीय वर्ष वाणिज्य**



*दोन गोष्टी कधीच वाईट नसतात. एक आपली आई आणि आपली जन्मभूमी.*

वैचारिक

# गंध फुलांचा सांगून गेला

प्रणाली भागवत
तृतीय वर्ष वाणिज्य

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महात्मा गांधीजींनी हाक दिली ''खेड्याकडे चला''. त्या काळात आपल्या देशाला सर्व बाजूंनी स्वयंपूर्णतेकडे नेणे आवश्यक होतं. याच शतकाच्या शेवटच्या दशकात आपण जागतिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारले. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करायला सुरुवात केली. त्यामुळे सगळे जग जवळ आले. शहरीकरणाचे प्रमाण वाढले. औद्योगीकरण, शहरीकरण, प्रगतीच्या नावाखाली आपल्या वागण्यामध्ये, राहणीमानामध्ये इतके बदल झाले की, त्यामुळे प्रदूषण वाढले, पर्यावरण बिघडले, जागतिक तापमानात वाढ झाली आणि एकविसाव्या शतकाच्या आरंभी म्हणावे लागले की पर्यावरण संवर्धनाकडे चला.

आज पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. आपण जलप्रदूषण, वायू प्रदूषण, भू-प्रदूषण कमी करण्यासाठी, पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न सुरु केले आणि आजही ते करत आहोतच. परंतु तरीही परिस्थिती आटोक्यात आली नाही. आपण पाहतो की, विविध मोठ्या शहरांची व लगतच्या नद्यांची प्रदूषण पातळी प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे. ती इतकी वाढली की तिने धोक्याची पातळीही ओलांडलेली आहे यावर उपाय काय करायचा याचा विचार अनेक पातळ्यांवर सुरू होता. काही उपाय करायलाही सुरुवात झाली आणि तेवढ्यात... जगावर संकट ओढवले ते कोरोना विषाणूचे. संकटाकडे आपण नेहमी वाईट नजरेने पाहतो. संकट आले की, आपल्याला दुःख होते. संकट म्हणजे निसर्गाने आपल्याविरुद्ध केलेला चांगला कट आहे. अशा प्रसंगातून निसर्ग आपल्याला शिकवत असतो. त्याकडे आपण सकारात्मक पद्धतीने पहायला शिकले पाहिजे. सध्याच्या काळात कोरोनाचा संसर्ग झाला व आपल्याला संदेश मिळाला. स्वतःची व कुटुंबाची काळजी घ्या, घरात रहा, सुरक्षित रहा, स्वच्छतेचे नियम पाळा ही तीन वाक्य आहेत. त्यांनी आपल्याला जीवनाचा मूलभूत मंत्रच दिला आहे.

यातील पहिला संदेश सांगतो ''Turn in- आत वळा''. मी आज पर्यंत जे धावपळीचे जीवन जगत होतो, त्यातून वेळ काढून स्वतःचा विचार करा कुटुंबाचा विचार करावा. या काळात अनेक कुटुंबे एकत्र आली. त्यांच्यातील जिव्हाळा प्रेम वाढला. घरातच असल्यामुळे कुटुंबाला मुलांना आई-वडिलांना वेळ देताना त्यांना समजून घेता आले. त्यामुळे कौटुंबिक बंध घट्ट झाले. भारतीय संस्कृतीचे पुनरागमन झाले. स्वच्छतेचे नियम पाळल्यामुळे सर्वांचे आरोग्य सुधारले, त्याचबरोबर पर्यावरणही प्रदूषण मुक्त झाले. शहरांची व नद्यांची प्रदूषण पातळी कमी होऊन हवा स्वच्छ झाली. नद्या दुथडी भरून आनंदाने मोकळा श्वास घेत वाहू लागल्या.

आपण बारकाईने पाहिले तर निसर्गातील प्रत्येक गोष्ट आपल्याला जीवनाचा संदेश देत असते. पण प्रश्न असा आहे की, तो संदेश आम्ही समजावून घेतो का ? आता हेच पहा ना फुले आपल्याला कितीतरी गोष्टी शिकवतात अनेक कवी म्हणतात, फुलांसारखे भाव किमान फुलांसारखे होण्याचा प्रयत्न तरी करा. कशी असतात फुले ? तर मुक्त, निसर्ग, प्रकाश, सूर्यकिरण, हवा इत्यादी अनेक गोष्टींसाठी मोकळी असतात. ती सतत आपल्या आजूबाजूच्या वातावरणातून दूषित विचार शोषून घेतात व आनंदाने सौंदर्य भरभरून देत असतात. ही फुले मनमोकळी असतात, जेणेकरून प्रत्येक जण त्याचा आस्वाद आनंद घेऊ शकेल. त्यांच्याकडे समता आहे. कोणताही भेदभाव ही फुले करत नाहीत. आपल्याला त्यांच्या सौंदर्याचा आनंद घेता आला पाहिजे. त्यांचा सहवास आनंददायी आणि उत्साह वाढवणारा असतो. तीच व्यक्ती नेहमी आनंदी राहू शकते की, जी फुलाप्रमाणे आपले गुण इतरांबरोबर वाटून घेते म्हणून फुलांचे गुण आपल्यात जोपासण्याचा आपण प्रयत्न करू या. पुढची पिढी आरोग्यसंपन्न, बुद्धिमान, सुसंस्कारित होण्यासाठीची सुरुवात स्वतःपासून, स्वतःच्या कुटुंबापासून करूया.

✦ ✦ ✦

ललित

# सूर्यनमस्कार - एक सर्वांग परिपूर्ण व्यायाम

प्रा. भाऊसाहेब गंगाधर थोरात
शारीरिक शिक्षण संचालक

सूर्य हा सर्व प्राणीमात्रांचा जीवनदाता असून तो ऊर्जेचा अखंड स्त्रोतच होय. प्रभात काळी सूर्य नारायणाचे दर्शन घडताच कळत नकळत हात जोडले जातात. भल्यापहाटे उगवत्या सूर्याचे कोवळे किरण, दुपारी माथ्यावर सूर्य असतानाचे किरण आणि मावळत्या सूर्याचे मृदू किरण सर्वच स्थितीमध्ये सूर्यकिरणांचा परिणाम आपल्या शरीरावर होत असतो. सूर्यनमस्कार घालताना फारसा थकवा येत नाही. सूर्यनमस्कार हा दमण्याचा, कष्टाचा व श्रमाचा विषय नसून तो एक आल्हाददायक व्यायाम आहे. सूर्यनमस्कार घालताना शरीराच्या हालचाली, श्वासोच्छवास व मंत्र उच्चार हे महत्त्वाचे घटक आहेत.

सूर्यनमस्काराचे महत्व केवळ शरीर स्वास्थ्यापुरतेच मर्यादित नसून संपूर्ण व्यक्तिमत्वाचा विकास त्यात अंतर्भूत आहे. शरीर, मन, बुद्धी व आत्मा यांचा परस्पर संबंध लक्षात घेऊन योग्य शास्त्राने आसनांची, प्राणायामाची व सूर्यनमस्काराची योजना केली आहे. दीर्घ आयुष्य, उत्तम कार्यशक्ती, अमाप उत्साह, तेज, लवचिकता, चपळाई, संपूर्ण शरीराच्या अंतर्गत इंद्रियांना व बाह्य इंद्रियांना, स्नायूंना व सांध्यांना व्यायाम इत्यादी शारीरिक व मानसिक धनदौलत मिळवून देण्यासाठी सूर्यनमस्कार हा सर्वांग परिपूर्ण व्यायाम आहे. म्हणून सर्व विश्वातील बहुसंख्य नागरिकांनी आपले जीवन निरोगी व आनंदमय होण्यासाठी सूर्यनमस्कार अभियानात सहभाग घेतला आहे. म्हणून सूर्यनमस्कार हा प्रत्येक व्यक्तीच्या दैनंदिन जीवनातील एक महत्त्वाचा भाग झाला पाहिजे.

सूर्यनमस्काराची आपली परंपरा खूप प्राचीन आहे. तो एक सर्वांग परिपूर्ण असा व्यायाम आहे. शरीराच्या हालचाली व अंतर्गत कार्यरत असलेल्या विविध यंत्रणा, अंतस्त्रावी ग्रंथी, मन व आंतरिक शक्ती केंद्रे अशा सर्व अंगांना स्पर्श करणारा, आयुष्य समृद्ध करणारा असा हा व्यायाम. सूर्यनमस्काराच्या बारा स्थितीमध्ये पायाच्या अंगठ्यापासून डोक्यापर्यंत अन हाताच्या बोटांपर्यंत सर्व भागांना व्यायाम होतो. आजच्या या धकाधकीच्या जीवनात मानवाला आरोग्य फार महत्त्वाचे आहे, त्यात त्याला वेळही नसतो म्हणून कमीत कमी वेळेत अधिक परिणामकारक व्यायाम देणारा हा व्यायाम प्रकार होय. सूर्यनमस्काराकडे केवळ शारीरिक व्यायाम म्हणून न पाहता अध्यात्मिक दृष्टीने पाहणे ही जास्त कल्याणप्रद ठरेल. सूर्याच्या नावाच्या मंत्रोच्चारालाही महत्त्व दिले आहे यामुळे मंत्राचे अनुष्ठान सिद्ध होते. सूर्यनमस्काराचा उपयोग मानवी शरीर व मनासाठी किती महत्त्वाचा आहे हे लक्षात घेता त्याचा अध्यात्मिक शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास होणे गरजेचे आहे.

योगासनातील काही आसने साखळीप्रमाणे एकमेकांना जोडून सूर्यनमस्कार तयार करण्यात आला आहे, योगातील श्वसनाला असलेले महत्त्व लक्षात घेता सूर्यनमस्कार करताना कोणत्या स्थितीमध्ये श्वसन कसे असले पाहिजे यालाही महत्त्व आहे. श्वसनाचे विविध विभागही लक्षात घेतले पाहिजे.

१. पूरक - श्वास घेणे   २. रेचक - श्वास सोडणे
३. कुंभक - श्वास रोखून धरणे
४. अंतर कुंभक - आत श्वास रोखून धरणे.
५. बाह्य कुंभक - बाहेर श्वास रोखून धरणे इ.

**सूर्यनमस्काराच्या १२ स्थिती, श्वसन प्रक्रिया व मंत्रोच्चार -**

सूर्यनमस्कार हा बारा अंकात करताना प्रत्येक अंकात कोणते आसन व कोणता मंत्र उच्चार करावयाचा आहे आता पाहू -

१. प्रणामासन - पूरक व रेचक - ओम मित्राय नमः
२. हस्त उत्तानासन - पूरक - ओम रवये नमः
३. पादहस्तासन - रेचक - ओम सूर्याय नमः

४. अश्व संचालनासन - ओम भानवे नमः

५. मकरासन - रेचक - ओम खगाय नमः

६. अष्ट नमस्कार - बाह्य कुंभक - ओम पुष्णे नमः

७. भुजंगासन - पूरक - ओम हिरण्यगर्भाय नमः

८. पर्वतासन - रेचक - ओम मरीचये नमः

९. अश्व संचालनासन - पूरक - ओम आदित्याय नमः

१०. पादहस्तासन - रेचक - ओम सवित्रे नमः

११. हस्त उत्तानासन - पूरक - ओम अर्काय नमः

१२. प्रणामासन - रेचक - ओम भास्कराय नमः

अशा प्रकारे एकूण आठ योगमुद्रा या सूर्यनमस्काराच्या बारा स्थितीमध्ये अतिशय सुंदररीत्या गुंफल्या आहेत. आपल्या क्षमतेनुसार रोज करणे. त्यात एक ते बारा स्थिती, श्वसनाची पूरक, रेचक, कुंभक यांची योग्य सांगड व मंत्रोच्चार याकडेही लक्ष द्यावे.

**श्वसन प्रक्रिया व मंत्राचे महत्व -**

श्वसन प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा स्नायू म्हणजे श्वास पटल. याचा सूर्यनमस्काराशी महत्त्वाचा संबंध आहे. श्वास पटलाची हालचाल श्वसन क्रियेच्या वेळी मेंदूतील श्वसन केंद्राशी निगडित असते, श्वास रोखून धरल्यावर रक्तातील कार्बन-डाय-ऑक्साइड वाढून श्वसन केंद्र उत्तेजित होते. हृदयाला आधार देणारा श्वासपटल आकुंचन पावल्यावर फुफ्फुसात हवा भरली जाते व रक्ताभिसरणाला चालना दिली जाते व जठरावर दाब देऊन अन्नपचनाचा अग्नी प्रज्वलित होतो. पुरक करते वेळी श्वास पटलाचे आकुंचन होते, कुंभकाच्या काळात आहे त्या स्थितीत तो थांबतो आणि रेचकाच्या प्रक्रियेत आकुंचन पावलेले श्वासपटल पूर्वस्थितीत येते.

सूर्यनमस्काराच्या एक ते बारा स्थितीमध्ये श्वास घेण्याच्या आणि सोडण्याच्या क्रियेला फार महत्त्व आहे. प्रत्येक स्थितीमध्ये पूरक, रेचक, कुंभक योग्य प्रकारे केल्यास श्वास पटलाचा व फुफ्फुसाचा अतिशय सुंदर आणि परिपूर्ण व्यायाम होतो. सूर्यनमस्कारातील १२ स्थितीच्या मंत्रात ओमकार आहे. या मंत्रात सर्वच वर्णाक्षरे अंतर्भूत आहेत. सर्व चक्रांना चेतना देण्याची क्षमता आहे. मानसिक आरोग्यासाठी तसेच शरीराच्या विविध भागांवर ध्वनीकंपन होऊन शारीरिक व मानसिक व्याधी दूर होण्यासाठी व मनाला प्रसन्नता, एकाग्रता व आत्मविश्वास प्राप्त होण्यासाठी ओमकार मंत्राचा उपयोग होतो. दररोज नऊ सूर्यनमस्कार केले तरी १०८ मंत्राचा जप म्हणजे एक माळा मंत्रोच्चार केल्याचे आत्मिक समाधान मिळते.

**सूर्यनमस्कार घालताना घ्यावयाची दक्षता-**

१. सकाळी शौचास झाल्यानंतर रिकाम्या पोटी कोवळ्या उन्हात सूर्याकडे तोंड करून सूर्यनमस्कार केल्यास स्वास्थ्यासाठी लाभदायक आहे.

२. स्वतःच्या क्षमतेनुसार हळूहळू रोज सूर्यनमस्काराची संख्या वाढवित जाऊन रोज कमीतकमी नऊ ते बारा केले तरी चालतील.

३. सूर्यनमस्कारापूर्वी थोड्या शारीरिक हालचाली करून मगच सूर्यनमस्काराला सुरुवात करावी. प्रत्येक स्थितीमध्ये दोन ते तीन सेकंद थांबून हळुवार पुढच्या स्थितीत जावे.

४. प्रत्येक स्थितीमध्ये श्वसन क्रियेतील पूरक, रेचक, कुंभक घाई न करता सावकाशपणे करावे.

५. आजारी असल्यास करू नये, तसेच पाठीचा त्रास, संधिवात, शस्त्रक्रिया झाली असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेऊनच करावे.

६. सूर्यनमस्कारानंतर शवासन अवश्य करावे त्यानंतर आसने व प्राणायाम केल्यास त्याचा अधिक उपयोग होतो.



**सूर्यनमस्काराचे लाभ -**

१. सूर्यनमस्कारामुळे सर्व अवयव आणि इंद्रियांना चालना मिळते, उत्तेजना मिळते. मेंदूलाही चालना मिळून त्यातील ग्रंथी, त्याचे भाग तसेच मज्जासंस्था कार्यक्षम होतात.

२. शरीराचे सर्व स्नायू लवचिक, सुडौल व सशक्त होतात. हाडांना बळकटी येते अनावश्यक चरबी कमी होऊन वाढलेले वजन कमी होते.

३. शौचाला साफ होते, पचनशक्ती वाढते व भूक वाढते.

४. स्त्रियांच्या मासिक पाळीच्या तक्रारी दूर होतात, गर्भाशय सशक्त होऊन त्याचे कार्य सुधारते.

५. दीर्घ आयुष्य, अमाप कार्यक्षमता, अमाप उत्साह व चपळाई इत्यादी तसेच शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य प्राप्ती लाभते.

६. श्वासोच्छवास आणि मन यांचा निकटचा संबंध आहे. सावकाश सूर्यनमस्कार केल्याने श्वासोच्छवास संथ व हळू होऊन प्राणशक्तीचा संचय होतो त्यामुळे मानसिक विकार व व्याधीपासून मुक्तता मिळते.

७. दैनंदिन व्यवहारामुळे ताठरलेले शरीरातील स्नायू सूर्यनमस्कारामुळे मोकळे व तजेलदार होतात. योगासन करण्यापूर्वी अवश्य सूर्यनमस्कार करावे.

८. मंत्रोच्चारातून मिळणारे आत्मिक सामर्थ्य प्राणशक्तीचे संतुलन व सूर्यशक्तीवरील श्रद्धेमुळे वैश्विक शक्तीची अनुभूती मिळण्याचे प्रभावी कार्य घडते.

९. उघड्या शरीरावर कोवळी सूर्यकिरणे पडल्यामुळे विटामिन डी प्राप्त होऊन हाडे मजबूत व बळकट होतात व त्वचा तजेलदार होते.

१०. सूर्यनमस्कारामुळे अंतरइंद्रियांना, बहुसंख्य स्नायूंना, विविध सांध्यांना सुखद व्यायाम घडतो त्याचा पचनसंस्था, रुधिराभिसरण संस्था व श्वसन संस्था यावर होणारा परिणाम फार मोलाचा ठरतो.

११. स्नायूंची तानन क्षमता वाढते, शरीराच्या वाकून चालण्याचा व वाकून बसण्याच्या स्थितीमध्ये सुधारणा होते.

१२. वात, पित्त, कफ यांना संतुलित ठेवता येते, सूर्यनमस्कार नियमित केल्याने रक्तदाब, हृदयरोग, मधुमेह या आजारावरही नियंत्रण ठेवता येते. व रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

सूर्यनमस्काराचे महत्त्व लक्षात घेतले तर ते केवळ शरीर स्वास्थ्य यापुरतेच मर्यादित नसून संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास त्यात अंतर्भूत आहे. शरीर, मन, बुद्धी व आत्मा यांचा परस्पर संबंध लक्षात घेता आत्म स्वरूपाची जाणीव करून देणारी ती एक उपासना आहे. शरीर पोषणासाठी नित्याचे भोजन, तसेच सूर्यनमस्कार नित्य घातल्याने ते शरीर स्वास्थ्य त्याप्रमाणेच चित्त स्वास्थ्यासाठी ही उपयुक्त ठरतो. ७५ कोटी सूर्यनमस्कार अभियान हे तेवढ्यापुरते मर्यादित न ठेवता प्रत्येक विद्यार्थ्याने व नागरिकांनी त्याला आपल्या दैनंदिन जीवनात नित्य स्थान द्यावे हेच महत्त्वाचे आहे. सर्व स्त्री-पुरुषांनी सूर्य नमस्काराचा व्यायाम अव्याहत केला तर त्याचे व त्याच्या संततीचे ही कल्याण होईल. अशा प्रकारे सूर्यनमस्काराचे अगणित फायदे लक्षात घेता तो एक सर्वांग परिपूर्ण व सर्वोत्कृष्ट व्यायामच होय. खरोखरच शारीरिक, मानसिक स्वास्थ्यासाठी ही एक अनमोल देणगीच आहे.

✦ ✦ ✦

## फौजी

"अगदी छोट्या छोट्या गोष्टीमध्ये सुख शोधणारा
व्यक्ती म्हणजे फौजी -
सहनशीलतेचा अंत
म्हणजे फौजी -
डोळ्यातील अश्रू संपलेला व्यक्ती
म्हणजे फौजी -
स्वतःच्या सुट्ट्या दुसऱ्याच्या प्लानिंग मध्ये घालवणारा
व्यक्ती म्हणजे फौजी -
जीवनातील सर्वात छान वर्ष देशासाठी हसत हसत घालवणारा
व्यक्ती म्हणजे फौजी -
कधी स्वप्न पडली तर दुसऱ्यांसाठी बघणारा व्यक्ती
म्हणजे फौजी -
कोणाच्या सुखात असतो की माहित नाही पण
प्रत्येक दुःखात उभे राहणारा व्यक्ती
म्हणजे फौजी -
तो मात्र सर्वांचा पण त्याच कोणीच नाही असा
व्यक्ती म्हणजे फौजी - " !!

**पल्लवी अशोक गधडे**
**द्वितीय वर्ष वाणिज्य**



*विशिष्ट हेतूकरिता केलेली मैत्री अखेरपर्यंत टिकत नाही.*

माहितीपर

# इतिहास विषयातील करिअरच्या संधी

आशुतोष नवनाथ सैद
तृतीय वर्ष कला

भारताला एक अतिप्राचीन इतिहास लाभलेला आहे. अगदी अनादी काळापासून या पृथ्वीवर मानवाचे वास्तव्य आहे. जगातील प्रगत व प्राचीन नागरी संस्कृती याच भूमीत उदयाला आल्या. आज वेगवेगळ्या ठिकाणी या गतकाळातील संस्कृतींचे अवशेष मोठ्या प्रमाणावर आढळून येतात. या अवशेषांचा अभ्यास व संशोधन करून पुरातत्तवशास्त्रज्ञ अनुमान काढत असतात. पण हे सर्व संशोधन करण्यासाठी संशोधकाने, अभ्यासकाने इतिहासाचा शास्त्रशुध्द अभ्यास करणे महत्वाचे आहे. इतिहास म्हणजे निव्वळ सनावळ्या नाही, तर वर्तमानकाळ व भूतकाळ यात कधीही न संपणारा संवाद होय. इतिहासाच्या अभ्यासाचे महत्व पदवी-पदव्युत्तर, एम.फिल., पीएच.डी. या पदव्या प्राप्त करण्यापुरते मर्यादित नाही. तर या विषयामध्ये शिक्षण घेऊन करिअरचे विविध पर्याय निवडता येतात.

**१) पुरातत्वशास्त्रज्ञ :**

पुरातत्वशास्त्र या विषयातून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया या केंद्र सरकारच्या संस्थेमध्ये करिअर करण्याची संधी मिळते. अशा संस्थांमध्ये क्युरेटर, प्रकल्प व्यवस्थापक, आणि संशोधक सहाय्यक म्हणून करिअर करता येते. ऐतिहासिक स्थळांच्या ओळखीपासून ते त्याचे जतन व संवर्धन करण्यासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न केले जातात. अशा स्थितीत इतिहासाचा हा वारसा जपून ठेवण्यासाठी पुरातत्त्वशास्त्रज्ञांना नवनवीन संधी उपलब्ध होत आहेत.

**२) पर्यटक गाईड :**

पर्यटनाच्या निमित्ताने पर्यटक वेगवेगळ्या ऐतिहासिक स्थळांना भेटी देत असतात. यावेळी संबंधित पर्यटन स्थळाचा सखोल अभ्यास केलेली व्यक्ती पर्यटकांना इत्यंभूत माहिती देऊ शकते. इन्फोटेनमेंट चॅनेलला नेहमी चांगल्या पर्यटक गाईडची गरज असते. त्यांना ब्रॉडकास्ट मिडियामध्ये देखील स्थान मिळते.

**३) संरक्षक आणि संग्रहालयशास्त्रज्ञ :**

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ म्यूझियम्स पदवी डिप्लोमा अभ्यासक्रम इतिहास विषयातून पूर्ण केल्यानंतर संरक्षक आणि संग्रहालयशास्त्रज्ञ म्हणून करिअर करता येते. याअंतर्गत म्युझियम मॅनेजमेन्ट, रिसर्च, जनसंपर्क ते डिझाइनिंग पर्यंत करिअर करता येते.

**४) इतिहासतज्ज्ञ :**

पदवी, पदव्युत्तर व संशोधन पातळीवर इतिहास विषयाचे सखोल अध्ययन केल्यानंतर इतिहास विषयाचे प्राध्यापक तसेच इतिहासाच्या क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणूनही करिअर करता येते.

**५) ताम्रपट व नाणकशास्त्र अभ्यासक :**

भांडी, ताम्रपट, किंवा नाणी हा एखादा कालखंड ओळखण्याचा, त्यावेळच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक पैलूंचा अभ्यास करण्याचा महत्वाचा पुरावा मानला जातो. यावरून ताम्रपट व नाणकशास्त्र अभ्यासक म्हणून करिअर करण्याची संधी इतिहास विषयाच्या माध्यमातून उपलब्ध होऊ शकते.

**६) इतिहास संशोधक :**

विविध विद्यापीठात तसेच महाविद्यालयात याशिवाय काही संस्थांमध्ये इतिहास अभ्यासकांची नितांत आवश्यकता असते. विविध विषयांवर संशोधन करून पुस्तके, लेख लिहिणे हे काम इतिहास संशोधक करतात. मुलभूत ऐतिहासिक लिखाण करणाऱ्यांची बरीच कमतरता सध्या दिसून येते. त्यामुळे हे क्षेत्रही करिअर करण्यासाठी उपलब्ध होऊ शकते.

अशा प्रकारे इतिहास विषयात पदवीधर शिक्षण घेतल्यास पुरातत्वसंशोधनशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, जीवाश्म अभ्यासक, फिजिओलॉजी तसेच सरकारी व बिनसरकारी क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर करिअरच्या संधी उपलब्ध होतात.

ललित

# बालपणाचा पुनर्शोध

तेजल सावळेराम विरणक
तृतीय वर्ष वाणिज्य

माणूस या व्यवहारी जगात लौकिक दृष्ट्या कितीही मोठा झाला तरी त्याने आपले हृदयातील लहान मूल जपून ठेवले पाहिजे. तरच त्याच्या मोठेपणाला अर्थ आहे. या नितळ भावनेतून सुनील यावलीकर यांनी आपल्या चित्रकलेची आराधना केली. त्यामुळेच त्यांची चित्रे डोळ्याद्वारे हृदयात आणि मेंदूवर एकाच वेळी परिणाम करतात. मन:पटलावरुन ती हटतच नाहीत. सतत एका जागी रेंगाळत असतात. सुनील यावलीकर यांच्या 'री एक्सफ्लोरिंग चाईल्डहूड' या चित्र प्रदर्शनाचे २२ ते २८ मार्च दरम्यान मुंबईत जहांगीर आर्ट गॅलरीत आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्ताने त्यांच्या चित्र प्रवासाचा व चित्रकलेचा हा घेतलेला आढावा.



बालवयातच चित्रांचे बोट पकडले. कागद, पेन्सिल, पाटीवरचा/ भिंतीवरचा नागोबा, बोटांनी गिरवलेली धुळ चित्रे यांच्याशी त्यांनी दोस्ती केली. सुट्टीच्या दिवसात शेतात कामाला जाऊन मिळवलेल्या पैशात रंगाचा डबा विकत घेतला, आणि मावळणारा चंद्र, सूर्य यांचे आपल्या मनानेच चित्र काढण्यास सुरूवात केली.

वास्तवात आपल्या तथाकथित आयुष्यावर आपले बालपण सदोदित प्रभाव करत असते. मात्र व्यवहारवादाच्या या आंधळ्या दौडीत अनेक मुखवटे चढवले जातात. मुखवट्यांच्याखाली आपला बालपणातील खरा निरागस चेहरा अंधाऱ्या कोपऱ्यात मलुल झालेला दिसतो. हा मुखवटा माणसांना वेळीच फेकून देणं जमलं असतं तर हे जीवन किती सुंदर झाले असते. वास्तवात ही जाणीव सुनीलजींना झाली आणि ते आपल्या बालपणाकडे वळले. त्यांचे स्वतंत्र अस्तित्व त्यांना मिळाले. लहान लहान बाबतीत जीवनाचा आनंद सामावला आहे. पण मोठ्या बाबतीत डोके खुपसून आपणच आपले जीवन कठीण करून घेतो या सत्याची जाणीव सुनीलजींना झाली.

आयुष्याच्या शेवटी माणसाला काय लक्षात राहते, तर बालपणातल्या निरागस गोष्टी. जसं की पतंग उडवणे आपण विसरूच शकत नाही, सायकल आपल्या जीवनाचा एक भाग होऊन जाते, काचेचे खेळणे सदैव आठवणीत राहते. भोवऱ्याचा खेळ मनात रुंजी घालत असतो तसेच आट्या-पाट्या, अंड फोडणी, हाताच्या ढोपराणे कंचे पुढे ढकलणे, आरसे वाला, बांगडी बिल्लोर वाला, आईस कँडी वाला या सर्व व्यक्तिरेखा पुनर्जीवित होऊन आपल्या आयुष्यात आल्या की काय असे वाटावे इतक्या सहजतेने ते चित्रबध्द करतात.

आयुष्याच्या या वळणावर आपले बालपण पुन्हा मिळवून देण्याचे महत्कार्य सुनील यावलीकर यांनी या 'री एक्स्प्लोरिंग' या चित्र मालिकेतून प्रत्यक्षात आणले आहे.

जहांगीर आर्ट गॅलरीतील हे चित्रप्रदर्शन बघता बघता मीही बालपणाच्या गुहेत शिरतोय की काय जिथे प्रकाशच प्रकाश आहे या जीवनाला सुंदर करणारा..... असा भास मला झाला !

✦ ✦ ✦ ✦



*तुमच्या नातेवाईकांची निवड नशिबाने केली आहे. मित्रांची निवड तुम्ही करा.*

वैचारिक

# फसव्या जाहिराती

प्रीती नवनाथ काळे
द्वितीय वर्ष बाणिज्य

भारतीय बाजारपेठ अभूतपूर्व गतीने खेड्यापासून शहरापर्यंत बदलते आहे. त्यामुळे सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत वर्तमानपत्रे, मासिके, आकाशवाणी, दूरदर्शन, सिनेमागृह, रस्त्यावरील होर्डींग्स ग्राउंड पासून ते खेळाडूच्या कपड्यांपर्यंत जाहिरातींचा सुळसुळाट पहावयास मिळतो. कोणी उत्पादक आपल्या नव्या उत्पादनाची ओळख देण्यासाठी तर कोणी आपली बाजारपेठ सुरक्षित ठेवण्यासाठी वारंवार जाहिराती करीत असतो, त्यामुळे ग्राहकांच्या डोक्यात एखादी वस्तू किंवा ब्रँड घर करून बसतो. आजच्या युगात आपले कोणतेही उत्पादन ग्राहकापर्यंत पोहोचवायचे झाल्यास उत्पादन कंपन्या जाहिरातींची मदत घेतात. आपल्या उत्पादनांची जाहिरात करून ते लोकांपर्यंत आपले उत्पादन पोहोचवतात. जाहिरात ही आजच्या युगात फार महत्त्वाची कला मानली जाते. उत्पादन कंपन्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या वस्तूंची जर जाहिरातच केली नाही तर ग्राहकांना त्या वस्तू बाबत माहिती कशी काय कळणार ? अशा विचाराने जाहिरातीने मानवाच्या जीवनामध्ये स्थान निर्माण केले आणि आज तिने मानवाचे सारेच जीवन व्यापून टाकले आहे. आता पाहिले तर ती नभोवाणी, दूरचित्रवाणी, संगणक आणि मोबाईल फोनच्या माध्यमातून जगाच्या प्रत्येक घरात जाहिरात घुसली आहे.

अजगराने कोणत्याही प्राण्याला गिळले की, तो कसा झाडाला विळखा घालून त्या प्राण्यांची हाडे मोडतो असे ऐकले आहे. खरेखरच आज जाहीरातींनी देखील माणसाला असाच विळखा घातलेला आपल्याला दिसून येतो. सकाळी उठल्यावर दात कोणत्या ब्रशने घासायचे ? त्यासाठी कोणती टूथपेस्ट वापरायची ? हे देखील जाहिरातच ठरवते. त्यानंतर आंघोळ करताना कोणता साबण अथवा शाम्पू वापरायचा ? ते देखील जाहिरातच माणसाला सांगत असते. सकाळचा नाश्ता बनवताना कोणते तेल वापरावे ? मसाले कोणते वापरावे ? हे देखील जाहिरातच ठरवून देते. आपण सकाळी व्यायाम करताना कोणती साधने वापरावी हे देखील जाहिरातच ठासून सांगत असते. ऑफिसमध्ये काम करताना किंवा व्यवसायात आपले व्यक्तिमत्व कसे फुलवायचे यासाठी आपला पोशाख कसा असला पाहिजे त्याचे तपशीलवार नियोजन जाहिरात करते. इतकेच नाही तर रात्री झोपताना उशी व गादी कोणती वापरायची ? ते ही जाहिरातच ठरवून देते. रात्री परस्परांना गुड नाईट करण्यापूर्वी आम्हाला डासांसाठी गुड नाईट करण्याचा संदेश जाहिरातच देते. पाहिलेत ना माणूस दिवसाच्या सुरुवातीपासून ते रात्री झोपेपर्यंत जाहिरातींच्या विळख्यात किती गुरफटला आहे !

I can’t eat this ! काय तुमचा मुलगा नीट जेवत नाही, दूध पीत नाही त्याचे पोषण कसे होणार ? त्याची उंची कशी वाढणार ? काही काळजी करू नका आमचे उत्पादन वापरून पहा बघा कसा फरक पडतो ते आमची दुधात मिसळायची पावडर तुमच्या मुलांना आवडणाऱ्या निरनिराळ्या स्वादात उपलब्ध आहे. त्यात तुमच्या मुलांची गरज असलेली लोह हे धातू आहेत. शिवाय जीवनसत्वेही आहेत. त्यामुळेच ते एक स्वादिष्ट पेय असून परिपूर्ण आहारही आहे. अशा प्रकारच्या जाहिराती आपण नेहमीच बघत असतो आणि त्यावर चटकन विश्वास ठेवतो. या जाहिरातींमध्ये किती तथ्य आहे याचा मात्र कधी अभ्यास किंवा शहानिशा आपण करत नाही. खरे पाहायला गेलो तर जाहिरात करणे ही सुध्दा एक कलाच आहे. जाहिरात करण्याचे एक शास्त्र आहे. जाहिरात अनेक काळाची पोशिंदा आहे. आज दूरचित्रवाणीवर, नभोवाणीवर जाहिराती येतात त्या संगीताच्या सहाय्याने अधिक आकर्षक बनतात. जाहिरात बनवायची म्हटलं की, अभिनय हा हवाच. चित्रकला लेखन कलेचा सुध्दा येथे कस लागतो. छायाचित्रणाला

जाहिरातींमध्ये फार मोलाचे स्थान आहे, त्यामुळे जाहिरात ही माणसाच्या विविध कलागुणांना वाव देण्याचे काम करते. याच जाहिराती माणसाला प्रसिध्दी आणि पैसा मिळवून देण्याचा मार्गही उपलब्ध करून देतात. आज-काल जाहिरातींच्या माध्यमातून होणारी ग्राहकांची फसवणूक ही फार घातक ठरत आहे. काळेपणा दूर करण्यासाठी व आपला चेहरा गोरा पान दिसण्यासाठी हा विशिष्ट प्रकारचा साबण फार लांब व भरपूर दाट केसांसाठी हे विशिष्ट तेल वापरा. आपले दात मजबूत होण्यासाठी हीच टूथपेस्ट वापरा. हे विशिष्ट प्रकारचे रत्न तुम्ही तुमच्यासोबत बाळगले तर तुम्हाला महिनाभरात धनप्राप्ती होईल अशा प्रकारे जाहिरातींच्या माध्यमातून ग्राहकांची फसवणूक केली जात आहे. काही वेळेला तर जाहिरातींना खरे मानून युवक विविध औषधांचे सेवन करतात. काही वेळेला जाहिरातींमुळे युवकांचे शारीरिक नुकसान होते पण त्यांना जबर मानसिक धक्काही बसतो.

जाहिरातीदार ते उत्पादन आकर्षक पध्दतीने मांडत असतो. त्याला उत्पादनातील घटकांशी काही देणंघेणं नसते. हा त्यांचा स्थायीभाव सर्वकालीन आहे. जगभरात कुठेही पाहण्यास मिळतो मग युनायटेड किंग्डम सारखा पुढारलेला देश का असेना. काही उत्पादक आपल्या उत्पादनाबद्दल खोट्या अगर गैरसमज पसरवणाऱ्या गोष्टी सांगतात व तसे दावेही करतात. जेव्हा हे दावे प्रत्यक्षात येत नाही, तेव्हा ग्राहकास त्याचे आर्थिक व शारीरिक फसवणूक झाली याची जाणीव होते. उत्पादकांच्या अशा फसव्या जाहिरातीमुळे ग्राहकांच्या वस्तू निवडीवर परिणाम होतो. खऱ्या अर्थाने हा उत्पादकाचा गुन्हाच आहे यातून ग्राहकांचे नुकसान होते म्हणून त्यास विरोध झालाच पाहिजे नाहीतर हे जाहिरातींचे मायाजाल संपणार नाही.

**ग्राहक संरक्षण कायद्यानुसार :**

१) उत्पादकाने ग्राहकांची दिशाभूल करणे,

२) वस्तूंचा दर्जा व गुण याबद्दल खोटे व सिध्द न करता येणारे दावे करणे,

३) गुंतवणूकदारांना जास्त व्याज तर कर्जदारांना कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देण्याचे आमिष दाखवून प्रत्यक्षात तसे न वागणाऱ्या बँकिंग संस्था,

४) भडकपणे उत्पादनाची जाहिरात करणे,

५) ग्राहकांना मोफत वस्तूंचे आमिष दाखवून त्या वस्तूंची किंमत मूळ किमतीत वाढवून लावणे (उदा. गाडी घेतली तर टीव्ही फुकट),

६) गॅरंटी/वॉरंटी फ्री-सर्व्हीस या संबंधी जाहिरातीतील स्पष्ट उल्लेख टाळणे.

- एकावर एक फुकट,
- एका कमी किमतीच्या वस्तूची जाहिरात करून विक्री करताना, आता ते प्रॉडक्ट संपले आहे असे सांगून त्याच प्रकारची जास्त किंमतीची वस्तू विकतात,
- काही चार्जेस/फी जाहीर केलेल्या किमतीत दाखवीत नाही परंतु नंतर मागतात. जसे नवीन चार चाकी घेण्यापूर्वीचे एन्सेक्शन चार्जेस, सेल फोनची एक्टिवेशन फी,
- आमचे उत्पादन इतरांपेक्षा चांगले सांगतात पण ते कसे चांगले ? हे सांगितले जात नाही,
- वस्तू प्रत्यक्ष असल्यापेक्षा चित्रात मोठी दाखवतात,
- प्रत्यक्षात असलेल्या रंगापेक्षा चित्रातील रंग आकर्षक दाखवले जातात,
- खाद्यपदार्थात अपेक्षित टक्केवारी पेक्षा कमी परंतु ८/१० प्रकारचे व्हिटामिन असल्याचे दर्शविले जाते,
- जाहिरातीतील छोट्या अक्षरात कोठेतरी कोपऱ्यात अटी लागू असा शब्द असतो. अशा ठिकाणी ग्राहकांनी जास्त काळजी घेऊन मगच खरेदी केले पाहिजे.

आपण आपल्याकडे प्रसिध्द होणाऱ्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींकडे असेच बारीक लक्ष ठेवणे गरजेचे आहे. आपल्याकडे जाहिरातींवर लक्ष ठेवण्यासाठी एस.एस.सी.आय सारखी स्वयंसेवी संस्था आहे त्यांचे हात बळकट करणे ग्राहक म्हणून आपले कर्तव्य आहे. नवीन वर्ष सुरू होत आहे चला तर, आपण सर्वजण नवीन वर्षासाठी संकल्प करू या की, जाहिरातींमधील आक्षेपार्ह बाबींबद्दल आवाज उठवून तक्रार करू एकूणच सजग ग्राहक बनू.

✦ ✦ ✦ ✦

चिंतन


# वाचते व्हा !

नेहा शरद गवारी
प्रथम वर्ष कला

वाचनामुळे आपल्याला अनेक फायदे होतात. ज्ञान कधीही वाया जात नाही, असे म्हणतात ते अगदी बरोबरच आहे.

दिसामाजी काही तरी ते लिहावे ।
प्रसंगी अखंडित वाचित जावे ।।

स्वामी समर्थ रामदासांच्या या ओळींमधून वाचनाचे महत्त्व आपल्याला समजते. आपल्याकडे ज्ञान मिळवण्यासाठी अनेक साधने आहेत. वाचन हे त्यातील एक महत्वाचे साधन आहे. वाचन आपल्याला जीवनामध्ये का गरजेचे आहे. हे आपण शालेय जीवनापासून आपल्या शिक्षकांपासून ऐकत आलो आहे. आपला भरपूर वेळ कामात जातो. वाचन करण्यामुळे ताण-तणाव कमी होण्यास मदत होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्व घडते. आपला आत्मविश्वास वाढतो. आपल्याला कोणत्याही क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर त्या क्षेत्रातील ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यासाठी वाचन करणे गरजेचे आहे.



ज्ञान ही मनुष्याजवळ असलेली सर्वात मोठी संपत्ती किंवा शक्ती आहे. वेगवेगळ्या विषयांच्या पुस्तक वाचनामुळे आपल्याला नवनवीन माहिती मिळत असते. वाचनामुळे आपला वेळ सत्कर्मी लागतो. आपल्याकडे वेळ असेल तर त्या वेळेत आपण वाचन केले, तर आपला वेळ वाया न जाता आपल्याला अनेक सुंदर विचार वाचायला मिळतात. वाचन करण्यामुळे आपल्या ज्ञानात भर पडत असते. आपण शालेय जीवनात असताना परीक्षेत उत्तीर्ण होतो ते उत्तम वाचनामुळेच.

वाचनाची होईल मैत्री, यशाची मिळेल खात्री

पुस्तकांशी आपली मैत्री झाली तर आपल्याला वाचन करण्याची आवड निर्माण होते. वाचनाचे अनेक फायदे होतात. वाचन करण्याची सवय लागली तर आपल्याकडील ज्ञानसामग्री वाढते. मुलांना लहानपणापासून वाचनाची सवय असेल तर मुले पुढे हुशार बनतात. वाचनामुळे आपल्या ज्ञानात भर पडते. मेंदू कार्यक्षम होतो. वाचनामुळे आपण समजुतदार बनतो. वाचन केल्यामुळे आपल्या विचारांमध्ये परिवर्तन झालेले आपल्याला पहायला मिळते. जास्त वाचन केल्यामुळे आपल्याला वाचनाची ओढ वाढत जाते. आपल्याला वाचनाची गोडी निर्माण होत असते.

वाचन केल्यामुळे आपल्या भाषेमध्ये सुधारणा होऊ लागते. माणूस चांगल्या प्रकारे शुध्द बोलायला लागतो. वाचन केल्यामुळे आपल्या बुध्दीला चालना मिळते. वाचन केल्यामुळे आपण सुसंस्कृत बनतो. वाचनामुळे आपल्याला मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग आपल्याला पुढील जीवनात होऊ शकतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सुविचार "वाचाल तर वाचाल" हा विचार आपल्यासाठी खूप मोलाचा आहे. मुलांना वाचनामध्ये गोडी निर्माण व्हावी म्हणून १५ ऑक्टोबर हा दिवस ‘वाचन प्रेरणा दिवस’ म्हणून साजरा केला जातो. वाचन केल्यामुळे आपल्याकडे असलेल्या शब्दसामग्रीमध्ये भर पडते. वाचनामुळे आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या नवनवीन गोष्टींची माहिती आपल्याला मिळत असते. वाचनामुळे आपल्याला अनेक संधी मिळतात.

✦ ✦ ✦

माहितीपर

# मोडी लिपी

साहिल अजमुद्‌दीन तांबोळी
इतिहास विभाग


मोडी लिपी ही मराठी भाषा लिहिण्यासाठी वापरली जाणारी लिपी आहे. जी महाराष्ट्र राज्यात बोलली जाणारी प्राथमिक भाषा आहे. मोडी लिपीच्या उत्पत्ती संदर्भात अनेक सिध्दांत आहेत.

मोडी ही १३ व्या शतकापासून २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत मराठी भाषेच्या लेखनाची प्रमुख लिपी होती. महादेव यादव आणि रामदेव यादव यांच्या राज्यकालात १२६०-१३०९ मध्ये हेमाडपंत या प्रधानाने मोडी लिपीचा विकास केला. छपाईस अवघड असल्यामुळे मोडी लिपीचा वापर मागे पडला आणि बाळबोध (देवनागरी) लिपीचा वापर सार्वत्रिक सुरू झाला. हा वापर सक्तीने करण्याची सुरुवात ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी केली.

मोडी लिपी हात न उचलता लिहिली जाते. त्यामुळे वेगाने लिहिणे सोपे जाते. मोडीत अनेक शब्दांची लघुरूपे वापरून कमीतकमी ओळीत सारांश लिहिला जातो. मोडीतली अक्षरांची वळणे गोलाकार असतात. त्यांमध्ये देवनागरीच्या विपरीत, काना खालून वर जातो. यामुळे पुढचे अक्षर चटकन लिहिता येतो. तसेच प्रत्येक अक्षराची सुरुवात आणि शेवट डोक्यावरच्या रेषेवर होते. मोडी लिपीत चिटणीसी, महादजीपंत, बिवलकरी, रानडी अशी वळणे प्रसिध्द आहेत. पुढे घोसदार वळण येऊन त्याचा भारतातल्या इतर भागातही प्रसार झाला. असंख्य मराठी ऐतिहासिक कागदपत्रे मोडी लिपीत असून इतिहास संशोधनाकरिता मोडी जाणकारांची कमतरता भासते.

**मोडी लिपीचा इतिहास :**

मोडी ही १३ व्या शतकापासून २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत मराठी भाषेच्या लेखनाची प्रमुख लिपी आहे. मोडी लिपीच्या उगमाबद्दल अनेक मते व मतभेद आहेत. इतिहासाचार्य वि.का.राजवाडे व डॉ.भांडारकरांच्या मते हेमाडपंताने ही लिपी श्रीलंकेतून आणली. परंतु चांदोरकरांच्या मते मोडी लिपी अशोककालातील मौर्यी (ब्राम्ही) चाच एक प्रगत प्रकार आहे. वाकणकर आणि वालावलकरांच्या मते मोडी लिपी ही ब्राम्ही लिपीचाच एक प्रकार असून हात न उचलता लिहिण्याच्या तिच्या वैशिष्ट्यामुळे इतर लिपींपेक्षा वेगळी झाली आहे. मोडी लिपी श्रीलंकेतून आणली गेली असावी अथवा मौर्यी लिपीवरून विकसित झाली असावी. हे म्हणणे वाकणकर आणि वालावलकर यांना मान्य नाही.






*परिश्रम करून जो दमत नाही त्याच्याशिवाय इतरांशी देवदेखील मैत्री करीत नाहीत.*

मोडी लिपी महाराष्ट्रात कमीत कमी ९०० वर्षे वापरात आहे. सर्वांत जुना उपलब्ध मोडी लेख इ. स. ११८९ मधील आहे. ते पत्र पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळांच्या संग्रहात आहे. मोडी लिपी अल्पप्रमाणात का होईना, १९५० पर्यंत लिखाणात प्रचलित होती. शेवटच्या २-३ शतकात मोडी लिपीत अनेक फेरबदल झालेले आहेत. साधारण इ. स. १७०० च्या सुमारास चिटणिसी आणि वळणे ही पूर्णपणे प्रगत झाली व यानंतर त्यात फारसे बदल दिसून येत नाहीत. ऐतिहासिक कागदपत्रांतील मोडी लिपी क्लिष्ट आणि वाचण्यास कठीण असते.

मोडी लिपी पेशवाईकाळात अत्यंत उत्कर्षाअवस्थेत होती असे मानले जाते. पेशवे यांच्या दप्तरातील कागदपत्रे, दस्तऐवज पाहिले असता या उत्कर्षाची कल्पना येते. सुबक अक्षर, दोन ओळीतील समान अंतर, काटेकोर शुध्दलेखन हे या लेखनाचे वैशिष्टय. छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ ते उत्तर पेशवाई ह्या काळांतील मोडी वाचनातून मराठी भाषेतील स्थित्यंतरे लक्षात येतात व मराठी भाषेचा प्रवास अभ्यासता येतो.

इतिहासाचार्य राजवाडे यांच्या मताप्रमाणे ज्ञानेश्वरी लिहिली जाण्याच्या काळात मोडी संकल्पना महाराष्ट्रात येत होती. याच काळात पहिले मुस्लीम आक्रमण भारतात होत होते. लिखाणाकरिता कागदाचा वापर हा मुस्लिमांनी सुरू केला.

मोडी लिपीचा इतिहास समजून घेणे व मोडी लिपीचे जतन करणे ही काळाची गरज आहे.

✦ ✦ ✦ ✦



## प्रिय सखा....

तू आलास तेव्हा कोमेजलेला होता,
दोन दिवस घेतलेस तू पण रुजलास
दिवस उलटत गेले तसं तू ही रमलास
अगदी काय हवं नको तेही बघितलं
आता तू बऱ्यापैकी घरचाच झालास
तुझ्याकडे बघत बसणे एक छंदच झाला
दिवसेंदिवस जसजसा सहवास वाढला तसं प्रेमही वाढले
आणि आज त्या प्रेमाची तू परतफेडही केली !
तू फुललास ! तू बहरलास !
तुझ्या दरवळण्याने आसमंत सुगंधित झाला.
किती सुंदर दिसतोस आता तू.
नजर हटतच नाही तुझ्यावरून
असाच दरवळत रहा फुलत रहा बहरत रहा.
माझा प्रिय सखा मोगरा, मोगरा आणि फक्त मोगरा !

**प्रा. शितल बोऱ्हाडे**
**वाणिज्य विभाग**

## कविता



कॉलेज विश्वापासून दूर जाताना...
मनात हुरहुर दाटलेली आहे की,
महाविद्यालयीन जीवनाची सांगता
झालेली आहे.

प्रत्येकजण उंची स्वप्न घेऊन निघालेला आहे.
आणि तो आयुष्याच्या नव्या लढाईसाठी सज्ज झालेला आहे.

कोणीतरी उच्चशिक्षण घेऊन परदेशात स्थायिक
आणि कोणी तर समाजसेवेत रमणार आहे.
आणि कोणी तर देशसेवेत रमून जाणार आहे.

तसेच काहीजण हाकतील संसाराचा गाडा
तसेच संपूर्ण विश्व पाहायला (विश्वभ्रमंतीला),
जाईल एखादाच निसर्गवेडा
एखाद्या दिवशी मित्राचा/मैत्रिणीचा फोन येईल,
आणि आवाज एकूण हृदय हेलावून टाकेल.

मग कॉलेजविश्वातील आठवणींची मैफल रंगेन.
असे वाईट वाटते कॉलेज विश्वापासून दूर जाताना.

**सायली काशिनाथ घुले**
**द्वितीय वर्ष एम. ए.**

व्यक्तिचित्रण

# लोकराजा राजर्षी शाहू

**प्रविण बापू लेंभे**
**तृतीय वर्ष कला**

महाराष्ट्रातील करवीर तथा कोल्हापूर संस्थानचे प्रागतिक अधिपती आणि थोर समाजसुधारक. प्राथमिक शिक्षण, जातिभेद-निवारण, अस्पृश्यता-निवारण इ. सुधारणांचे पुरस्कर्ते, शाहू महाराज यांचा जन्म २६ जुलै १८७४ मध्ये कागलच्या जहागीरदार घाटगे घराण्यात जयसिंगराव आणि राधाबाई ह्या दाम्पत्याच्या पोटी झाला. चौथ्या शिवाजींच्या अकाली निधनानंतर ते कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले. राजकोट व धारवाड येथे त्यांचे शिक्षण झाले. रघुनाथराव सबनीस यांच्यासारखे गुरू त्यांना मिळाले. त्याच वेळी त्यांना २ एप्रिल १८९४ मध्ये राज्याधिकार मिळाला. तत्पूर्वी लक्ष्मीबाई खानविलकर यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यांना राजाराम व शिवाजी ही दोन मुले आणि राधाबाई व आऊबाई या दोन कन्या झाल्या.

वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी त्यांना राजर्षी होण्याचे भाग्य लाभले. राज्यकारभाराची सूत्रे स्वीकारल्यापासून केवळ प्रजेचाच विचार करणारा हा राजा प्रजेसाठी झटत राहिला. त्यावेळी संस्थानामध्ये बहुजन समाजातील लोकांना नोकऱ्या मिळत नव्हत्या. प्रथमतः त्यांनी सामाजिक परिवर्तन करण्याचे ठरविले. गरिबांना रोजगार मिळून त्यांच्या विकासासाठी प्रयत्न झाले पाहिजेत, यासाठी बहुजन समाजातील लोकांना त्यांनी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. त्यांच्या कार्याचा उद्देश एकच होता, तो म्हणजे समाजाचे कल्याण. बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्रय, अज्ञान व अंधश्रध्दा नष्ट होणार नाहीत, हे जाणून शाहूंनी प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला.

दलित, गरीब मुलांना शिक्षण घेणे शक्य होत नव्हते. शिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे त्यांना प्रगतीचा मार्ग दिसत नव्हता. त्यानुसार त्यांनी आपल्या संस्थानात सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि तो अंमलात आणला. प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केली. खेड्यापाड्यांतील मुलांना उच्चशिक्षणाची सुविधा मिळावी म्हणुन, शाहूंनी विविध ठिकाणी त्यांच्या प्रेरणेने व साहाय्याने अनेक वसतिगृहे सुरू केली. राजांनी सोनतळी येथे भटक्या-विमुक्तांच्या मुलांसाठी पहिली शाळा काढली. भटक्या लोकांच्या मुलांसाठी त्यांनी अनेक सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यांच्या या उपक्रमामुळे महाराष्ट्रातील अनेक पिढ्या शिकून तयार झाल्या. शाहूंनी कोल्हापूर संस्थानातील ५०% शासकीय नोकऱ्या मागासलेल्या वर्गासाठी राखीव ठेवल्याचा जाहीरनामा काढला. राखीव जागांचे धोरण अमलात आणणारे शाहू हे हिंदुस्थानातील पहिले राज्यकर्ते ठरले.

भटक्या लोकांच्या आयुष्यात स्थिरता यावी, यासाठी महाराजांनी घरकुले बांधण्याची योजना अंमलात आणली. तळागाळातल्या लोकांचा विश्वास संपादन करून त्यांना प्रेमाने जिंकले.

अस्पृश्यतेबरोबरच जातिभेदाशी शाहूंनी अखेरपर्यंत संघर्ष केला. आंतरजातीय विवाह हा जातिभेदावर रामबाण उपाय वाटून त्यांनी आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. स्वतः पुढाकार घेऊन अनेक आंतरजातीय विवाह घडवून आणले. तसेच बालविवाहास प्रतिबंध करून नोंदणी विवाहाचा कायदा जारी केला. घटस्फोट व विधवापुनर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली. कुटुंबात होणाऱ्या शारीरिक व मानसिक छळांपासून स्त्रीला संरक्षण देणारा कायदाही त्यांनी मंजूर केला. जोगतिणी व देवदासी प्रथेस प्रतिबंध करणारा कायदा जारी केला. मागासलेल्या वर्गांतील मुलींना व स्त्रियांना मोफत शिक्षणाची सुविधा निर्माण केली.

सामाजिक सुधारणांबरोबरच शाहूंनी शेतीस व उद्योगधंद्यास प्रोत्साहन दिले. अनेक कृषी व औद्योगिक प्रदर्शने भरविली. कृषी उत्पादनासाठी शाहूपुरी, जयसिंगपूर यांसारख्या बाजारपेठा



*अधिक मित्र हवे असतील तर दुसऱ्याच्या गुणांचे मनापासून कौतुक करा.*

वसविल्या. त्यामुळे कोल्हापूर ही गुळाची बाजारपेठ म्हणून देशात प्रसिध्द झाली. शाहूंनी कोल्हापूरात कारखानदारीचा पाया रचला. 'शाहू मिल' ची स्थापना करून आधुनिक वस्त्रोद्योगास त्यांनी चालना दिली. शाहूंनी बांधलेले राधानगरीचे धरण कृषी क्षेत्रात संस्थानचा कायापालट करणारा उपक्रम ठरला. संस्थानी मुलखातील हे सर्वांत मोठे धरण बांधून त्यांनी आपले संस्थान सुजलाम्-सुफलाम् करून टाकले. शाहूंनी 'सहकारी संस्थांचा कायदा' करून सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. अशा सर्व कामांतून त्यांचा कृषी विकासातील दृष्टिकोन दिसून येतो. शेतकी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिटयूट' ची स्थापना केली. त्यांनी स्वतः धान्य दुकाने, निराधार आश्रमाची स्थापना केली. अशा समाजोपयोगी कामातून शेतकऱ्यांसाठी त्यांनी विशेष उपक्रम राबविले. शाहूंनी संगीत, नाट्य, चित्रकला, मल्लविद्या आदी कलांना राजाश्रय देऊन महाराष्ट्रात कलेच्या क्षेत्रात उत्तम कामगिरी केली.

कोल्हापूरात वेदोक्त प्रकरणाचा स्फोट झाला. कोल्हापूरातील ब्रम्हवर्गाने शाहूंचे क्षत्रियत्व नाकारून त्यांना शुद्र म्हटले आणि त्यांना वेदमंत्राचा अधिकार नाकारला. यातून वेदोक्ताच्या संघर्षाचे पडसाद सर्व महाराष्ट्रभर उमटले. लो. टिळकांनी ब्रम्हवर्गाची बाजू घेतल्याने प्रकरण सरस ठरले. शाहूंनी वेदोक्ताचा अधिकार नाकारणाऱ्या राजोपाध्यांची व शंकराचार्यांची वतने जप्त केली. पण शेवटी शाहूंचीच सरशी झाली. कोल्हापुरातील ब्रम्हवर्गास त्यांच्याशी समेट करावा लागला, पण महाराष्ट्रातील ब्रम्हवर्ग शेवटपर्यंत त्यांच्या विरोधातच राहिला. वेदोक्त प्रकरणातील अनुभवावरून, भिक्षुकशाहीच्या जाळ्यातून मुक्त झाल्याशिवाय उच्चवर्णियांची धार्मिक व सामाजिक मक्तेदारी नष्ट होणार नाही, अशी शाहूंची धारणा झाली होती.

शाहू महाराज म. फुल्यांच्या सत्यशोधक विचारसरणीकडे आकृष्ट झाले. त्यांनी उघडपणे त्यांचे अनुयायित्व स्वीकारले नसले, तरी सत्यशोधक तत्वांना त्यांचा पाठिंबा होता. त्यांच्या प्रोत्साहनामुळे महाराष्ट्रात सत्यशोधक समाजाचे पुनरूज्जीवन झाले. पारंपरिक भिक्षुकशाहीच्या वर्चस्वाला शह देण्यासाठी त्यांनी कोल्हापूरात ब्राम्हणेत्तर पुरोहितांची निर्मिती करण्यासाठी 'श्री शिवाजी वैदिक स्कूल' ची स्थापना केली आणि मराठ्यांसाठी स्वतंत्र 'क्षात्रजगद्गुरू' पद निर्माण करून त्यावर उच्चविद्याविभूषित तरूणांस नेमले. धार्मिक व सामाजिक क्षेत्रात हा एक अभिनव प्रयोग होता. राजर्षी शाहू महाराजांची सर्वांत महत्त्वाची कामगिरी अशी की, महात्मा फुले



यांच्यानंतर निष्प्राण होत चाललेल्या सत्यशोधक चळवळीला त्यांनी संजीवनी देऊन तिच्यात नवचैतन्य निर्माण केले; सामाजिक चळवळीच्या क्षेत्रातील महात्मा फुले यांचे खरेखुरे वारसदार राजर्षी शाहू हेच होत. त्यांच्याच प्रेरणेने कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. किंबहुना, अस्तंगत होऊ लागलेल्या या समाजाची एक प्रकारे पुनः स्थापनाच केली गेली. या कार्यात पुढाकार घेतलेल्या कार्यकर्त्यांना शाहू महाराजांनी पाठिंबा दिला, आणि वेळोवेळी मार्गदर्शन केले.

शाहूंची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी भेट झाली. बाबासाहेबांच्या मूकनायक या वृत्तपत्रास व पुढे त्यांच्या इंग्लंडमधील उच्चशिक्षणास त्यांनी अर्थसहाय्य केले. माणगाव व नागपूर येथील अस्पृश्यता निवारण परिषदांत बाबासाहेबांबरोबर सहभागी होऊन अस्पृश्यांना त्यांचा 'खरा पुढारी' मिळाल्याबद्दल त्यांनी त्यांचा गौरव केला. बाबासाहेबांनी अखिल भारतीय बहिष्कृत समाजाची पहिली परिषद नागपुरात भरवली. या परिषदेचे अध्यक्षस्थान शाहू महाराजांनी स्वीकारावे यासाठी बबसाहेबांनी महाराजांना पत्र लिहिले. या पत्रानुसार शाहू महाराज नागपूरला परिषदेसाठी गेले. त्यांचे तेथे मोठ्या उत्साहात स्वागतही झाले. सामाजिक क्रांतीचे त्यांचे विचार एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे आजही मार्गदर्शक ठरतील असेच आहे.

महाराष्ट्राच्या समाजप्रबोधनाच्या तसेच सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबसाहेब आंबेडकर या समाज क्रांतिकारकांना केंद्रस्थानी ठेवावे

लागते. तब्बल दोन शतकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या समाजधुरिणांनी महाराष्ट्रात समग्र सामाजिक क्रांतीची मुहुर्तमेढ रोवली. समाज परिवर्तन आणि सामाजिक न्यायावर आधारित समाजाची पुनर्रचना या दोन घटकांना केंद्रस्थानी ठेवून म. फुले, राजर्षी शाहू, डॉ. आंबेडकर यांनी समतावादी दृष्टीकोनाची चर्चा केली. भारतीय समाजव्यवस्थेचा पाया हा जातिव्यवस्था, वर्ण व वर्गव्यवस्था पुरूषप्रधान संस्कृती आहे हे त्यांनी दाखवून दिले. निरक्षरांना साक्षर बनवण्यासाठीही यांनी दिलेले योगदान खूप मोठे आहे.

लोककल्याणाचा ध्यास असलेल्या राजर्षींनी आपल्या कारकिर्दीत अनेक सुधारणांबरोबरच अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले. त्यांच्या सर्वाभिमुख विकासाच्या दृष्टिकोनामुळे इतिहासकारांनी त्यांची नोंद लोककल्याणकारी राज्यकर्ता म्हणून केली आहे. शाहूंच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून कानपूर येथे कुर्मी क्षत्रिय सभेने त्यांना 'राजर्षी' पदवी बहाल केली. राजर्षी.. राजयोगी.. शिक्षणक्षेत्रात शाहूंनी जी अफाट कामगिरी केली त्याला स्मरणार्थ ठेवून जनतेने शाहू महाराजांना ही मानाची पदवी बहाल केली. या पदवीप्रदान कार्यक्रमात महाराजांना केवळ पाहण्यासाठी लोकांचा अक्षरशः महापूर लोटला होता. ही पदवी देऊन महाराजांचा प्रचंड मोठा सन्मान करण्यात आला. इतिहासात घडलेली ही घटना अतिशय मोलाची आहे.

त्यांच्या कार्यामुळे दलित-पतितांचा उध्दारक, रयतेचा राजा म्हणून त्यांची प्रतिमा जनसामान्यात निर्माण झाली. या राजाने अज्ञानी बहुजन समाजाला जागृत करण्याचे व्रत अखेरपर्यंत सांभाळले. अखेरच्या दिवसांत त्यांचे धाकटे चिरंजीव शिवाजी यांच्या अपघाती निधनाने ते खचून गेले. तशातच मधुमेहाने ते ग्रासले होते. अखेर मुंबई येथे त्यांचे वयाच्या अवघ्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यानंतर त्यांचे पुत्र राजाराम महाराज कोल्हापूर च्या गादीवर आले.

महाराष्ट्राने देशाला अनेक थोर समाज सुधारक दिले, त्यापैकी समतेची शिकवण देणारे, जातीव्यवस्थेविरूध्द लढा उभारून समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय ही लोकशाही मूल्य रूजविणाऱ्या आपल्या पदाची वाहवा न करता सर्वांसाठी समान कायदा लागू करणारे युगपुरूष लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज होते.

✦ ✦ ✦ ✦

## आयुष्य

आयुष्याच कोडं कधी सोडवून पाहिलं का ?  
ढीगभर स्वप्न ओंजळीत पाहिलंस का ?  
स्वतःसाठी काय करता विचारून पाहिलंस का ?  
दुनियेच्या या गर्दीत कधी जगून पाहिलंस का ?  
आयुष्याच्या वहीत काय लिहिलं आहे एकदा उघडून पाहशील का ?  
आयुष्याच्या डायरीत दोन शब्द लिहिशील का ?  
दुसऱ्यांसाठी खूपच जगली थोडं स्वतःसाठीही पाहशील का ?  
आयुष्य खुप सुंदर आहे फक्त कधी निस्वार्थपणे जगून पाहशील का ?  
मी शेवटचा एक प्रश्न विचारेल त्याच उत्तर तू शोधून ठेवशील का ?  
"मी तुझं आयुष्य आहे"  
तुझ्या जगण्याचं पान माझ्यासाठी लिहून ठेवशील का ?

**तेजस्वी संतोष भारमळ**  
**द्वितीय वर्ष कला**

## आयुष्याचे पुस्तक

मनाप्रमाणे कधीच काही घडत नसते,  
घडले तरी मनाला ते पटत नसते...  
दिसलेले कधी कळत नसते,  
कळणारे नेमके दिसत नसते...  
आवडलेले कधी भेटत नसते,  
भेटलेले कधीच आवडत नसते...  
दुःखात वेळ कधी सरत नसते,  
सुखात तीच वेळ कधी थांबत नसते...  
स्पंदनांची गती कधी सारखी नसते,  
भावनांची लय त्यात लपलेली असते...  
जेव्हा सर्व संपलंय असं वाटत असते,  
तेव्हाच खरी सुरुवात झालेली असते...  
आयुष्याचे पुस्तक पण असेच असते,  
डोळे मिटून ते वाचायचे असते...

**अपेक्षा महादू गिजरे**  
**प्रथम वर्ष वाणिज्य**



*मैत्रीसारखी जीवनात आनंद व उत्साह आणणारी दुसरी कोणती गोष्ट नाही.*

व्यक्तिचित्रण

# अनाथांची माय - सिंधुताई सपकाळ

प्रतिभा किसन बोऱ्हाडे
द्वितीय वर्ष कला

भारत देशाला अनेक महान समाजसुधारक स्त्रियांचा वारसा लाभलेला आहे. त्यातीलच एक उदाहरण म्हणजे सिंधुताई सपकाळ होय. त्यांना अनाथांची माय म्हणून ओळखले जाते. सिंधुताई सपकाळ यांना अनाथ मुलांची माय म्हणण्यामागचे कारण म्हणजे त्यांनी अनेक लहान अनाथ मुलांचा सांभाळ केला आणि त्यांचे आयुष्य मार्गी लावले. त्यांनी महिलांच्या अन्यायाविरुद्ध आवाज उठविला म्हणून त्यांना माई असे देखील संबोधले जाते. सिंधुताई यांचा जन्म १४ नोव्हेंबर १९४८ रोजी महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यात एका गरीब कुटुंबात झाला. सिंधुताईंना बेताच्या आर्थिक परिस्थितीमुळे पुरेसे शिक्षण घेता आले नाही त्यांनी आपले चौथीपर्यंतचे शिक्षण मराठी माध्यमातून कसेबसे पार पाडले. पूर्वीच्या काळी बालविवाहाची पध्दत अस्तित्वात होती. या प्रथेनुसार सिंधुताई यांचा विवाह त्यांच्या वयाच्या नवव्या वर्षी झाला. त्यांचे पती त्यांच्याहून सव्वीस वर्षांनी मोठे होते. त्यांचे नाव श्रीहरी सपकाळ असे होते.

सिंधुताईंच्या सासरी शैक्षणिक वातावरणाचा मुळातच अभाव होता. त्यामुळे गुरे सांभाळणे हे काम त्या करत असत. रस्त्यावर काम करणाऱ्या किंवा मुरूम फोडणाऱ्या मजुरांना मजुरी मिळते. परंतु दहा जनावरांचे शेण काढल्यानंतर देखील बायकांना मजुरी मिळत नाही आणि शेणाचा लिलाव देखील जंगलातील अधिकारी करत होते. या गोष्टी सिंधुताई सपकाळ यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी याविरुध्द लढा उभारला. या लढ्यात त्या विजयी झाल्या. लिलाव करणाऱ्या जमीनदारांना सिंधुताई यांची बुध्दिमत्ता आणि धैर्य पटले नाही. म्हणून त्यांना कमीपणा आणण्यासाठी त्यांनी युक्ती लढवली. सिंधुताई सपकाळ यांच्या चौथा बाळंतपणाच्या वेळी दमडाजी याने गावामध्ये तसेच त्यांच्या घरामध्ये असे सांगितले की, सिंधुताई यांच्या पोटातील मूल आपले आहे आणि त्यामुळे त्यांच्या चारित्र्यावर त्यांच्या नवऱ्याने संशय घेतला व सिंधुताईंना घराबाहेर काढले. त्यानंतर त्या माहेरी गेल्या पण तेथे देखील त्यांना कोणीही समजून घेऊ शकले नाही. त्यानंतर त्या नांदेड मनमाड रेल्वे स्थानकावर भीक मागू लागल्या आणि आपला उदरनिर्वाह करू लागल्या. एकेकाळी त्यांनी आत्महत्येचा देखील प्रयत्न केला. पण त्यांच्या पोटामध्ये असणाऱ्या छोट्या जीवाचे पण कशासाठी प्राण द्यायचे म्हणून त्या मागे हटल्या.

रेल्वे स्थानकावर मिळालेल्या भिकेमध्ये त्यांचे पोट भरत नसे म्हणून त्या स्मशानभूमीकडे देखील अन्नाच्या शोधासाठी जात. त्यांनी आपल्या मुलीला सेवासदन येथे दाखल केले आणि स्वतः अनाथ मुलांची सेवा करू लागल्या. त्यांनी निराधार मुलांना आधार म्हणून अनेक आश्रमांची स्थापना केली. मुलांसाठी वसतिगृह स्थापन केले. सिंधुताईंनी कठीण परिस्थितीवर मात करून गरीब अनाथ मुलांची सेवा करून सर्वांसमोर एक आदर्श उभा केला. सिंधुताईंच्या जीवनावर आधारित मी सिंधुताई सपकाळ या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली. या चित्रपटाची ५४ व्या लंडन फेस्टिव्हलसाठी निवड करण्यात आली.



सिंधुताईंनी ममता बाल सदन, सन्मती बाल निकेतन, अभिमान बालसदन, माझा आश्रम चिखलदरा, सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह, महिला आधार, बालसंगोपन अशा विविध संस्थांची स्थापना केली. या संस्थांच्या माध्यमातून त्यांनी अनाथ मुलांचे प्रश्न मार्गी लावले. १९९० साली 'मी वनवासी' हे आत्मचरित्र सिंधुताईंनी लिहिले. स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रवर्तक सावित्रीबाई फुले यांना ज्या पध्दतीने समाजात बदल घडवून आणताना ज्या यातना सहन कराव्या लागल्या तशाच पध्दतीच्या यातना सिंधुताईंनी सोसल्या. सिंधुताईंच्या कार्याची दखल घेऊन सरकारने त्यांना सावित्रीबाई फुले पुरस्कार देऊन गौरवले. याशिवाय २७३ राष्ट्रीय आणि काही आंतरराष्ट्रीय सन्मानही त्यांना मिळालेले आहेत. २०१९ साली पद्मश्री पुरस्कार तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून जीवनगौरव पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आलेला आहे. अनाथांची माय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिंधुताई सपकाळ यांचे निधन ४ जानेवारी २०२२ रोजी झाले. त्यांनी अनेक खडतर समस्यांना तोंड देऊन अनाथ मुलांचे संगोपन केले. त्यांना आधार दिला. अशा या मातृतुल्य समाजसेविकेला महाराष्ट्राने गमावले. सिंधुताई तुमच्या या कार्याला सलाम.

✦ ✦ ✦ ✦

## बालपणीचे दिवस

आईच्या कुशीमध्ये पुन्हा जाऊन झोपायचयं
बाबांच्या खांद्यावर पुन्हा एकदा खेळायचयं
बहीण-भावांसोबत मस्ती करून पुन्हा स्वतःच रडायचयं
मला पुन्हा एकदा बालपणीचे दिवस जगायचेत....

शाळेमध्ये जाऊन खूप मजा करायचीये
भांडण करून पुन्हा एकदा बट्टी करायचीये
हसत-हसत घरी यायचयं
मला पुन्हा एकदा बालपणीचे दिवस जगायचेत...

सगळ्यांकडून पुन्हा एकदा खूप लाड करून घ्यायचेत
पुन्हा एकदा कोपऱ्यात रुसून बसायचयं
मनवायला आल्यावर आईला पुन्हा घट्ट मिठी मारायचीये
मला पुन्हा एकदा बालपणीचे दिवस जगायचेत...

पण गेलेले क्षण परत येत नाहीत...

खरंच, किती छान असतं ते बालपण
समजत नसतं पण समजून घेणारे असतात,
काळजी नसते पण काळजी घेणारे असतात,
बोलता येत नसतं पण बोलून घेणारे असतात,
रडायला येतं पण रडू देणारे नसतात...
म्हणून पुन्हा एकदा ते दिवस जगावेसे वाटतात...
"बालपणाची किमया अजान असते,
मोठं झाल्यावर मात्र कमतरता भासते..."

**गौरी मनोज सोनवणे**
**द्वितीय वर्ष वाणिज्य**

## प्रिय शिक्षक

वर्गशिक्षक आहेत आमचे प्रिय मोकळ सर.
शिकवता शिकवता हसवत देखील
असतात ते आम्हाला वरचेवर.

अकाऊंटच लेक्चर असलं की
नुसता लागतो आम्हा पोरांच्या जीवाला घोर.
बोरकर आडनाव जरी असलं तरी करत नाहीत कधीच
आम्हाला त्या शिकवताना बोर.

मराठीचे शिक्षक आमचे लाडके काळे सर
पेशाने आहेत ते डॉक्टर
आत्मविश्वास इतका भरतात वाटतं होऊ आता कलेक्टर

गणितासारखा अवघड विषय
शेटे मॅडम करून सांगतात सोपा
आम्ही कधीच नाही काढत त्यांच्या लेक्चरला झोपा.

गव्हाळे सर शिकवतात आम्हाला इकॉनॉमिक्स खूप छान
आम्ही सर्व विद्यार्थी नेहमीच ठेवतो त्यांचा मान

इंग्रजी विषयाचं नाव ऐकलं तरी अनेकांचा होतो थरकाप
भीती घालवणारे शिक्षक आमचे आहेत जगताप

गुलानकर मॅडमच्या लेक्चर स्टार्ट व्हायची
बेल झाली की आम्ही सर्व मुलं करतो त्यांची वेटिंग.
कारण खूप भारी शिकवतात त्या आम्हाला विषय मार्केटिंग.

**श्रुती दत्तात्रय तळेकर**
**प्रथम वर्ष वाणिज्य**

व्यक्तिचित्रण

# ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ - डॉ.गेल ऑम्वेट (Gail Omvedt)

प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम
इतिहास विभाग


प्रसिध्द भारतीय अमेरिकन समाजशास्त्रज्ञ, आंतरराष्ट्रीय किर्तीच्या संशोधिका आणि दलित शोषितांच्या प्रेरणास्थान असलेल्या डॉ. गेल ऑम्वेट यांचा जन्म अमेरिकेतील मिनीॲपोलिस येथे मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण मिनीॲपोलिस येथील कार्लटन महाविद्यालयात झाले. तर मिनीॲपोलिस विद्यापीठातून त्यांनी समाजशास्त्र विषयात एम.ए. ही पदवी संपादन केली. एम.ए. च्या शिक्षणानंतर त्या सर्वप्रथम भारतात आल्या. येथे त्यांनी अनेक चळवळींच्या अभ्यासाला सुरूवात केली. त्यांनी महात्मा फुले यांच्या चळवळीवर आधारित वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड-पश्चिम भारतातील ब्राह्मणेतर चळवळ हा पीएच.डी.साठी प्रबंध लिहून अमेरिकेतील कॅलिफोर्निया विद्यापीठ बर्कली येथे सादर केला. डॉ. गेल आम्वेट यांनी आपल्या कामातून जात आणि वर्ग यातील गुंतागुंतीच्या नात्याची उकल करण्याचा प्रयत्न केला. विशेषतः वसाहतकालीन धोरणांमधून जात कशी पुनरुत्पादित होत होती यावर त्यांनी प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला.

डॉ. गेल ऑम्वेट यांनी सामाजिक विचार आणि तत्त्वज्ञानाकडे चळवळ म्हणून पाहिले. तत्त्वज्ञान हे समाजान्मुख असावे अशी त्यांची धारणा होती. सामान्य माणसांबद्दल त्यांच्या मनात खोल कणव होती. त्यांच्या उध्दारासाठी जे जे करता येईल ते त्यांनी आयुष्यभर केले. त्यांच्या चिंतनाचा व कार्याचा केंद्रबिंदू सामान्य माणूस होता. डॉ. गेल ऑम्वेट याच काळात मार्क्सवाद-फुले आंबेडकरवाद, स्त्रीवाद, समाजवाद, सामाजिक सिध्दांतावरील वाचन, मनन सतत करीत असत. त्यामुळे त्यांच्या विचारांना खोली, गांभीर्य, ठामपणा आणि व्यापकता प्राप्त होत गेली. त्यांनी ज्या गोष्टी केल्या त्या चळवळ स्वरूपाच्या होत्या. त्यातील प्रत्येक गोष्टीला वैचारिक अधिष्ठान होते. यातूनच त्यांच्या व्यक्तिमत्वाची तात्विक बैठक घडत गेली. विकसित होत गेली.

भारतीय सामाजिक विचार आणि तत्वज्ञानाला समजून घेणारी दृष्टी व भूमिका त्यांच्या वैचारिक साहित्यातून मिळते. त्यांचे प्रत्येक विचार हे आशयघन आणि सामाजिक, राजकीय समस्यांवरची समग्र प्रतिक्रिया आहे. अफाट वाचन शक्ती आणि भरपूर जगभर फिरण्याची वृत्ती यामुळे डॉ. गेल ऑम्वेट या सर्वत्र फिरत आणि लिहित राहिल्या. त्या वेगवेगळ्या चळवळीत पुढाकार आणि सहभाग घेत राहिल्या, आणि चळवळींच्या बौध्दिक मार्गदर्शक बनून भारतभर मांडणी करू लागल्या. विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात क्रांती विरांगणा इंदूताई पाटणकर यांच्या पुढाकाराने परित्यक्ता स्त्रियांच्या चाललेल्या चळवळीच्या त्या प्रमुख होत्या.

सांगलीच्या खानापूर तालुक्यामध्ये मुक्ती संघर्ष चळवळीच्या वतीने दुष्काळ निर्मूलन चळवळ, दुष्काळ निर्मूलनासाठी बळीराजा धरणाची निर्मिती यासाठी झालेल्या संघर्षात डॉ. गेल ऑम्वेट नेहमी अग्रेसर राहिल्या. श्रमिक मुक्ती दलाच्या नेतृत्वाखाली राज्यभर चाललेल्या विविध चळवळीच्या आधारस्तंभ म्हणून ठामपणे उभ्या राहिल्या. भारतीय समाजक्रांती मार्क्सवाद, फुले-आंबेडकरवाद आणि स्त्रीवादाच्या पायावरच शक्य आहे, असा विचार त्यांनी मांडला. विचार आणि व्यवहार यात फारकत होणार नाही याची त्यांनी नेहमी जाणीव ठेवली. भारतात सुरू असलेल्या परिवर्तनाच्या चळवळीने भारावून गेलेल्या डॉ. गेल यांनी शोषणमुक्त समाज व्यवस्थेचे स्वप्न घेऊन कष्टकरी जनतेच्या लढ्यात स्वतःला झोकून देऊन झपाटून काम केले.

जात, वर्ग, लिंगभाव, धर्म, वंश, रंगभेद व त्याबाबत मार्क्स, फुले-आंबेडकरी तत्तवज्ञान यांचे आंतरशाखीय आकलन त्यांच्या संशोधनातून त्यांनी अभ्यासकांना करून दिले. विविध राजकीय,



सामाजिक भूमिकांचा त्यांनी चिकित्सक मागोवा घेतला. ब्राह्मणेतर व सत्यशोधक चळवळीचा वारसा सांगून मार्क्सवादाचा विकास करण्याचा प्रयत्न डॉ.गेल ऑम्वेट यांच्या संशोधनानंतर पुढे आला. डॉ. गेल ऑम्वेट या समाजशास्त्रीय चर्चाविश्वात जातीच्या प्रश्नाला अधोरेखित करणाऱ्या पहिल्या फळीच्या अभ्यासक विचारवंत आहेत. असे डॉ. योगेंद्रसिंग हे दाखवून देतात. दलितांच्या इतिहासावर संशोधन करण्याचा डॉ.गेल यांनी मार्ग दाखविला.

महात्मा फुले यांच्या चळवळीचे आकलन त्या सांस्कृतिक बंड म्हणून करतात. ज्यामध्ये या वसाहतकालीन जात वर्गीय व्यवस्थेला धक्के देण्याची क्षमता होती. त्यामुळे महात्मा फुले यांची चळवळ केवळ सुधारणावादी चळवळ नव्हती असे मत डॉ. गेल यांनी मांडले आहे. शास्त्रीयदृष्ट्या विचार केल्यास गेल यांनी ऐतिहासिक अभ्यासपध्दत वापरून जातीचा अभ्यास केला होता.

त्या विद्यार्थीदशेपासूनच वेगवेगळ्या चळवळींमध्ये सक्रिय होत्या. अमेरिकेतील साम्राज्यवादी युध्दखोर प्रवृत्ती विरोधातील चळवळीमध्ये त्या अग्रेसर होत्या. तसेच कृष्णवर्णीयांच्या लढ्यात व स्त्रीमुक्ती आंदोलनातही त्यांनी सहभाग घेतला होता. सततचा अभ्यास, चिंतन, संशोधन, यातून त्यांनी आधुनिक चळवळींना सैध्दांतिक रूप दिले. त्यांनी वंचित बहुजनांच्या न्याय्य हक्कांसाठी सक्रिय योगदान दिले. जात, धर्म, वर्ग, लिंगभाव, पितृसत्ताक पध्दती, जमीन इत्यादींचा स्त्रीशोषणाशी जवळचा संबंध आहे. भारतातील दलित बहुजन आणि कनिष्ठ जातीतील स्त्रियांना पितृसत्ताक विचारांकडून होणारे अत्याचार सहन करावे लागत असून हिंसा, शोषण, व लैंगिकता यांचा आंतरसंबंध त्या स्त्रियांच्या अत्याचारामागे आहे असे स्त्रियांच्या अस्तित्वाबद्दल गेल यांनी आपले परखड मत मांडले आहे.

जाती अंत, स्त्रीमुक्ती, रोजगार हमी योजनेत काम करणाऱ्या स्त्रियांवरील अन्याय इत्यादी व्यवस्थेचा अभ्यास करून या सर्व शोषितांना न्याय मिळवून देण्यासाठी गेल यांनी पुढाकार घेतला. स्त्री-पुरूष विषमता, जातिभेद इत्यादी सामाजिक विषमता दूर व्हाव्यात यासाठी त्यांनी सत्यशोधक विचारांतून प्रथम स्वतः अभ्यास केला आणि नंतरच आपले विचार, चिंतन समाजापुढे मांडले. शेतकरी चळवळीमध्ये कार्यरत असताना त्यांनी आपली डावी विचारसरणी न सोडता जागतिकीकरणाबाबत आणि मुक्त अर्थव्यवस्थेबाबत स्वागतशील भूमिका घेतली. शेतकरी महिला आघाडी, स्त्री मुक्ती आंदोलन संघर्ष समिती, श्रमिक मुक्ती दल या संघटनांची स्थापना करण्यात डॉ. गेल यांचा पुढाकार होता.

डॉ. गेल ऑम्वेट यांनी समाजशास्त्रज्ञ म्हणून काम करताना अनेक विषयांचा व्यासंग बाळगला. लिखाण करताना त्यांनी संशोधनपर विचार मांडले. इंग्रजी, मराठी, हिंदी आणि मल्याळम भाषेतील त्यांची ३५ हून अधिक पुस्तके पुरोगामी चळवळीला ताकद देणारी ठरतात. समाजशास्त्रज्ञ, विचारवंत, लेखिका आणि सामाजिक कार्यकर्त्या अशी बहुआयामी ओळख असलेल्या डॉ. गेल ऑम्वेट यांचे वयाच्या ८१ व्या वर्षी २५ ऑगस्ट २०२१ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले.

✦ ✦ ✦ ✦

संशोधनपर

# एन.एस.एस. शिबिरांची तरुणांच्या व्यक्तिमत्व विकासातील भूमिका

**तन्वी जालिंदर देशमुख**
**द्वितीय वर्ष कला**

युवकांचे प्रभावी व्यक्तिमत्व घडविण्याचे काम शिक्षण क्षेत्राद्वारे केले जाते. प्रभावी व्यक्तिमत्व विकसित होत असताना तरूणांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालय स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना या विभागाद्वारे होत असते. तरूणांमध्ये समाजसेवेची जाण निर्माण झाल्यानंतर त्याचा पुढील टप्पा म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय. राष्ट्रीय सेवा योजना ही संकल्पना सांगताना त्यात सेवा आणि त्याग हे शब्द युवकांच्या आयुष्यातील सेवेचे महत्व विशद करतात. विशेषतः शिक्षण क्षेत्रातून सेवासंस्कार तरूणांवर व्हावा, तरूणांकडून राष्ट्रसेवा घडावी, युवा शक्तीचा उपयोग राष्ट्राकरिता व्हावा या हेतूने शिक्षणक्षेत्रात विविध योजना वेगवेगळ्या स्तरावर राबविल्या जातात. शिक्षणक्षेत्रात कनिष्ठ स्तरापासून ते उच्च शिक्षण क्षेत्रापर्यंत राष्ट्रीय सेवा योजनेची व्याप्ती वाढताना दिसून येत आहे.

**राष्ट्रीय सेवा योजनेची पार्श्वभूमी :**

राष्ट्रीय सेवा योजनेची पार्श्वभूमी पाहिली असता असे दिसून येते की, डॉ. डी.एस.कोठारी शिक्षण आयोगाने शिक्षणाच्या सर्वच टप्प्यांवर विद्यार्थी समाजसेवेशी जोडला जावा. अशी शिफारस १९६४ ते १९६६ या दरम्यान केली. त्यानंतर १९६७ मध्ये राज्यांच्या शिक्षणमंत्र्यांच्या परिषदेत एन.एस.एस. ची तरतूद मान्य करण्यात आली. त्यानंतर कुलगुरूंच्या परिषदेत राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वागत होऊन २४ सप्टेंबर १९६९ रोजी महात्मा गांधीजी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने त्यावेळचे शिक्षण मंत्री व्ही.के.आर.व्ही.राव यांनी देशातील ३७ विद्यापीठात प्रायोगिक तत्वावर एन.एस.एस. योजना सुरू केली. माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी हे ब्रीदवाक्य लक्षात घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेतील युवक स्वयंसेवक सेवेची मूल्य आणि सामाजिक भान ठेवून समाज सेवेसाठी तत्पर असतो. आपले उज्वल भविष्य गाठत असताना समाज आणि राष्ट्राला आपण काहीतरी देणे लागतो या माध्यमातून एन.एस.एस. उपक्रमाद्वारे राष्ट्र सेवा करण्याचे कार्य महाविद्यालयीन युवक करत असतो.

एन.एस.एस. चा स्वयंसेवक हा बोधचिन्हाच्या आठ आऱ्यांनुसार अष्टोप्रहर समाजसेवेसाठी बांधील असतो. तसेच लाल रंग हे तरूणांच्या सळसळत्या रक्ताचे प्रतीक मानले जाते. जे राष्ट्र उभारणीसाठी आपले मोलाचे योगदान देते. एन.एस.एस. विभागातील उपक्रमातून देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, सामाजिक बांधिलकी, यासाठी स्वयंसेवक सदैव तत्पर व सक्षम व्हावा यासाठी नियमित कार्यक्रम राबविले जातात. नियमित कार्यक्रम व विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर या दोन उपक्रमांद्वारे युवक समाज प्रबोधन करण्याचे कार्य करीत आहेत. त्यामुळे तरुणांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळत आहे. नियमित कार्यक्रमांद्वारे महापुरुषांचे विचार हे तरुणांपर्यंत पोहोचत असतात. अलीकडच्या काळात समाजात वेगवेगळ्या विचित्र घटना पहावयास मिळतात. अशा परिस्थितीत आजचा तरुण भरकटला जाऊ नये म्हणून एन.एस.एस. या उपक्रमातून समाज परिवर्तन करण्याचे कार्य युवकांच्या माध्यमातून करीत आहे.

एन.एस.एस. च्या माध्यमातून पर्यावरणासंबंधी वृक्षारोपण, ग्रीन ऑडिट, आपत्ती व्यवस्थापन, जैवविविधता, निर्माल्य संकलन, जलसाक्षरता, कन्यारत्न वाचवा अभियान, आर्थिक, कौटुंबिक व शैक्षणिक सर्वेक्षण आदी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले जातात. राष्ट्रीय सेवा योजनेची ही चळवळ अखंड सुरू राहावी यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार मुलभूत योजनांचा सतत प्रचार व प्रसार करीत असते. त्याचबरोबर दिशाहीन झालेल्या आजच्या तरुणाईला दिशा दाखविण्याचे काम एन.एस.एस. करत आहे. या विभागाच्या माध्यमातून तरुणांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत आहे. त्यांचे व्यक्तिमत्व समृध्द होत आहे.

चिंतनपर

# भारतातील बेरोजगारी

सुनंदा सखाराम असवले
तृतीय वर्ष कला

भारत हा विकसनशील देश आहे आणि जगात वेगाने वाढणारी एक अर्थव्यवस्था आहे. भारताच्या विकासामध्ये बेरोजगारी समस्या हे एक मोठे आव्हान आहे. बेरोजगारीमुळे मानवी साधनसंपत्ती वाया घालवण्यासारखे आहे. दीर्घकालीन बेरोजगारी ही मोठ्या प्रमाणावर वाढणारे दारिद्र्य व संथ गतीने होणारा आर्थिक विकास दर्शविते. बहुतांश तरुणांना बेरोजगारीस सामोरे जावे लागते. तरुण वर्ग ही मोठी मानवी साधनसंपत्ती, आर्थिक विकास व तांत्रिक नवकल्पनेची चालकशक्ती व गुरुकिल्ली आहे. भारत हा तरुणांचा देश आहे. म्हणून तरुणातील बेरोजगारी हे २१ व्या शतकातील भारतासमोरील मोठे आव्हान आहे. रोजगार संधी व लोकसंख्येतील वाढ यामध्ये असमतोल दिसून येतो, यामुळे मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी वाढली आहे. बेरोजगार, अनुत्पादक समाज विघातक आणि देशविरोधी कामात गुंतलेली दिसतात.

## बेरोजगारीचे प्रकार

### हंगामी बेरोजगारी :

हंगाम नसलेल्या काळात जेव्हा लोकांना रोजगार नसतो, त्याला हंगामी बेरोजगारी म्हणतात. शेतकऱ्यांना पिकांच्या लागवडीसाठी पावसावर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे शेती हा हंगामी व्यवसाय आहे. शेती क्षेत्रातील श्रमशक्ती जवळपास ५ ते ७ महिन्यांसाठी बेरोजगार राहते. शेतीशिवाय स्थलपरत्वे हंगामी बेरोजगारी ही पर्यटन मार्गदर्शक, बँड पथक, साखर कारखाना कामगार, बर्फ फॅक्टरी कामगार व मासेमारी इत्यादी व्यवसायांमध्ये आढळून येते.

### छुपी/प्रछन्न बेरोजगारी :

सामान्यतः भारतातील खेड्यांमध्ये ही बेरोजगारी आढळते. ही एक अशी स्थिती आहे की, ज्यामध्ये गरजेपेक्षा जास्त लोक काम करताना दिसतात. त्यापैकी काही मजुरांना कामावरून कमी केले तरी उत्पादनावर त्याचा परिणाम होत नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर ती एक विशिष्ट स्थितीशी संबंधित आहे, जिथे अतिरिक्त मनुष्यबळ असून त्यामध्ये काही मजुरांची सीमांत उत्पादकता शून्य असते. शेतजमिनीवरचा अतिरिक्त भार हा ग्रामीण भागात छुपी बेरोजगारी निर्माण करतो. ग्रामीण भागात जवळपास २०% श्रमशक्ती छुप्या बेरोजगारीत आहे. संयुक्त कुटुंब पध्दती, पर्यायी रोजगारांचा अभाव, शेतीवरील लोकसंख्येचा अतिरिक्त भार इत्यादी छुप्या बेकारीची कारणे आहेत.

### सुशिक्षित बेरोजगारी :

काम करण्याची इच्छा आणि शिक्षणाची पात्रता असूनही रोजगार मिळत नाही त्यास सुशिक्षित बेरोजगारी म्हणतात. ही बेरोजगारी शालान्त परीक्षा उत्तीर्ण, पदवीपूर्व शिक्षण, पदवीधारक व पदव्युत्तरांमध्ये दिसून येते. शिक्षणाप्रती उदासिनता, पांढरपेशा व्यवसायाला प्राधान्य, व्यवसायिक अभ्यासक्रमाचा अभाव, रोजगाराच्या संधी व सुशिक्षितांमधील असमतोल, उपलब्ध शैक्षणिक संधीची माहिती नसणे ही सुशिक्षित बेरोजगारीची कारणे आहेत.

### औद्योगिक बेरोजगारी :


शहरातील कारखाने व उद्योगांमधील बेरोजगारीस औद्योगिक बेरोजगारी म्हणतात. हे कामगार कुशल किंवा अकुशल असतात. हा सामान्यतः खुल्या बेरोजगारीचा प्रकार आहे. मंद औद्योगिक वृध्दी, वेगाने वाढणारी लोकसंख्या, प्रशिक्षण सुविधांचा अभाव, आधुनिक तंत्रज्ञानाची कमी स्वीकार्यक्षमता, उद्योगांचे गैरसोयीचे स्थानिकीकरण, श्रमाची कमी गतिशीलता ही औद्योगिक बेरोजगारीची मुख्य कारणे आहेत.



*गोड बोलणाऱ्याला शत्रू नसतो.*

**तांत्रिक बेरोजगारी :**

तंत्रज्ञानातील बदलांमुळे तांत्रिक बेरोजगारी निर्माण होते. आधुनिक तंत्रज्ञान भांडवल प्रधान असून त्यास कमी कामगार लागतात. जेव्हा आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार औद्योगिक क्षेत्रात केला जातो. प्रशिक्षणाचा अभाव असल्याने कामगार आपल्या नोकरीवरून विस्थापित होतात. उदा. संगणकाचा वापर, यांत्रिक तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी.



**संघर्षजन्य बेरोजगारी :**

उद्योगांमधील संघर्षामुळे निर्माण होणारी बेरोजगारी म्हणजे संघर्षजन्य बेरोजगारी होय. ह्या प्रकारची बेरोजगारी यांत्रिक बिघाड, वीजटंचाई, कच्च्या मालाचा अभाव, कामगारांचा संप इत्यादीमुळे निर्माण होते. संघर्षजन्य बेरोजगारी ही तात्पुरत्या स्वरूपाची असते.

**चक्रीय बेरोजगारी :**

व्यापारचक्रातील तेजी-मंदीपैकी मंदीच्या परिस्थितीत निर्माण होणाऱ्या बेकारीस चक्रीय बेकारी म्हणतात. मंदीच्या काळात प्रभावी मागणी घटते त्यामुळे उत्पादकांचा नफा आणि किमतीमध्ये घट होते. परिणामी उत्पादक गुंतवणूक व वस्तूंच्या उत्पादनात घट करतो. उत्पादनात घट झाल्याने रोजगारात घट होते. परिणामी कामगारांना बेरोजगारीस समोर जावे लागते.

**संरचनात्मक बेरोजगारी :**

देशाच्या आर्थिक संरचनेत काही लक्षणीय बदलांमुळे ही बेरोजगारी निर्माण होते. हे बदल उत्पादन घटकांच्या मागणी व पुरवठ्यावर परिणाम करू शकतात. अर्थव्यवस्थेमधील मूलभूत बदल, सरकारी धोरणांमध्ये झालेले बदल, भांडवलाचा तुटवडा, उद्योगाचे एका क्षेत्रापासून दुसरीकडे झालेले स्थलांतर इत्यादी. ही दीर्घकालीन अवस्था आहे. उपलब्ध रोजगार व कामगारांचे कौशल्य यातील तफावतीमुळे संरचनात्मक बेरोजगारी निर्माण होते. उदा.

१) घोडागाडीची जागा आता ऑटोरिक्षाने घेतली आहे.

२) संगणकामुळे टंकलेखक बेरोजगार झालेत कारण त्यांचे कौशल्य व उपलब्ध रोजगारात तफावत आहे.

✦ ✦ ✦ ✦


## आयुष्याचा धडा...

फळ्यावर लिहून, काहीसे सोपे काहीसे कठीण, ध्यानी आलेले...
मन ना गुंतले, ना कोरले होते ना रमले होते, ना राहिले होते...,
तरी पुन्हा, आखले होते. फळ्यावरचे मनात, आयुष्यभराचे...
धडे होते सोपे, उत्तरांची संगत कसे सोडवू सर, ही मनातील रंगत...,
हळू हळू कळत होते,
संस्कार ते होते... म्हणूनच छडी होती,
कुकर्माची संगत...
आयुष्याचा हा धडा
आयुष्यभराची शिदोरी आहे...
प्रत्येक मनुष्याला आजही छडी ची गरज आहे...

**ऋषिकेश जगदाळे**
**प्रथम वर्ष विज्ञान**

## सूर्यास्त

सूर्यास्ताचा प्रत्येक किरण,
नभास रेखाटून जात आहे.
नव पहाटेच्या स्वप्नास,
प्रज्वलित करून जात आहे.
होणाऱ्या घनदाट काळोखात,
आज हरवून जात आहे.
येणाऱ्या नवचैतन्याची चाहूल,
देऊन जात आहे.
असावे स्मरणात काहूर गगनात,
आशेचा किरण प्रफुल्लित करून जात आहे.



**प्रा. रेश्मा मनोज शिंदे**
**वाणिज्य विभाग**

व्यक्तिचित्रण

# नोबेल पारितोषिक विजेते भारतीय अर्थशास्त्रज्ञ : अमर्त्य सेन

श्वेता जगन्नाथ ओव्हाळ
तृतीय वर्ष कला

अमर्त्य सेन यांनी मनुष्याच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी काम करण्याचा दृढ संकल्प केलेला होता. त्यांनी शांती निकेतनमधून आपले शिक्षण पूर्ण केल्यानंतर १९५१ मध्ये प्रेसिडेंसी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तिथे प्राध्यापक हे स्वतःच्या विषयाविषयी दक्ष होते आणि विद्यार्थ्यांमध्ये एक नवीन जोश निर्माण करत होते. या कॉलेजमध्ये अमर्त्य सेन यांच्या जाण्याचा उद्देश होता की, त्यांना अर्थशास्त्रात प्राविण्य मिळवायचे होते. अमर्त्य सेन यांचे पूर्ण नाव अमर्त्य कुमार आशुतोष सेन होते. त्यांचा जन्म ३ नोव्हेंबर १९३३ रोजी शांति निकेतन, कोलकाता येथे झाला होता. अमर्त्य सेन यांच्या वडिलांचे नाव आशुतोष व आईचे नाव अमिता होते. अमर्त्य सेन यांचे तीन विवाह झाले. त्यांचा पहिला विवाह नवनीता यांच्या सोबत १९५६ मध्ये, दुसरा विवाह ईवा यांच्यासोबत १९८५ मध्ये, तिसरा विवाह एक्सा रॉथशील यांच्या सोबत झाला होता. अमर्त्य सेन यांचा मुख्य विषय हा अर्थशास्त्र होता आणि त्यांना या विषयाप्रती खूप आवड होती. अमर्त्य सेन यांना अशी अर्थव्यवस्था हवी होती ज्याचा आर्थिक लाभाचा भाव हा गरीब लोकांना देखील मिळू शकेल. अमर्त्य सेन हे डाव्या विचारसरणीच्या राजकीय प्रणाली बाजूने होते.

१९४३ मध्ये बंगालमध्ये दुष्काळ पडला होता, त्या काळात २५ लाखापेक्षा अधिक लोक मृत्युमुखी पडले. त्याची सर्वात मोठी समस्या ही ब्रिटिश सरकारची वितरण प्रणाली ही कमजोर असणे ही होती. त्यावेळी जगातील अनेक अर्थशास्त्रज्ञ हे वेगवेगळ्या आर्थिक पद्धती शोधण्यात गुंतलेले होते. त्यांचा उद्देश हा फक्त विकसित देशांना लाभ पोहोचवणे इतका होता. त्याशिवाय अनेक अर्थतज्ज्ञ हे विकसनशील अर्थव्यवस्था असलेल्या देशांना पुढे नेण्यासाठी प्रयत्न करत होते. अमर्त्य सेन यांनी असे काही ठोस उपाय निर्माण केले ज्यांच्यामुळे मनुष्याची गरिबी आणि दारिद्र्य हे समूळ नष्ट होऊ शकेल. अमर्त्य सेन यांनी पुढे जाऊन जगाच्या अर्थव्यवस्थेतील सर्व चांगल्या आणि वाईट गोष्टींचा अभ्यास केला. याच्या आधारे त्यांनी एक निष्कर्ष काढला होता की, जगात अरब संख्येत असे लोक आहेत ज्यांचे जीवन हे दुःख आणि दारिद्र्याने भरलेले आहे आणि भारतात असे लोक अधिक आहेत. इतिहास देखील सांगतो की बाहेरून आलेले परकीय राज्यकर्ते आणि व्यापाऱ्यांनी त्या देशातील सामान्य माणसाची कंबर मोडली आहे. त्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल केले. आर्थिक संकट हे त्यांच्या खांद्यावर भार बनून आहे, हा भार ओढत ओढत कोणाला माहित किती पिढ्या गेल्या आहेत आणि पुढे येणाऱ्या किती पिढ्या याच्या खाली दबून जातील. अमर्त्य सेन यांनी १९५३ मध्ये प्रेसिडेंसी कॉलेजमधून अर्थशास्त्रामधील पदवी मिळवली होती. त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी इंग्लंड येथे गेले. तेथे केम्ब्रिज विद्यापीठातील ट्रिनिटी कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. इथे त्यांना मिखाईल निकल्सन, चार्ल्स फिन्स्टिन, लाल जयवर्धने आणि मेहबूब अलि हक यांची सोबत मिळाली. तिथे दोन गट बनले होते, मार्क्सवादी मारीस डॉब, उदारवादी डेनिस रॉबर्टसन. आणि महान अर्थतज्ञ पियरो साफा इथे सेवा देत होते. या तिन्ही महान व्यक्ती अमर्त्य सेन यांच्यासाठी वरदान ठरले. त्यांनाच आदर्श ठेवत अमर्त्य सेन यांनी अर्थशास्त्रातील बारकावे चांगल्या प्रकारे समजावून घेतले. त्यांनी जगभरातील अर्थव्यवस्थांचा अभ्यास केला. त्यांनी शोधासाठी 'डी चॉईस ऑफ टेक्निकस' हा विषय निवडला. हा विषय समाजवादी अर्थव्यवस्थेशी संबंधित होता. मॉरिस डॉब आणि एक दुसरे प्रोफेसर जॉन रॉबिन्सन यांनी अमर्त्य सेन यांच्या विषयावर आनंद व्यक्त करत त्यांना मदत करण्याचे वचन देखील दिले. अमर्त्य सेन यांनी या विषयावर खूप चांगल्या प्रकारे मेहनत करत सर्व प्राध्यापकांना आश्चर्यात टाकले. एका वर्षात अमर्त्य सेन यांचे शोधकार्य हे खुप पुढे गेले होते. शेवटी ते कॉलेजमधून मोठी सुट्टी घेत भारतात आले. इथे श्री.ए.के.दासगुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शोध पुढे सुरू ठेवला. ते गरीब लोकांच्या स्वातंत्र्यासाठी समर्थन करत होते आणि अमर्त्य सेन यांच्यासारखा विद्यार्थी शोधकर्ता मिळाल्याने त्यांना आनंद झाला.

वर्ष १९५६ मध्ये अमर्त्य सेन यांना जाधवपूर विश्वविद्यालयात अर्थशास्त्राचे प्रवक्ते म्हणून निवडले गेले. त्यांच्यातील असाधारण क्षमता लक्षात घेता त्यांना पुढे जाऊन विभागप्रमुख बनवले गेले. अमर्त्य सेन हे निर्धारित कालावधीच्या आत शोध पूर्ण करून इंग्लंडला गेले. अमर्त्य सेन यांनी आपल्या शोध विषयाची पार्श्वभूमी मजबूत बनवण्यासाठी तत्वज्ञान आणि तर्कशास्त्र यांचा अभ्यास केला. कारण तत्वज्ञान या विषयाविषयी त्यांना आवड होती. १९६३ मध्ये अमर्त्य कुमार यांचे दिल्लीला येणे झाले. इथे त्यांनी दिल्ली स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स आणि दिल्ली विश्वविद्यालय येथे सेवा केली. दिल्ली स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स येथील विद्यार्थ्यांची रुची ही सामाजिक हित या विषयात जास्त होती. हा विषय अमर्त्य सेन यांचा देखील मुख्य विषय होता. याचा संबंध गरिबी, बेरोजगारी, असमानता आणि आर्थिक संकटाशी होता. त्यासोबत ते एका पुस्तकाच्या तयारीत देखील होते. त्यांच्या पुस्तकाचे नाव 'कलेक्टिव्ह चॉईस अँड सोशल वेल्फेअर' आहे. याचे प्रकाशन हे १९७९ साली झाले होते. या पुस्तकात सामाजिक हित या विषयाच्या वेगवेगळ्या पैलूंवर नजर टाकली होती. अमर्त्य सेन यांना जेव्हा भारतात जाधवपूर विश्वविद्यालयात अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख बनवण्यात आले तेव्हाच त्यांचा विवाह हा नवनीता देवी यांच्याशी झाला. दोघांच्या विचारात मतभेद निर्माण झाले. अमर्त्य सेन कधी भारतात तर कधी इंग्लंडला जात असत. भारतातून ते इंग्लंडला गेल्यानंतर ते हॉवर्ड युनिव्हर्सिटी मध्ये अध्यापन करायला लागले. मोकळ्या वेळेत त्यांचे लेखन कार्य देखील सुरू होते. इंग्लंड मध्ये राहून ते त्यांच्या बायकोच्या भावनांची कदर करू शकले नाही. पुढे त्यांच्यात इतका वाद वाढला की त्यांनी घटस्फोट घेतला. नवनीत यांची दोन मुले आहेत-मुलीचे नाव अंतरा आणि मुलगा नंदन आहे.

१९७१ मध्ये ते ब्रिटिश मुलगी ईवा कोर्लोनी यांच्या संपर्कात आले. अमर्त्य सेन आणि ईवा यांचे विचार मिळते जुळते होते. अमर्त्य सेन यांनी त्यांच्याशी विवाह केला होता. गरीब लोकांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी वेगवेगळ्या अर्थव्यवस्था शोधणे हे अमर्त्य सेन यांचे ध्येय होते. परंतु ईवा त्यांना आयुष्यभर साथ देऊ शकल्या नाहीत. ईवा यांनी मुलगी इंदिराणी आणि मुलगा कबीर यांना जन्म दिला. त्यानंतर १९८८ मध्ये कॅन्सर आजाराने त्यांचे निधन झाले. पुढे अमर्त्य सेन हे मुलांना घेऊन अमेरिकेत गेले. ते 'युनिव्हर्सिटी ऑफ टेक्सास, हॉवर्ड, स्टेनफोर्ड आणि प्रिनूसटन' अशा अनेक विद्यापीठांमध्ये सेवा देत होते. अमर्त्य सेन हे त्यांच्या मुलांची विशेष काळजी घेत असत. अमर्त्य सेन हे अमेरिकेत राहून देखील इंग्लंडमधील अनेक विश्वविद्यालयाशी आणि संस्थेशी जोडले होते. तेव्हा त्यांना कोणी मानवतावादी अर्थतज्ज्ञ म्हणत तेव्हा त्यांना आनंद होत असे.

अमर्त्य सेन यांनी अर्थशास्त्रावर जवळपास २१५ शोधनिबंध लिहिले आहेत. त्यांनी अर्थशास्त्राशी निगडित शोधांवर २४ पुस्तके लिहिली. ही सर्व पुस्तके विश्वभरात प्रसिद्ध आहेत. समाजवादाच्या क्षेत्रात उचललेल्या त्यांच्या ठोस पावलांना जगभरातील अर्थतज्ज्ञांनी स्वागत केले. अमर्त्य सेन देश विदेशातील वृत्तपत्रे आणि मासिकां- मध्ये आपले लेख लिहीत होते. १९८२ मध्ये 'चॉईस मेजरमेंट अँड रिसोर्सेस' नावाची एक पुस्तिका प्रकाशित झाली. त्यांनी भारतातील स्त्री पुरूषांची कार्य क्षमता आणि लिंगाच्या आधारावर आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रात केल्या जाणाऱ्या भेदभावावर आधारित संख्यांचा अभ्यास केला. गरिबी आणि दुष्काळ यावर अमर्त्य सेन यांनी केलेला अभ्यास आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजला गेला. १९९८ मध्ये त्यांना नोबेल पुरस्कारासाठी निवडले गेले.

अमर्त्य सेन यांनी त्यांना मिळालेल्या नोबेल पुरस्काराच्या रकमेचा वापर हा एक ट्रस्ट बनवण्यासाठी केला, ही ट्रस्ट तो पैसा हा भारतातील गरीब मुलांच्या परदेशातील शिक्षणासाठी करत असते. नोबेल पुरस्कारात मिळालेल्या ५ करोड रुपयांचा अमर्त्य सेन यांनी व्यक्तिगत जीवनात वापर केला नाही. त्यांच्या या कार्याने त्यांना संपूर्ण जगभरातून स्तुती मिळाली. अमर्त्य सेन यांना कल्याणकारी अर्थव्यवस्थेचे जनक म्हटले जाते. त्यांना Best Economist of India म्हणून देखील ओळखले जाते. त्यांनी लोककल्याणकारी अर्थव्यवस्था संपूर्ण जगाच्या समोर आणली. अमर्त्य सेन हे पहिले असे अर्थतज्ज्ञ आहेत ज्यांचे लक्ष हे गरिबांना दरिद्र्यातून मुक्ती देणे होते. त्यांचे म्हणणे होते की, भारतात गरिबीचे मुख्य कारण हे शिक्षणाचा अभाव आणि साधनसंपत्तीची कमतरता आहे. त्यांनी स्वतःच्या भाग्याला दोष देण्यापेक्षा काम करण्याकडे जास्त लक्ष दिले. अमर्त्य सेन यांचा विचार आहे की, जगात गरिबीचे कारण हे शिक्षणाची कमतरता हेच आहे. पैसे कसे कमावता येतील, याचे ज्ञान देखील आपल्याला शिक्षणातून मिळते. शिक्षणाने अज्ञानरूपी अंधार नष्ट करता येतो. शिकलेला व्यक्ती हा अंधविश्वास न ठेवता धर्माच्या नावावर रस्ता भटकत नाही. शुद्ध आचरण आणि शुद्ध व्यवहार करणारे व्यक्ती हे स्वतःला अज्ञानाच्या धोक्यापासून वाचवू शकतात. असे लोक आपला आर्थिक स्तर उंचावण्यासाठी नवीन नवीन मार्ग शोधत असतात. या आधारे सरकारने शिक्षण हे सक्तीचे करायला हवे, जेणेकरून समाज हा शिक्षित बनेल आणि देश विकसित होईल. संपूर्ण विश्व आजही नवनवीन अर्थशास्त्रातील शोध घेत आहे. अमर्त्य सेन यांनी जी पुस्तके लिहिलेली आहेत, त्यामध्ये १९७९ मध्ये कलेक्टिव्ह चॉईस अँड सोशल वेल्फेअर, १९८२ मध्ये चॉईस वेल्फेअर मेजरमेंट अँड रिसोर्सेस, इ. जवळपास एकूण २४ पुस्तकांचा समावेश होतो.

माहितीपर

# रशिया-युक्रेन युद्ध

प्रा. सुनील लक्ष्मण नेवकर
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र

सोव्हिएत संघाच्या पतनानंतर रशियाचा पूर्व युरोपवरील राजकीय प्रभाव संपला होता, एवढेच नाही तर पूर्वी सोव्हिएत प्रभावाखाली असलेले वॉर्सा करारातील अनेक देश अमेरिकाप्रणित नाटो करारात सामील झाले होते. पूर्वीच्या सोव्हिएत प्रजासत्ताकातील अनेक घटक राष्ट्रे स्वतंत्र झाली होती. तरीही मध्य अशियातील घटकराष्ट्रे व युरोपातील बेलारूस व युक्रेन ही नाटोमध्ये सामील न होता रशिया व नाटोशी समांतर अंतर राखून होती. फिनलंड, स्वीडन, ऑस्ट्रिया ही रशियाच्या निकट असलेली राष्ट्रे तटस्थ होती. त्यामुळे रशियाला आपल्या सुरक्षेची फार चिंता नव्हती, पण रशियात पुतिन यांची सत्ता आल्यानंतर या स्थितीत बदल होऊ लागला. पुतीन यांनी आपली सत्ता पक्की करून हळूहळू लोकांचे लोकशाही अधिकार कमी केले. विरोधी पक्षाचे अस्तित्व नाममात्र ठेवले, पण तेही संपविण्याच्या हालचाली सुरू केल्या. रशियात मोठ्या प्रमाणात नैसर्गिक वायू व पेट्रोलचे उत्पादन करून त्यांनी युरोपात आपले व्यापारी वर्चस्व निर्माण केले होते. त्यामुळे युरोपातील अमेरिकन वर्चस्वाला शह मिळत होता. रशियाच्या नैसर्गिक वायूच्या बहुसंख्य पाईपलाईन्स युक्रेनमधून पश्चिम युरोपात जातात, त्यामुळे युक्रेन रशियासाठी महत्त्वाचा देश आहे. रशियाचा युरोपमधला प्रभाव हळूहळू वाढत होता. हा प्रभाव कायम राखण्यासाठी आपली सुरक्षा बळकट करणे व त्यासाठी नाटोच्या प्रसाराला आळा घालणे रशियाला आवश्यक वाटत होते. रशियाची ही वाढती महत्वकांक्षा लक्षात घेऊन जे युरोपीय देश नाटोत सामील झाले नव्हते, त्यांनाही नाटोत ओढण्याचा किंवा किमान युरोपीय समुदायात ओढण्याचा प्रयत्न अमेरिका व पश्चिम युरोपीय देश करत होते. विशेषतः रशियासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या युक्रेनला नाटोत ओढण्याचे प्रयत्न सुरु झाले होते व युक्रेनलाही युरोपीय संघटनेशी बांधून घेण्यात रस वाटू लागला होता. युक्रेनने २००२ मध्ये नाटो प्रवेशासाठी अर्ज केला होता. ही रशियासाठी धोक्याची घंटा होती. युक्रेन नाटोत सामील होणे याचा अर्थ तो रशियाविरोधी लष्करी गटात सामील होणे असा होतो. नाटो ही संघटना रशियापासून युरोपीय देशांना संरक्षण देणारी लष्करी संघटना आहे. यातल्या एका देशावर जरी आक्रमण झाले तरी ते सर्व नाटो देशांवर झाले आहे, असे मानले जाते. अशा गटात युक्रेनने सामील होणे म्हणजे तेथील वायू पुरवठा करणाऱ्या पाईपलाईन्सवरचे नियंत्रण रशियाने गमावण्यासारखे आहे. त्यामुळे रशियाने युक्रेनच्या नाटो प्रवेशास विरोध केला. युक्रेनने फिनलंड, स्वीडन व ऑस्ट्रियाप्रमाणे तटस्थ राहावे व नाटोत सामील होण्याचा नाद सोडावा अशी मागणी रशियाने केली. पण ही मागणी मान्य होण्याची चिन्हे दिसत नाही, हे लक्षात आल्यानंतर रशियाने युक्रेनमध्ये २०१० मध्ये आपल्याला अनुकूल असे सरकार विक्तर यानुकोविच यांच्या नेतृत्वाखाली सत्तेवर आणले पण युरोपशी संलग्नतेचा करार रद्द करून घेतला. त्यांनी युरोपियन युनियनशी व्यापार व राजकीय सहकार्याचा करार करण्यासही नकार दिला. याचाच परिणाम युक्रेनमध्ये त्यांच्याविषयी असंतोष निर्माण होण्यात झाला. अर्थातच या असंतोषाला पाश्चात्य जगताचे समर्थन होते. त्यामुळे यानुकोविच यांच्याविरुद्ध लोकांचा मोठा उठाव होऊन त्यांना देश सोडून रशियात पळावे लागले. हीच घटना आज रशिया-युक्रेन युद्धाचे खरे कारण आहे. या घटनेपासून युक्रेनवर प्रभाव गाजविण्यासाठी रशिया व अमेरिकाप्रणित युरोपिय संघटना यांच्यात स्पर्धा सुरू झाली व ही स्पर्धा हरण्यातला धोका पुतिन यांना स्पष्ट दिसू लागला.

यानंतर पुतिन यांनी जे काही केले ती नव्या शीतयुद्धाची नांदी होती. युक्रेन हा एकेकाळी रशियाचाच भाग असल्यामुळे तेथे रशियन लोक आधीपासूनच होते. क्रिमिया या युक्रेनच्या राज्यात



*विचारांच्या युध्दात पुस्तक हेच शस्त्र आहे.*

तर रशियन मोठ्या संख्येने होते. पुतिन यांनी या रशियन हस्तकांना हाताशी धरून युक्रेनमध्ये एक मोठा रशियावादी गट निर्माण केला. या गटाने २०१४ मध्ये क्रिमियात उठाव करून रशियाला आमंत्रण दिले आणि रशियाने क्रिमिया सहज घशात घातला. हा उरलेल्या युक्रेनला इशारा होता. पण यापासून युक्रेनने काहीच बोध घेतला नाही. त्यामुळे रशियाने पुर्व युक्रेनमधील रशियनबहुल डॉनबास भागातील बंडखोरीस उत्तेजन देण्यास सुरुवात केली व तेथे फुटीर आंदोलन सुरू झाले. या भागातील डोनेक्ट्स आणि लुहान्सक या प्रांतांनी स्वायत्तेची मागणी सुरू केली. यावर तोडगा काढण्यासाठी फ्रान्स व जर्मनीच्या मध्यस्थीने युरोपीय सुरक्षा व सहकार्य संघटना, युक्रेन आणि रशिया यांच्यात बेलारूसची राजधानी मिन्स्क येथे चर्चा होऊन पहिला मिन्स्क करार झाला. या करारानुसार युक्रेन सरकार व वरील दोन प्रांत यांच्यात शांतता समझोता झाला. पण हा करार चार महिन्यांतच मोडला गेला. त्यामुळे पुन्हा चर्चा होऊन दुसरा मिन्स्क करार झाला. या करारात युक्रेन व त्याचे वरील दोन फुटीर प्रांत सामील होते, पण या करारात रशिया सामील नव्हता. युक्रेनने या कराराचा आपल्या दृष्टिकोनातून अर्थ लावून वरील दोन बंडखोर प्रांतावर आपली सत्ता घट्ट करण्याचा प्रयत्न सुरू केला तसेच नाटोत सामील होण्याच्या प्रक्रियेला गती देण्याचा प्रयत्न सुरू केला. रशियाला हे मान्य नव्हतेच, त्यामुळे रशियाने दुसरा मिन्स्क करार आपल्याला मान्य नसल्याचे जाहीर केले व दोन बंडखोर प्रांतांना पाठिंबा जाहीर केला. या प्रांताविरुद्ध युक्रेनने लष्करी कारवाई करू नये, यासाठी गेल्या काही महिन्यांपासून रशियाने युक्रेन सीमेवर जवळपास दोन लाख सैन्य आणि मोठ्या प्रमाणात लष्करी साहित्य आणून ठेवले. रशियाने असा हा आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर त्याची समजूत काढण्याचे प्रयत्न सुरू झाले, तेव्हा रशियाने युक्रेन नाटोमध्ये सामील होणार नाही याची हमी अमेरिका व युरोपियन युनियनने दिल्यास आपण सैन्य मागे घेऊ अशी अट घातली. खरे तर ही अट मान्य केली असती तर आज जे युद्ध सुरू झाले आहे ते झालेच नसते. पण रशियाची ही अट अमेरिकेने मान्य केली नाही. ती मान्य न करण्याचीही काही कारणे आहेत. रशियाच्या अटी मान्य केल्या असत्या तर रशियाने युक्रेनच्या निवडणुकीत हस्तक्षेप करून रशियावादी गट निवडून आणण्याचा प्रयत्न केला असता व त्याच्यामार्फत युक्रेनचे रशियात विलीनीकरण करण्याचा ठराव मंजूर करून घेतला असता. त्यामुळे युक्रेनचे सध्याचे अध्यक्ष वोलोदमिर झेलेन्स्की यांनी सरळ रशियाविरोधी भुमिका घेऊन युक्रेनला त्यांच्या हिताचे निर्णय घेण्याचा हक्क आहे. अशी भूमिका घेतली. युक्रेनवर रशियाचे वर्चस्व निर्माण करण्याच्या मार्गात झेलेन्स्की हा एक मोठा अडथळा ठरत आहे, हे लक्षात आल्यानंतर पुतीन यांनी युक्रेनविरुद्ध हे आक्रमणाचे अस्त्र उगारले आहे. युक्रेनवर सध्या रशिया जे आक्रमण करीत आहे. ते डोनेक्ट व लुहान्सक या नवस्वतंत्र देशांच्या आमंत्रणावरून त्यांच्या संरक्षणासाठी केले आहे. असे पुतिन म्हणत असले तरी त्यांचा खरा उद्देश युक्रेनमधील सध्याचे सरकार बरखास्त करून तेथे रशियाला अनुकूल सरकार स्थापणे हा आहे.

या आक्रमणापूर्वी अमेरिका व नाटो देशांनी युक्रेनला समर्थन दिले होते, पण प्रत्यक्ष आक्रमण सुरू झाल्यावर यातला एकही देश युक्रेनला वाचवण्यासाठी युद्धात उतरला नाही. पण अमेरिकेची व काही युरोपीय राष्ट्रांची युक्रेनला युद्धसाहित्यची छुपी मदत चालू आहे. युक्रेन हा नाटोचा सदस्य नसल्यामुळे अमेरिका व नाटोला या युद्धात उतरणे शक्य नव्हते.

वर म्हटल्याप्रमाणे हे युद्ध युक्रेन आणि रशियामध्ये होत असले तरी ते खरे तर अमेरिका व रशियात होत आहे व त्यांनी आपल्या युद्धासाठी युक्रेनची भूमी निवडली आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. या युद्धाला रशिया व अमेरिका या दोन्ही राष्ट्रांचा आडमुठेपणा व सत्तालालसा कारणीभूत आहे हेही लक्षात घेतले पाहिजे. युक्रेनवरील बॉम्बवर्षावात सामान्य लोकांचे हाल पाहून जगभर युक्रेनविषयी सहानुभूतीची लाट निर्माण झाली आहे. पण युक्रेनने नाटो प्रवेशाचा आग्रह सोडून रशियाच्या हमीने तटस्थ राहण्याची तयारी दर्शवली असती तर हे युद्ध टळले असते.

दि. २४ फेब्रुवारी २०२२ रोजी रशियाने युक्रेनवर हल्ला केला आणि गेले काही दिवस तिथे तीव्र युद्ध सुरू आहे. रशियाच्या एकतर्फी, काहीही समर्पक कारण नसताना युक्रेनने 'नाटो' राष्ट्रात सामील होऊ नये, असं कारण सांगत युध्द सुरू केलं आणि आपली बलाढय सेना युक्रेनमध्ये घुसवली. पण युक्रेन प्रखर प्रतिकार करीत देशप्रेमाने उठून शर्थीचा मुकाबला करीत आहे, रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांनी युध्द लवकर संपावे म्हणून आपले अण्वस्त्र सज्ज ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे तिसरे महायुध्द तेही आण्विक शक्यता असलेले युध्द होणार की काय, या शंकेने सारं जग अस्वस्थ व भयशंकित आहे.

भारताने आपल्या परंपरागत अलिप्ततावादाच्या भुमिकेला अनुसरून या युद्धात तटस्थ राहणे पसंत केले आहे. संयुक्त राष्ट्रांत आलेल्या दोन रशियाविरोधी ठरावात भारत तटस्थ राहिला आहे.

भारताचे अलीकडच्या काळात अमेरिकेशी संरक्षण संबंध निर्माण झाले आहेत व येत्या काळात ते वाढण्याची शक्यता आहे, त्यामुळे भारताच्या या युद्धातील भुमिकेकडे सगळ्या जगाचे लक्ष होते. पण भारताने अमेरिकेचा दबाव असूनही तटस्थ भूमिका घेतली व रशियाचे असलेले संबंध तुटणार नाही हे स्पष्ट केले.



आज ४ महिने झाले. आपल्याला लष्करी मोहिमेचे करायचे काय, याचे उत्तर त्यांच्याकडे आहे असे दिसत नाही. सुरुवातीस रशियास वाटत होते युक्रेनचा घास घेणे २-५ दिवस, फार फार तर आठवडाभराचे काम ! युक्रेनपासून क्रिमिया वेगळा करण्यात रशियाची मोहीम फत्ते झाली होती. त्याच भरवशावर युक्रेनचा घाट घातला गेला. पण तो एका अर्थी फसला. युक्रेनचे सुरक्षा दल आणि मुख्य म्हणजे सामान्य जनता बघता बघता अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांच्या पाठीशी उभी राहिली आणि एकेका गावांसाठी झुंजण्याची वेळ रशियन फौजांवर आली. एखादे गाव, शहर पादाक्रांत करून पुढे जावे तर युक्रेनी फौजांकडून फेरहल्ले होऊ लागले. रशियन फौजांनी बळकावलेली काही शहरे पुन्हा युक्रेन फौजांनी आपल्याकडे घेतल्याचे अनेकदा दिसून आले. त्यामुळे या मोहिमेला काहीच अर्थ उरला नाही. तीन महिन्यांच्या संघर्षानंतरही रशियन फौजांच्या हाती फारसे काही भरीव लागलेले नाही. उलट फारसे कोणास माहितही नव्हते असे झेलेन्स्की याच काळात जगभर लोकप्रिय होऊन एक प्रकारे साम्राज्यवाद विरोधाचे नायक बनले. रशियाच्या वाट्यास ना यश आले ना जगाची सहानुभूती. उलट पुतिन हे अधिकाधिक खलनायक ठरू लागले आणि त्यांची राजनैतिक पुण्याईही आटत गेली.

हे सारे केले त्यामागचे लहानसे कारण होते युक्रेन या देशास अमेरिका-केंद्रित 'नॉर्ट अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन'. म्हणजे 'नाटो' संघटनेचे सदस्य बनवण्यापासून रोखणे. तसे झाल्यास परिसरात आपला प्रभाव कमी होईल आणि अमेरिका-प्रभावाखालील युक्रेन उंबरठ्यावर असेल. हा आपल्या देशास धोका आहे, असे पुतिन यांचे म्हणणे. ते कागदोपत्री योग्य. पण आंतरराष्ट्रीय राजकारण या कागदोपत्रीय हश्तेवर चालत नाही. घर असो वा देश. शेजारी निवडण्याचा अधिकार कोणालाही नसतो. पुतिन यांनी तो धरला. युक्रेनने 'नाटो' सदस्यत्व नाकारावे हा आणि इतकाच उद्देश होता तर त्या देशास मदतीच्या ओझ्याखाली कृतकृत्यतेच्या भावनेत जखडून ठेवणे हा मार्ग जास्त योग्य होता. पण त्यासाठी मुत्सद्देगिरी लागते. पुतिन यांनी तसे न करता दांडगाईचा मार्ग स्वीकारला. तो आता पूर्ण अंगाशी आल्याचे दिसते. स्वीडन आणि फिनलंड या देशांची कृती हेच दर्शवते. वास्तविक स्वीडनसारखा देश सर्वार्थाने कोणाच्याही अध्यात ना मध्यात अशा तऱ्हेने वागत असतो. त्यामुळे तो ना धड अमेरिकेच्या गोटातला ना रशियाच्या. पण पुतिन यांचे वर्तन पाहून स्वीडनसारख्या देशानेही आपली पिढीजात तटस्थता सोडून 'नाटो' च्या गटात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. फिनलंड देशाचेही तेच. उत्तर गोलार्धातजवळचे हे देश अमेरिकी गोटात सहभागी झाल्यास त्याची जबाबदारी पूर्णपणे पुतिन यांची असेल.

या युद्धामुळे रशियाने जर्मनीसारखा आपला मोठा ग्राहक अमेरिकेच्या पदरात घातला. पाठोपाठ युरोपातील अन्य देशही रशियापेक्षा यापुढे इंधनासाठी अधिकाधिक अमेरिकेवर अवलंबून राहतील. त्यात आता फिनलंड आणि स्वीडनची ही कृती म्हणजे युक्रेनमध्ये लष्करी मोहिमेत काही हात पोळायचे ते पोळले जातच आहेत, पण त्याचबरोबर दीर्घकालीन आर्थिक नुकसानही रशिया ओढवून घेत आहे. आधीच मुळात रशियाची अर्थव्यवस्था अमेरिका वा जर्मनी यांच्या इतकी सुदृढही नव्हती. त्यात रशियाने आपल्या कमाईचे सर्वात मोठे साधन म्हणजे खनिज तेल वा इंधन वायू गमावले तर त्यात फायदा अमेरिकेचा आहेच आहे, पण रशियासाठी ते अधिक नुकसानकारक आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिका अध्यक्ष जो बायडन यांनी युक्रेनसाठी ४ हजार कोटी डॉलर्सची मदत जाहीर केली. प्रसंगी स्थितीत वाढच होईल. अन्य अनेक देशांनीही युक्रेनसाठी मिळेल त्या घटकांची मदत देऊ केली आहे .

या उलट रशिया मात्र कधी कधी एकटा पडत चाललेला दिसतो. सुरुवातीच्या काळात चीन या युद्धाच्या पापातला वाटा घेईल असे वाटत होते, तसेही झाले नाही. चीनने योग्य वेळी पुतिन आणि रशिया यांची अलगदपणे साथ सोडली. हे सारे इशारे आहेत. ते समजून न घेता पुतिन आपला दुराग्रह असाच रेटत राहीले तर युक्रेन हे रशियाचे 'व्हिएतनाम' ठरेल यात शंका नाही.

✦ ✦ ✦ ✦

Essay

# Choice-Based Credit System : A System of Opportunities

Dr. Vallabh Karandikar
Dept. of English

UGC has taken a great step by introducing CBCS for higher education in India. It is a learner-centric system. It aims at developing students' performance and knowledge. Moreover, it tries to prepare students to meet global challenges through its ideal pattern and by providing need- based skills required in the global market. This system provides opportunities for the learners to excel in different fields of their choice. The choice-based credit system has made the higher education system more dynamic,effective and globally acceptable as it follows international parameters. It is a totally different system than the conventional system. CBCS arose in response to new educational problems.It follows a semester structure and tries to assess students' performance using internationally recognised standards.

ग्रंथालयाचे पूर्ण संगणकीकरण झालेले असून Inflibnet N List ही सुविधा उपलब्ध असून अनेक विद्यार्थी, प्राध्यापक, सदर सुविधेचा वापर करत आहे. याशिवाय विद्यार्थ्यांना ग्रंथालयात मोफत इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये ग्रंथालय विभागाचे कामकाज ग्रंथालय विभागप्रमुख प्रा. के.जी. उंबरे यांनी पाहिले.

## स्पर्धा परीक्षा समिती

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील स्पर्धा परीक्षा समितीच्या कामकाजाचा आढावा पुढीलप्रमाणे

**वेबिनारचे आयोजन :**

दिनांक ३१ जुलै २०२० रोजी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग आणि स्पर्धा परीक्षा विभाग व युनिक अकॅडमी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी पदवी काळात यूपीएससी व एमपीएससी या स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी या विषयावर वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. या वेबिनारमध्ये युनिक अकॅडमी पुणे येथील तज्ज्ञ श्री. कैलास भालेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या वेबिनारसाठी द युनिक अकॅडमीकडून डॉ.नवनाथ घुगे व चंद्रकांत कराटे यांचेही सहकार्य मिळाले. महाविद्यालयातील एकूण ५५ विद्यार्थी व प्राध्यापक या वेबिनारमध्ये सहभागी झाले होते.

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची स्थापना :**

महाराष्ट्र शासन शिक्षण सहसंचालक यांचे दिनांक २९/०१/ २०१९ च्या संदर्भीय पत्रानुसार प्रत्येक महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. त्यानुसार दिनांक ०२/०२/२०२१ रोजी महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची स्थापना करण्यात आली. तसेच महाविद्यालयातील प्रा. सुनील नेवकर यांची स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

**विचारविनिमय सभा :**

महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची स्थापना करण्यात आल्यानंतर सर्व सदस्यांची नियुक्ती करून दिनांक ११/ ०२/२०२१ रोजी मा. प्राचार्य डॉ. इंद्रजित जाधव सर यांच्या अध्यक्षतेखाली विविध विषयावर विचार विनिमय करण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले. तसेच राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था मुंबई यांच्याकडून युपीएससी नागरी सेवा परीक्षा २०१९ च्या पूर्वतयारीसाठी परीक्षा पूर्व कार्यक्रम २०२१ या कार्यक्रमाची विस्तृत माहिती महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान व बीबीए (सीए) या विद्याशाखांतील सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत देण्यात आली.

**आयएएस (IAS) आपल्या भेटीला आणि उद्योजक आपल्या भेटीला या उपक्रमातील सहभाग :**

तंत्रशिक्षण संचलनालय महाराष्ट्र राज्य यांच्या तर्फे आयोजित करण्यात आलेल्या IAS आपल्या भेटीला व उद्योजक आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना मा.प्राचार्य आय.बी.जाधव सर यांनी झूम ॲपच्या माध्यमातून ऑनलाईन मार्गदर्शन केले. सदर शैक्षणिक वर्षात कोरोना महामारीमुळे महाविद्यालयांचे कामकाज ऑनलाईन पध्दतीने सुरू असल्यामुळे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे विद्यार्थ्यांना झूम ॲप आणि गूगल मीट या ॲपच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले.

**करिअर इन बँकिंग अँण्ड सेंट्रल गव्हर्नमेंट या विषयावर वेबिनारचे आयोजन :**

महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि प्रज्ञा अकॅडमी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक २९ ऑगस्ट २०१९ रोजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी करिअर इन बँकिंग अँण्ड सेंट्रल गव्हर्नमेंट या विषयावर वेबिनारचे आयोजन महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि प्रज्ञा अकॅडमी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक २९ ऑगस्ट २०१९ रोजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले होते. या वेबिनारमध्ये प्रज्ञा अकॅडमी मुंबईचे प्रमुख श्री. विकास सावंत सर यांनी विद्यार्थ्यांना करियर इन बँकिंग अँण्ड सेंट्रल गव्हर्नमेंट या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. या वेबिनारसाठी प्रज्ञा अकॅडमीचे श्री. प्रभाकर मोरे, सौ. श्वेता जाधव मॅडम यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. या वेबिनारमध्ये एकूण ८४ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन सहभाग घेतला.

**मॉडेल कौशल्य विकास केंद्र म्हणून महाविद्यालयाची निवड :**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्यामार्फत करियर कट्टा या उपक्रमात सुरू होणाऱ्या मॉडेल कौशल्य विकास केंद्रासाठी महाराष्ट्र राज्यातील ५० महाविद्यालयांमध्ये बी.डी.काळे महाविद्यालयाची निवड करण्यात आली. सदर केंद्रासाठी राज्य शासनाकडून १० लाख रुपये रक्कम उपलब्ध करून दिली जाणार आहे.

**विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा क्लबची स्थापना :**

यूपीएससी व एमपीएससी, बँकिंग, स्टाफ सिलेक्शन, रेल्वे बोर्ड इत्यादी स्पर्धा परीक्षा संदर्भात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा क्लबची स्थापना करण्यात आलेली आहे. या स्पर्धा परीक्षा क्लब अंतर्गत एकूण ११५ विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी केलेली आहे. सदर विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले जाते. तसेच ग्रंथालयाची विशेष सेवाही उपलब्ध करून दिली जाते.

**मार्गदर्शनपर सभा :**

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांची शनिवार दिनांक ११/१२/२०१९ रोजी मा. प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली विविध विषयावर सभा पार पडली. या सभेसाठी एकूण ६५ विद्यार्थी उपस्थित होते. या सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. इंद्रजित जाधव सर यांनी बहुमोल मार्गदर्शन केले.

**स्पर्धा परीक्षा एक दिवसीय कार्यशाळेमधील सहभाग :**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या वतीने सुरू असणाऱ्या करियर कट्टा या उपक्रमांतर्गत पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्याशी संलग्न सर्व महाविद्यालयांसाठी दिनांक ६ डिसेंबर २०१९ रोजी नेस वाडिया महाविद्यालय पुणे येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर एक दिवसीय कार्यशाळेमध्ये महाविद्यालयाचे प्रा. इंद्रजित जाधव सर व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक प्रा. सुनील नेवकर यांनी सहभाग घेतला.

**क्यू आर कोड नामफलकाचे उद्‌घाटन :**

राज्यपातळीवरील करियर कट्टा या उपक्रमात बी.डी.काळे महाविद्यालयात क्यू आर कोड नामफलकाचे उद्‌घाटन दिनांक २७/१२/२०१९ रोजी करण्यात आले. युवकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी ऑनलाईन सुरू झालेल्या करियर कट्टा या उपक्रमात बी.डी.काळे महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. इंद्रजित जाधव यांनी केले.

**महाविद्यालयातील तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन :**

राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था मुंबई यांच्याकडून यूपीएससी, नागरी सेवा परीक्षा २०२२ च्या पूर्वतयारीसाठी

परीक्षापूर्व कार्यक्रम २०२२ या कार्यक्रमाची विस्तृत माहिती महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान व बीबीए (सीए) विद्याशाखेतील तृतीय वर्षातील सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत देण्यात आली.

**भित्तिपत्रकाचे उद्‌घाटन :**

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र विभागाच्या वतीने करियर कट्टा या उपक्रमांतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या वर्तमानपत्रातील बातम्यांचे भित्तिपत्रक तयार करून त्याचे उद्‌घाटन शनिवार दिनांक २६/०३/२०२२ रोजी श्री. कैलास खेडेकर (सहाय्यक प्रकल्प अधिकारी) यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे सर्व मान्यवर पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, स्पर्धा परीक्षा केंद्राचे समन्वयक, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग, व विद्यार्थी उपस्थित होते.

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ व २०२१-२०२२ मध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र या विभागाचे काम प्रा. सुनील नेवकर व समिती सदस्य यांनी पाहिले.

## वाङ्‌मय मंडळ

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांच्या लेखनविषयक कौशल्यांना वाव मिळावा त्यांचे उद्बोधन व्हावे या हेतूने महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना युवा व्यासपीठ या भित्तिपत्रकाद्वारे संधी उपलब्ध करून दिली जाते. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये कोरोना महामारी निर्बंधांमुळे महाविद्यालयांचे अध्यापन कामकाज ऑनलाईन पद्धतीने सुरू होते. सदर वर्षात युवा व्यासपीठ या भित्तिपत्रकाच्या माध्यमातून प्रासंगिक लेख, विशेषांक प्रकाशनास मर्यादा आल्या. परंतु २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयांचे कामकाज ऑफलाईन पद्धतीने सुरू झाल्यामुळे भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष, महात्मा गांधी जयंती, रॅगिंग प्रतिबंध, कोरोना जाणीव जागृती, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, संविधान दिन, प्रजासत्ताक दिन, आंतरराष्ट्रीय महिला दिन इत्यादी विषयांना अनुसरून एकूण ०८ अंकांचे प्रकाशन करण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये वाङ्‌मय मंडळ विभागाचे काम प्रा. डॉ. सी.व्ही.कदम यांनी पाहिले.

## उद्योजकता विकास केंद्र

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये उद्योजकता विकास केंद्रांतर्गत आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित बी.डी.काळे महाविद्यालय घोडेगाव, जनशिक्षण संस्थान पुणे आणि यशवर्धिनी ग्रामीण महिला स्वयं सिद्धा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २०/०२/२०२१ रोजी महिलांसाठी कुक्कुटपालन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाला मा. श्री. अशोक लगड साहेब तसेच मा. श्री. सुरेश उमाप साहेब यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती महिलांना दिली. यामध्ये शेती निगडित व्यवसाय व महिलांसाठी राबविले जाणारे इतर व्यवसाय इ. ची माहिती दिली.

दिनांक २१/०२/२०२१ रोजी या कार्यक्रमाला पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. शिंदे साहेब यांनी मार्गदर्शन केले. पक्ष्यांची काळजी कशी घ्यावी ? त्यांना दिले जाणारे खाद्य कसे असावे ? याबाबत त्यांनी महिलांचे उद्बोधन केले.

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये उद्योजकता विकास केंद्राचे काम प्रा. आदिती दशरथ काळे यांनी पाहिले.

## प्रसिद्धी समिती

महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागांच्या वतीने राबविण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमास महाराष्ट्रभर प्रसिद्धी देण्यासाठी महाविद्यालयात प्रसिद्धी समिती कार्यरत आहे. राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ, शारीरिक शिक्षण विभाग, वक्तृत्व वादविवाद मंडळ, राष्ट्रीय छात्र सेना, स्पर्धा परीक्षा समिती, सांस्कृतिक कार्यक्रम समिती, इत्यादी समितींचे विस्तारित कार्यक्रम जनमानसात परिचित होण्यासाठी ही समिती कार्यरत आहे. सदर समितींच्या ठळक घडामोडींना वर्तमानपत्रातून प्रसिद्धी दिली जाते. महाराष्ट्रातील दैनिक सकाळ, पुढारी, लोकमत, प्रभात, लोकसत्ता, पुण्यनगरी, केसरी, नवराष्ट्र, महाराष्ट्र टाइम्स, साप्ताहिक अभिनव खानदेश, साप्ताहिक चौफेर संघर्ष इ. दैनिके व साप्ताहिकांमधून ठळक उपक्रमांना प्रसिद्धी दिली जाते.

तसेच घोडेगाव येथील आंबेगाव वार्ता, आपला आवाज, आंबेगाव न्यूज, समर्थ भारत न्यूज, इत्यादी चॅनलने महाविद्यालयातील उपक्रमांना आपल्या चॅनेलच्या माध्यमातून प्रसारित केले आहे. घोडेगाव व मंचर येथील वार्ताहर, बातमीदार, पत्रकार इत्यादींनी महाविद्यालयात यशस्वीरित्या राबविण्यात आलेले विद्यार्थीकेंद्री उपक्रम तसेच विविध आंतर महाविद्यालयीन, विद्यापीठस्तरीय स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मिळविलेले प्राविण्य या बाबींना यथायोग्य प्रसिद्धी देऊन महाविद्यालयातील विविध उपक्रमांना जनमानसापर्यंत पोहचविण्याचे काम केले आहे. या कामाबद्दल स्थानिक व तालुक्यातील सर्व वर्तमानपत्रांच्या वार्ताहरांचे संस्था, महाविद्यालय व प्रसिध्दी समितीच्या वतीने आभार मानण्यात येत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये प्रसिद्धी विभाग प्रमुख म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य व मराठी विभागाचे प्रमुख प्रोफेसर डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर यांनी काम पाहिले आहे.

## प्राध्यापक ज्ञानवर्धक सभा

स्टाफ वेल्फेअर समितीच्या वतीने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकरिता विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. या समितीच्या वतीने खालील व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

| दिनांक | वक्ते | विषय |
|---|---|---|
| १४/१२/२०२१ | प्रा. सोमनाथ जगताप (घोडेगाव) | ई कन्टेन्ट डेव्हलपमेंट. |
| ३१/१२/२०२१ | प्रा. गणेश वाघ (मंचर) | नॅकपूरक उपक्रम. |
| ०७/०१/२०२२ | प्रा. सचिन घायतडके (घोडेगाव) | नवमार्क्सवाद. |
| ११/०२/२०२२ | प्रा. प्रवीण पारधी (घोडेगाव) | अर्थसंकल्प २०२२-२०२३. |
| २९/०३/२०२२ | प्रोफेसर डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर (घोडेगाव) | सावित्रीबाई फुले यांचे साहित्य. |
| २९/०३/२०२२ | मा. मेघनाद निघोट (मंचर) | आपत्ती व्यवस्थापनः गॅस लिकेज. |

शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये प्राध्यापक ज्ञानवर्धक सभेचे काम प्रा. पोपट माने यांनी पाहिले.

## पालक शिक्षक संघ

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये महाविद्यालयामध्ये पालक शिक्षक संघाची स्थापना करण्यात आलेली आहे. या संघामध्ये महाविद्यालयातील एकूण १२ वर्गांची संख्या लक्षात घेता प्रत्येक वर्गाचे प्रतिनिधित्व करणारे एक पालक या प्रमाणे एकूण १२ पालकांची प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आलेली होती. या संघामध्ये प्रातिनिधिक स्वरूपात महाविद्यालयातील ०४ प्राध्यापकांची निवड शाखेचे प्रमुख म्हणून करण्यात आलेली आहे. या संघाचे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून मा. प्राचार्य डॉ. आय. बी. जाधव सर व संघाचे समन्वयक म्हणून प्रोफेसर डॉ. बी. व्ही. गव्हाळे यांची निवड करण्यात आलेली आहे. सदर संघाच्या प्रत्येक सभासदांना पत्र देऊन त्यांची महाविद्यालयामध्ये वर्षातून किमान दोन वेळा सभा आयोजित केल्या जातात.

सदर शैक्षणिक वर्षामध्ये पालक शिक्षक संघाची पहिली सभा दिनांक ०९ डिसेंबर २०२१ रोजी आयोजित करण्यात आली. सदर सभेला सर्व सभासद उपस्थित होते. या सभेमध्ये रॅगिंग ॲक्ट, २०२१-२२ मधील शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया, महाविद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती, तक्रार निवारण, नॅक मूल्यमापन, विशाखा दक्षता समिती याबाबत विचारविनिमय करण्यात आला. पालक-शिक्षक संघाचे कामकाज शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रोफेसर डॉ. बी. व्ही. गव्हाळे यांनी पाहिले.

## Placement Cell

शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये बी. डी. काळे महाविद्यालय घोडेगाव, प्लेसमेंट सेल आणि स्किल इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगार मेळावा (Job Fair) दिनांक २८ ऑक्टोबर २०२१ रोजी आयोजित करण्यात आला होता. यामध्ये महाविद्यालयातील विविध विद्याशाखांमधील ६३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सदर विद्यार्थ्यांमधून ३० विद्यार्थ्यांची निवड ही दुसऱ्या फेरीसाठी झाली

दुसरी फेरी Jet India Campus पुणे या ठिकाणी पार पडली त्यातून २० विद्यार्थ्यांनी पुणे या ठिकाणी मुलाखत दिली. त्यातून दोन विद्यार्थिनी शेवटच्या फेरीसाठी पात्र ठरल्या. त्यातील एक विद्यार्थिनी सध्या गोवा विमानतळावर कार्यरत आहे.

तसेच बी.डी.काळे महाविद्यालय घोडेगाव, प्लेसमेंट सेल आणि आय.आय.बी.एम. ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगार मेळावा दिनांक २९/०३/२०२२ रोजी आयोजित करण्यात आला होता. यामध्ये महाविद्यालयातील विविध शाखांमधील २९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. य विद्यार्थ्यांमधून १४ विद्यार्थ्यांची निवड ही दुसऱ्या फेरीसाठी झाली. दुसरी फेरी ही आय.आय.बी.एम. कॅम्पस पुणे या ठिकाणी पार पडली, त्यातून ०२ विद्यार्थी अंतिम फेरीसाठी पात्र ठरले.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये या विभागाचे काम प्रा. आदिती दशरथ काळे यांनी पाहिले.

## वादविवाद वक्तृत्व व निबंध लेखन समिती

महाविद्यालयातील वादविवाद, वक्तृत्व आणि निबंध लेखन समितीच्या वतीने राज्यभरातील विविध स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी होत असतात. या विविध स्पर्धांमधील प्राविण्य प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे-

श्रीमती विमलाबेन खिमजी तेजूकाया कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय नाशिक देवळाली कॅम्प आयोजित सहाव्या विद्यापीठस्तरीय निबंध लेखन स्पर्धेत महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील तृतीय वर्षांतील विद्यार्थिनी कुमारी प्रियंका गुलाब सुतार या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक प्राप्त केला. या विद्यार्थिनीला पारितोषिक स्वरूपात रक्कम रुपये ४००१ व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

बी.डी.काळे महाविद्यालय घोडेगाव, तहसील कार्यालय आंबेगाव आणि आंबेगाव तालुका ग्राहक पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ग्राहक दिनाच्या निमित्ताने आयोजित निबंध लेखन स्पर्धांमध्ये खालील तीन विद्यार्थिनींनी क्रमांक प्राप्त केले.

प्रथम क्रमांक : १) प्रीती नवनाथ काळे
द्वितीय क्रमांक : २) प्रियंका गुलाब सुतार
तृतीय क्रमांक : ३) अंकिता अविनाश काळे

**तालुकास्तरीय निबंध स्पर्धा :**

- यशवर्धिनी ग्रामीण महिला स्वयंसिध्द संघ, ता-आंबेगाव
  **विषय :** विवाहसंस्था-तरूणाईच्या वाढत्या अपेक्षा आणि त्याचा वैयक्तिक व सामाजिक परिणाम. - प्रथम क्रमांक
  कु. प्रियांका गुलाब सुतार

**जागतिक ग्राहक दिन :**

- बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
  **विषय :** फसव्या जाहिराती - द्वितीय क्रमांक
  कु. प्रियांका गुलाब सुतार

**आंतरमहाविद्यालयीन पोस्टर स्पर्धा :**

- Indian Red Cross Society
  **विषय :** प्लॅस्टिक मुक्त भारत - प्रथम क्रमांक
  कु. प्रियांका गुलाब सुतार

**आंतरमहाविद्यालयीन निबंध स्पर्धा :**

- Indian Red Cross Society
  **विषय :** रेड क्रॉसची तत्त्वे आणि कार्य - द्वितीय क्रमांक

**आंतरमहाविद्यालयीन निबंध स्पर्धा :**

- छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
  **विषय :** आजच्या काळात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांची गरज
  तृतीय क्रमांक - प्रियांका गुलाब सुतार, तृतीय वर्ष, विज्ञान

**राज्यस्तरीय निबंध स्पर्धा :**

- महात्मा गांधी कला, शाखा व वाणिज्य महाविद्यालय, चोपडा जि. जळगाव.

**विषय :** मराठी अमुची राजभाषा असे

तृतीय क्रमांक - उज्ज्वला गुलाब सुतार, एम.ए.भाग २

**जिल्हास्तरीय ऑनलाईन निबंध स्पर्धा :**

- मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे

  **विषय :** मी मताधिकार बजावणार

  तृतीय क्रमांक - उज्ज्वला गुलाब सुतार, एम.ए.भाग २

**जिल्हा-स्तरीय ऑनलाईन चित्रकला स्पर्धा :**

- मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे

  **विषय :** १८ वर्षे पूर्ण झालेल्यांना मतदान दिनानिमित्त जनजागृती

  उत्तेजनार्थ क्रमांक - उज्ज्वला गुलाब सुतार, एम.ए.भाग २

**राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा**

- महात्मा गांधी कला, वाणिज्य महाविद्यालय, चोपडा जि. जळगाव.

  कु. अपेक्षा प्रदिप बांबळे - तृतीय क्रमांक

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये या समितीचे काम प्रा. पोपट माने यांनी पाहिले.

## सांस्कृतिक कार्यक्रम समिती

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये कोरोना महामारीच्या निर्बंधामुळे महाविद्यालयांचे कामकाज ऑनलाईन पध्दतीने सुरू असल्यामुळे सदर कालावधीत सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन प्रत्यक्ष करण्यात आले नाही. परंतु शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये महाविद्यालयांचे कामकाज ऑफलाईन पध्दतीने सुरू झाल्यामुळे विविध महाविद्यालये, संस्थांनी आयोजित केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन प्राविण्य प्राप्त केले त्याचा आढावा पुढीलप्रमाणे

**१) रांगोळी स्पर्धेतील सहभाग :**

आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक विभागाने आयोजित केलेल्या राज्य पातळीवरील रांगोळी स्पर्धेत महाविद्यालयातील ०५ विद्यार्थीनींनी ऑनलाईन सहभाग घेतला.

**२) तालुकास्तरीय एकपात्री अभिनय स्पर्धेतील प्राविण्य :**

आंबेगाव तालुका एकपात्री कलाकार संघाने आयोजित केलेल्या (०१ जाने. २०२२) तालुकास्तरीय खुल्या एकपात्री अभिनय स्पर्धेत प्राविण्य प्राप्त विद्यार्थीनी पुढीलप्रमाणे-

| अ. क्र. | विद्यार्थीनीचे नाव | प्राविण्य |
|---|---|---|
| १. | कु. सेजल विजय काळे | प्रथम क्रमांक |
| २. | कु. किर्ती अभय तळेकर | द्वितीय क्रमांक |
| ३. | कु. श्रृती दत्तात्रय तळेकर | तृतीय क्रमांक |

**३) पथनाट्याद्वारे जाणीवजागृती :**

महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने 'जागर कोरोनामुक्तीचा' या पथनाट्याची निर्मिती करून घोडेगाव, दत्तक गाव आमोंडी व परिसरातील गावांमध्ये कोरोनामुक्तीच्या दिशेने जाणीवजागृती घडवून आणली.

**४) राज्यपातळीवरील एकपात्री अभिनय स्पर्धेतील प्राविण्य :**

महाराष्ट्र राज्य एकपात्री संघ व निळू फुले कला अकादमी यांच्या वतीने महिलांसाठी खुल्या एकपात्री अभिनय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या निवड चाचणीमध्ये महाविद्यालयातील बी.बी.ए. (सी.ए.) या विभागातील कु. किर्ती अभय तळेकर व कु. सेजल विजय काळे या विद्यार्थीनींनी सहभाग घेतला. या स्पर्धेच्या महाअंतिम फेरीसाठी कु. सेजल विजय काळे या विद्यार्थीनीची निवड होऊन सदर विद्यार्थीनीला चतुर्थ क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

**५) महिलारत्न पुष्पाताई हिरे आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय गायन स्पर्धेतील सहभाग -**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, विद्यार्थी विकास मंडळ व महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित महिलारत्न पुष्पाताई हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालय मालेगाव कॅम्प. जि. नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिलारत्न पुष्पाताई हिरे राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन गायन स्पर्धेत भारतीय सुगम संगीत गायन (वैयक्तिक) प्रकारात प्राथमिक फेरीतून अंतिम फेरीसाठी महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील कु. अपेक्षा महादू गिजरे या विद्यार्थीनीची निवड झाली.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये सांस्कृतिक विभागाचे काम प्रा. डॉ. चांगुणा कदम यांनी पाहिले.

## विद्यार्थी विकास मंडळ

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने मास्क निर्मिती व वाटप, वृक्षारोपण कार्यक्रम, आरोग्य तपासणी, परिसर स्वच्छता व वर्गखोल्या निर्जंतूकीकरण, दक्षता जागृती सप्ताह, संविधान दिन, जागतिक एड्स दिन, मतदार नावनोंदणी व फिट इंडिया मोहिम, राष्ट्रीय युवा दिन, रस्ता वाहतूक सुरक्षा कार्यक्रम, जागतिक महिला दिन, आझादी का अमृत महोत्सव, पोषण पंधरवडा, शिवस्वराज्य दिन, आंतरराष्ट्रीय योग दिन इ. उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने रॅगिंग प्रतिबंधात्मक उपाययोजना, समान संधी कक्ष, पात्र विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी, आझादी का अमृत महोत्सव, कोरोना प्रतिबंधात्मक विशेष लसीकरण मोहिम, जागतिक दिव्यांग दिन, रक्तगट व हिमोग्लोबीन तपासणी, स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती, भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर अभिवादनसभा, कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, जागतिक महिला दिन, जागतिक ग्राहक दिन, स्वयंसिध्दा युवती संमेलन नावनोंदणी इ. उपक्रम राबविण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये विद्यार्थी विकास मंडळ विभागाचे काम विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. जी. जी. पारखे व समिती सदस्य यांनी पाहिले.

## वार्षिक पारितोषिक वितरण व युवक महोत्सव

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने दिनांक २२/०५/२०२२ व २३/०५/२०२२ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मा. ना. दिलीपरावजी वळसे पाटील साहेब (गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य), प्राचार्य डॉ. भाऊसाहेब जाधव (कार्याध्यक्ष, मराठवाडा मित्र मंडळ पुणे), मा. डॉ. नंदकुमार निकम (माजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राचार्य महासंघ) उपस्थित होते.

वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते महाविद्यालयातील कला, क्रीडा, वर्षभरातील विविध स्पर्धामधील प्रथम क्रमांक आणि गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी तसेच पुरस्कार प्राप्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचा प्रमाणपत्र, ट्रॉफी, गुलाबपुष्प, ग्रंथभेट देऊन यथोचित गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ घोडेगाव या संस्थेचे अध्यक्ष मा. श्री सुरेशशेठ काळे हे होते.

युवक महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा यासाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यासाठी पनिशमेंट, शेलापागोटे, फॅन्सी ड्रेस, विविध गुणदर्शन, गीतगायन, नृत्य अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वार्षिक पारितोषिक वितरण व युवक महोत्सव या दोन्ही कार्यक्रमासाठी संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, संचालक व सल्लागार मंडळ, विविध संस्थांचे पदाधिकारी, विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी, ग्रामस्थ, पत्रकार, सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

## कमवा व शिका योजना

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळाच्या सहकार्याने कर्मवीर भाऊराव पाटील कमवा शिका योजना शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळाच्या मार्गदर्शक पत्रानुसार जानेवारी २०२२ ते फेब्रुवारी २०२२ अखेर विशेष बाब म्हणून राबविण्यात आली. या योजनेचा लाभ खुल्या प्रवर्गातील ०२ इतर मागास प्रवर्गातील ०२ तसेच एसटी. संवर्गातील ०६ अशा एकूण १० विद्यार्थ्यांनी घेतला.

या विद्यार्थिनींनी कार्यालयीन काम, ग्रंथालयातील काम, साफसफाई, संगणकीय कामे, इत्यादी विविध प्रकारची कामे केली. या कालावधीत ३७१ तास विद्यार्थिनींनी काम केले. प्रति तास ४५ रुपये याप्रमाणे एकूण रुपये १६ हजार ६९५ विद्यार्थिनींना अदा करण्यात आले.

अशाप्रकारे गरीब होतकरू व गरजू विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये या योजनेचे काम विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. जी.जी.पारखे यांनी पाहिले.

## इतिहास विभाग

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये करोना महामारीमुळे महाविद्यालयांचे कामकाज ऑनलाईन पध्दतीने सुरू होते. सदर शैक्षणिक वर्षात ऑनलाईन पध्दतीने राबविलेले उपक्रम पुढीलप्रमाणे

**१) ऑनलाईन पध्दतीने अध्यापन कामकाज :**

सदर शैक्षणिक वर्षात गूगल मीट व झूम ॲप च्या माध्यमातून अध्यापन कामकाज करण्यात आले.

**२) अंतर्गत परीक्षा :**

सदर शैक्षणिक वर्षात गूगलफॉर्म लिंकच्या माध्यमातून अंतर्गत परीक्षा घेण्यात आल्या.

**३) ऑनलाईन विद्यार्थी सभेचे आयोजन :**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. इंद्रजित जाधव सर यांच्या अध्यक्षतेखाली इतिहास विभागातील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत अभ्यासक्रम पूर्तता, ऑनलाईन वार्षिक परीक्षेला सामोरे जाताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे निवारण कसे करावे याबाबत मार्गदर्शनपर सूचना करण्यात आल्या.

### शैक्षणिक वर्ष २०२१-२२

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये इतिहास विभागाने खालील विविध उपक्रम राबवले आहेत, त्याचा आढावा पुढीलप्रमाणे-

**प्रवेशित विद्यार्थी संख्या -**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये एस.वाय.बी.ए. इतिहास विशेष स्तरावर एकूण १२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. तसेच टी.वाय.बी.ए. इतिहास विशेष स्तरावर एकूण ०९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला होता.

**विद्यार्थी सभेचे आयोजन -**

दिनांक १३ सप्टेंबर २०२१ रोजी द्वितीय वर्षात इतिहास विषय स्पेशल घेतलेल्या विद्यार्थ्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत तृतीय वर्षातील विभागातील विद्यार्थ्याकडून द्वितीय वर्षातील विभागातील विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. या सभेत विद्यार्थ्यांना इतिहास विभागाच्या वार्षिक नियोजनाची रूपरेषा, अंमलबजावणी, ऑनलाईन परीक्षांची तयारी, तसेच विद्यापीठ ऑनलाईन परीक्षेबाबत विद्यार्थ्यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले.

**इतिहास विभागाची सभा -**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. इंद्रजित जाधव सर यांच्या अध्यक्षतेखाली इतिहास विभागातील प्राध्यापकांची सभा आयोजित करण्यात आली. या सभेमध्ये विभागाचे वार्षिक नियोजन सादर करून त्याच्या यशस्वी अंमलबजावणीच्या दृष्टीने चर्चा, विचारविनिमय करण्यात आला.

**तज्ञ साधन व्यक्तींचे मार्गदर्शन -**

इतिहास विभागातील विद्यार्थ्यांना अभ्यास पूरक म्हणून तज्ज्ञ साधन व्यक्तींची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. ती पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | वक्त्याचे नाव | विषय | दिनांक | उपस्थित विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | प्रा. डॉ. नाथा मोकाटे | शिवराज्याभिषेक दिन | ०६/०६/२०२१ | ४७ |
| २ | प्रा. डॉ. लहू गायकवाड | महात्मा गांधीजी यांची विचारधारा | ०२/१०/२०२१ | २९ |
| ३ | प्रा. डॉ. नाथा मोकाटे | मानवी हक्क दिन | १०/१२/२०२१ | ५५ |

**ट्यूटोरियल, सेमिनार -**

स्वयंअध्ययनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना लक्षात यावे तसेच विभागाच्या वार्षिक नियोजनाच्या अंमलबजावणीचा एक भाग म्हणून प्रथम व द्वितीय सत्रात ट्यूटोरियल व सेमिनारचे विद्यार्थ्यासाठी आयोजन करण्यात आले.

**अभ्यासक्रम पूर्तता -**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये कोरोना महामारीच्या प्रादुर्भावामुळे तसेच शासनाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घालून दिलेल्या निर्देशानुसार निर्बंधानुसार ऑनलाईन पद्धतीने

लेक्चर घेण्यात आले. गुगल मीट, झूम ॲप या ॲपच्या माध्यमातून लेक्चर घेऊन अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आला.

**संशोधन प्रकल्प**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाने ठरवून दिलेल्या इतिहासाची तोंडओळख या इतिहास स्पेशल पेपर ३ अंतर्गत स्थानिक इतिहास लेखनावर आधारित तृतीय वर्षातील इतिहास विभागातील विद्यार्थ्यांनी आपल्या गावचे इतिहास लेखन करण्यासाठी संशोधन करून संशोधन प्रकल्प पूर्ण केले.

**विद्यार्थ्यांचे विशेष उपक्रम -**

इतिहास विभागातील विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेटी अंतर्गत घोडेगाव येथील श्री. हरिश्चंद्र मंदिर या देवस्थानाची पाहणी करून त्यावर आधारित अहवाल सादर केले. तसेच औद्योगिक भेटी अंतर्गत परिसरातील उद्योगसमूहांना भेटी देऊन त्यावर आधारित अहवाल लिहून जमा केले.

**अभ्यास सहल -**

निरीक्षण व अनुभवातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी या हेतूने इतिहास विभागाच्या वतीने दिनांक १३/०३/२०२२ रोजी घोडेगाव या ठिकाणी अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या अभ्यास सहलीमध्ये घोडेगाव परिसरातील सर्व मंदिरे, जुन्या ऐतिहासिक वास्तू यांना भेटी देण्यात आल्या. या अभ्यास सहलीत इतिहास विभागातील एकूण १६ विद्यार्थी सहभागी झाले होते.

**विविध उपक्रमातील विद्यार्थ्यांचा सहभाग -**

इतिहास विभागातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा विभाग तसेच सांस्कृतिक विभाग या सर्व विभागांमार्फत आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांमध्ये, स्पर्धामध्ये सहभाग घेतला.

**प्राध्यापकांचा विविध शैक्षणिक उपक्रमांमधील सहभाग -**

इतिहास विभागातील प्राध्यापकांनी विविध महाविद्यालये, संस्था यांनी आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये ऑनलाईन सहभाग घेतला. तसेच ऑनलाईन प्रश्नमंजुषा, फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम इत्यादी उपक्रमांमध्ये सहभाग घेतला.

वरीलप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये इतिहास विभागाने विद्यार्थी पूरक विविध उपक्रम राबविले. त्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. इंद्रजित जाधव सर इतिहास विभागातील सहाय्यक प्राध्यापिका डॉ. चांगुणा कदम यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

## राज्यशास्त्र विभाग

**प्रास्ताविक**

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये राज्यशास्त्र विभागाने वार्षिक नियोजन करून त्याची अंमलबजावणी करण्याचे काम केले आहे. केलेल्या कामाचा वार्षिक अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

**विभागाची स्थापना -**

महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष १९९४-१९९५ मध्ये राज्यशास्त्र विभागाची स्थापना करण्यात आली आहे.

**विभागाची विद्यार्थी संख्या**

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये राज्यशास्त्र विभागात प्रवेशित विद्यार्थी संख्या पुढीलप्रमाणे :

| अ.क्र. | वर्ग | मुली | मुले | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | एस.वाय.बी.ए. | ०५ | ०७ | १२ |
| २ | टी.वाय.बी.ए. | ०७ | ०५ | १२ |

**विभागाचा कार्यभार**

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये विभागाचा कार्यभार २८ अनुदानित तास आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये राज्यशास्त्र विभागाने खालील कार्यक्रमाचे आयोजन केले होते

**राज्यशास्त्र विभागाच्या वतीने राज्यस्तरीय वेबिनारचे आयोजन**

राज्यशास्त्र विभागाच्या वतीने एकदिवसीय राज्यस्तरीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक १३ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १.२० या वेळेत या वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. व्दितीय वर्ष कला राज्यशास्त्र विशेष विषय घेतलेल्या तसेच व्दितीय वर्षासाठी राज्यशास्त्र विषयात नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या राजकीय पत्रकारिता आणि सोशल मिडीया या विषयावर या वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते.

या वेबिनारचे दोन सत्रात आयोजन करण्यात आले होते. या वेबिनारचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर यांनी केले. त्याचप्रमाणे आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. अजितशेठ दत्तात्रय काळे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. पहिल्या सत्रामध्ये संगमनेर येथील मालपाणी महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. सुवर्णा बेनके मॅडम यांनी राजकीय पत्रकारिता स्वरूप व संधी या विषयावर तर दुसऱ्या सत्रामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील राज्यशास्त्राचे प्रा. श्रीरंजन आवटे यांनी राजकीय पत्रकारिता आणि सोशल मिडीया या विषयावर व्याख्यान दिले.

बी.डी.काळे महाविद्यालयाचे प्राचार्य व राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. इंद्रजित जाधव यानी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक प्रा. सचिन घायतडके यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. चांगुणा कदम यांनी केले तर आभार प्रा. सुनिल नेवकर यांनी मानले. या वेबिनारसाठी झूम ॲपच्या माध्यमातून ९५ विद्यार्थी व प्राध्यापक व यूट्यूब च्या माध्यमातून २३० विद्यार्थी व प्राध्यापक यांनी ऑनलाईन सहभाग घेतला.

**महिला दिनानिमित्त प्रश्नमंजूषेचे आयोजन -**

राज्यशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ०८ मार्च २०२१ रोजी महिला दिनानिमित्त प्रश्नमंजूषेचे आयोजन करण्यात आले होते.

जागतिक महिला दिनानिमित्त जनजागृती व्हावी व महिलांना समानतेची संधी मिळावी या हेतूने या प्रश्नमंजूषेचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रश्नमंजूषेचे आयोजन गुगल फॉर्मच्या माध्यमातून करण्यात आले होते. एकूण ११० विद्यार्थ्यांनी या प्रश्नमंजूषेत सहभाग घेतला होता.

| अ.क्र. | प्राध्यापकाचे नाव | दिनांक | स्तर | आयोजक महाविद्यालय | पेपरवाचन सहभाग |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रा.नेवकर एस.एल. | १३ फेब्रु.२०२१ | राज्यस्तरीय | बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव | आयोजन व ऑफलाईन सहभाग |
| २ | प्रा.घायतडके एस.एस. | जुलै २०२१ | राष्ट्रीय स्तर | यशवंतराव चव्हाण कॉलेज, आंबेजोगाई | पेपर वाचन व ऑनलाईन सहभाग |

राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्राचार्य डॉ.आय.बी. जाधव, सहाय्यक प्राध्यापक एस.एल. नेवकर व प्रा.एस.एस. घायतडके यांनी विविध ठिकाणच्या आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय व विद्यापीठ स्तरीय वेबिनार, कार्यशाळा यामध्ये ऑनलाईन सहभाग घेतला.

वरील प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१चा वार्षिक अहवाल आहे.

## शैक्षणिक वर्ष २०२१-२२

शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये राज्यशास्त्र विभागाने वार्षिक नियोजन करून त्यानी अंमलबजावणी करण्याचे काम केले आहे. केलेल्या कामाचा वार्षिक अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

**विभागाची स्थापना**

महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष १९९४-१९९५ मध्ये राज्यशास्त्र विभागाची स्थापना करण्यात आली आहे.

**विभागाची विद्यार्थी संख्या**

शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये राज्यशास्त्र विभागात प्रवेशित विद्यार्थी संख्या पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | वर्ग | मुली | मुले | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | एस.वाय.बी.ए. | १६ | १२ | २८ |
| २ | टी.वाय.बी.ए. | ०४ | ०६ | १० |

**मतदार नोंदणी अभियानांतर्गत मतदार नोंदणी कॅम्प -**

राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक २२ नोव्हेंबर २०२१ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी मतदान नोंदणी अभियानांतर्गत मतदार नोंदणी कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पचे उद्घाटन आंबेगाव तालुक्याच्या तहसीलदार मा. रमा जोशी यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. इंद्रजित जाधव, नोडल अधिकारी प्रा. एस.एल.नेवकर, तलाठी राहुल पंदारे, महसूल कर्मचारी माऊली घोडेकर उपस्थित होते.

एकूण १५० विद्यार्थ्यांनी मतदार नाव नोंदणी अंतर्गत नमुना-६ अर्ज भरून दिले, तसेच महाविद्यालयाच्या परिसरामध्ये विद्यार्थ्यांनी जागर करोना मुक्तीचा आणि मतदान जागृती या विषयावर पथनाट्य सादर केले. लोकशाहीमध्ये मतदानाला महत्त्व आहे. मतदान करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे विद्यार्थ्यांनी मतदार नावनोंदणी करून आपला मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन तहसीलदार रमा जोशी यांनी केले.

**संविधान दिनाचे आयोजन -**

बी.डी.काळे महाविद्यालय घोडेगाव येथील राज्यशास्त्र विभाग आणि युगप्रवर्तक प्रतिष्ठान, घोडेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ रोजी हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य व राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. इंद्रजीत जाधव यांनी केले. याप्रसंगी सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते संविधान प्रतीचे पूजन करण्यात आले तसेच संविधानातील उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन प्रा. सुनील नेवकर यानी केले. उपस्थित मान्यवरांमध्ये मा. श्री. गौतम खरात अध्यक्ष युग प्रवर्तक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ॲड. संजय आर्वीकर, चेअरमन महाविद्यालय विकास समिती यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मा. आकाश पाटील जळगाव यांनी आपल्या मनोगतातून भारतीय संविधानाविषयी उपयुक्त अशी माहिती दिली. तसेच या वेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आंबेगाव तालुक्याचे गटविकास अधिकारी श्री. जालिंदर पठारे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाप्रसंगी श्री. अजितशेठ काळे चेअरमन, न्यू इंग्लिश स्कूल तसेच संस्थेचे संचालक शिवदास काळे, नायब तहसीलदार दामू राजे असवले, मंडल अधिकारी विश्वास शिंदे हे मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य आणि राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. इंद्रजीत जाधव, राज्यशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक श्री. सुनील नेवकर, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कार्यालयीन अधीक्षक, सेवक, सर्व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी संविधान या विषयावर सामान्यज्ञान चाचणी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेसाठी एकूण ३०० विद्यार्थी उपस्थित होते. तसेच राज्यघटना निर्मितीमध्ये ज्या महिलांनी सहभाग घेतला होता, त्यांच्याबद्दल माहिती देणाऱ्या भित्तीपत्रकाचे अनावरण प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. बोऱ्हाडे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राज्यशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक सचिन घायतडके यांनी केले.

**मानवी हक्क दिनाचे आयोजन :**

राज्यशास्त्र विभागाच्या वतीने १० डिसेंबर २०२१ हा दिवस 'मानवी हक्क दिन' म्हणून साजरा करण्यात आला. मानवी हक्क दिनानिमित्त महाविद्यालयातील इतिहास विभागाचे विभागप्रमुख डॉ. नाथा मोकाटे यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना मानवी हक्कांची तोंडओळख व्हावी आणि मानवी हक्काविषयी माहिती व्हावी हा उद्देश या कार्यक्रमामागे होता.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य व राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. इंद्रजित जाधव यांनी केले. त्यानंतर प्रमुख वक्ते डॉ. नाथा मोकाटे यांनी मानवी हक्कांवर आपले विचार व्यक्त केले. मानवी हक्कांचा जाहीरनामा, व्यक्तीचे नैसर्गिक हक्क अशा अनेक मुद्यांवर त्यांनी आपले विचार मांडले.

या कार्यक्रमाप्रसंगी इंग्रजी विभागाचे विभागप्रमुख तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. वल्लभ करंदीकर, अर्थशास्त्र विभागातील डॉ. माणिक बोऱ्हाडे, प्रा. प्रवीण पारधी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.



*जगात एकच गोष्ट निर्भेळ, चांगली आहे ती म्हणजे ज्ञान आणि एकच गोष्ट केवळ अनिष्ट ती म्हणजे अज्ञान.*

यावेळी राज्यशास्त्र विभागातील प्राध्यापक सुनील नेवकर यांनी मानवी हक्कांविषयी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभागातील कु. पूर्वा घोडेकर या विद्यार्थिनीने केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. सचिन घायतडके यांनी केले.

**राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन -**

राज्यशास्त्र विभागाच्या वतीने २५ जानेवारी २०२२ हा दिवस 'राष्ट्रीय मतदार दिवस' म्हणून साजरा करण्यात आला. राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात मतदार शपथ, मतदार जनजागृती प्रश्नमंजूषा आयोजित करण्यात आली होती.

महाविद्यालयाचे प्राचार्य आणि राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. इंद्रजित जाधव यांनी या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले व भारतीय लोकशाहीतील मतदानाचे महत्त्व सांगितले. राज्यशास्त्र विभागातील सहाय्यक प्रा. सुनील नेवकर यांनी शपथ घेऊन मतदानाचे महत्त्व विशद केले. या प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी आणि प्राध्यापक वृंद यांच्यासाठी राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने मतदार जनजागृती प्रश्नमंजूषा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली. प्रा. सचिन घायतडके यांनी या प्रश्नमंजूषेचे नियोजन केले होते. या प्रश्नमंजूषेला महाविद्यालयातील २०० विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आय.बी.जाधव यांचे मोलाचे सहकार्य लाभले. राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रोफेसर डॉ. बाळासाहेब गव्हाळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. वल्लभ करंदीकर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्राध्यापकांचा वेबिनार, कार्यशाळा मधील ऑनलाईन सहभाग :**

| अ.क्र. | प्राध्यापकाचे नाव | दिनांक | स्तर | आयोजक महाविद्यालय | पेपरवाचन सहभाग |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्राचार्य डॉ.जाधव आय.बी. | २२/०९/२०२१ | राज्यस्तरीय | बी.डी.काळे महाविद्यालय,घोडेगाव | सहभाग |
| २ | प्राचार्य डॉ.जाधव आय.बी. | १८/१०/२०२१ | राष्ट्रीयस्तर | बी.डी.काळे महाविद्यालय,घोडेगाव | सहभाग |
| ३ | प्रा.सुनील नेवकर | २२/०९/२०२१ | राज्यस्तरीय | बी.डी.काळे महाविद्यालय,घोडेगाव | सहभाग |
| ४ | प्रा.सुनील नेवकर | १८/१०/२०२१ | राष्ट्रीयस्तर | बी.डी.काळे महाविद्यालय,घोडेगाव | सहभाग |
| ५ | प्रा.सुनील नेवकर | १२/०३/२०२२ | राष्ट्रीयस्तर | बी.डी.काळे महाविद्यालय,घोडेगाव | सहभाग |
| ६ | प्रा.सचिन घायतडके | २२/०९/२०२१ | राज्यस्तरीय | बी.डी.काळे महाविद्यालय,घोडेगाव | सहभाग |
| ७ | प्रा.सचिन घायतडके | १८/१०/२०२१ | राष्ट्रीयस्तर | बी.डी.काळे महाविद्यालय,घोडेगाव | सहभाग |
| ८ | प्रा.सचिन घायतडके | ०७/१२/२०२१ | राष्ट्रीयस्तर | महिला कला महाविद्यालय,उमरेड | सहभाग |
| ९ | प्रा.सचिन घायतडके | २७/०१/२०२२ | राष्ट्रीयस्तर | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सहभाग |
| १० | प्रा.सचिन घायतडके | २६/०३/२०२२ | राष्ट्रीयस्तर | लोकसंवाद फाऊंडेशन, औरंगाबाद | पेपरवाचन व सहभाग |

राज्यशास्त्र विभागप्रमुख प्राचार्य डॉ.आय.बी.जाधव, सहाय्यक प्राध्यापक एस.एल.नेवकर व प्रा.एस.एस.घायतडके यांनी विविध ठिकाणच्या आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय व विद्यापीठ स्तरीय वेबिनार, कार्यशाळा यांमध्ये ऑनलाईन सहभाग घेतला. वरील प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चा वार्षिक अहवाल आहे.

# मराठी विभाग

महाविद्यालयातील मराठी विभाग ऑगस्ट १९९३ मध्ये सुरू झालेला आहे. विभागामध्ये पदवी व पदव्युत्तर असे दोन विभाग कार्यरत आहेत. त्यांची वर्गनिहाय विद्यार्थी संख्या पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | वर्ग | मुली | मुले | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | द्वितीय वर्ष, कला | १३ | ०७ | २० |
| २. | तृतीय वर्ष, कला | ०८ | ०७ | १५ |
| ३. | एम.ए.भाग १ | ०८ | ०५ | १३ |
| ४. | एम.ए.भाग २ | ०६ | ०५ | ११ |
| | | | एकूण | ५९ |

**मराठी विभागाने राबविलेले उपक्रम खालीलप्रमाणे**

**१) विद्यार्थी सभा :**

मराठी विभागातील विद्यार्थ्यांची सभा दि. ०१/०८/२०२१ रोजी आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी विभागप्रमुख प्रोफेसर डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर यांनी मार्गदर्शन केले. विभागातील सहा.प्राध्यापक डॉ.पुरुषोत्तम काळे, पोपट माने इ. उपस्थित होते.

**२) राष्ट्रीय वेबिनार :**

मराठी विभागाच्या वतीने १८ ऑक्टोबर २०२१ रोजी बदलते 'आदिवासी समाजजीवन आणि आदिवासी साहित्य' या विषयावर राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. या वेबिनारचे उद्‌घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा.डॉ.विलास उगले यांनी केले. याप्रसंगी अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय, वसईरोडयेथील प्रा.डॉ.सखाराम डाखोरे यांनी 'आदिवासी कवितेतील बदलत्या जाणिवा' या विषयावर विचार मांडले. २०० विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते.

**३) ऑनलाईन कवी संमेलन :**

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने निमंत्रित कवींच्या ऑनलाईन कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. या काव्यसंमेलनात मा.बाबाराव मडावी (यवतमाळ), मा.उषाकिरण आत्राम (गोंदिया), मा.डॉ.संतोष पवार (श्रीरामपूर), मा.संतोष पावरा (शहादा), डॉ.दिलीप कसबे (चाकण), डॉ.गणेश सोनवणे (पाबळ), मा.प्रशांत वाघ (येवला), मा. भाऊसाहेब थोरात (घोडेगाव), डॉ.जयसिंग गाडेकर (आळे), मा.समाधान गायकवाड (सोलापूर), मा.स्नेहल सोनटक्के (सोलापूर), मा.मनोहर मोहरे (फुलवडे), मा.संतोष केंगले (जांभोरी), डॉ.प्रभाकर मोकळ (घोडेगाव), मा.शितल बोऱ्हाडे (खेड), डॉ.शिवाजी गायकवाड (उस्मानाबाद), डॉ.विजयकुमार भवारी (पुणे), निसर्गकवी नितीन सावळे (नाशिक) इ. महाराष्ट्रातील नामवंत कवी सहभागी झाले होते. १०० विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते.

**४) लेखक आपल्या भेटीला-ऑनलाईन व्याख्यान :**

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने सोमवार दि. २४ जानेवारी २०२२ रोजी 'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रथम वर्ष कला या वर्गाच्या मराठी विषयाच्या बाजा या कथेच्या लेखिका, महाराष्ट्रातील ख्यातनाम आदिवासी कवयित्री मा.उषाकिरण आत्राम यांच्या ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. १०० विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते.

**५) लेखक आपल्या भेटीला-ऑनलाईन व्याख्यान :**

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने सोमवार दि. २८ फेब्रुवारी २०२२ रोजी 'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत ज्येष्ठ आदिवासी साहित्यिक कथाकार, कादंबरीकार, समीक्षक, आकांतकार मा.बाबाराव मडावी, यवतमाळ यांचे 'कथा, आत्मकथन आणि कादंबरीची निर्मिती प्रक्रिया' या विषयावर गुगलमीटवर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. १०० विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते.

यावर्षी घेण्यात आलेल्या राज्य आणि राष्ट्रीय प्राध्यापक पात्रता परीक्षेत मराठी विभागामध्ये पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेतलेले श्री.नितीन रणजित बटुळे याने सेट तर श्री चंद्रकांत भवारी याने नेट परीक्षेत यश प्राप्त केले आहे. संस्था, महाविद्यालय, मराठी विभाग व शिक्षकांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

**शोधनिबंध विषयक कार्य : प्रोफेसर डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर, उपप्राचार्य, मराठी विभागप्रमुख**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | उषाकिरण आत्राम यांच्या म्होरकी मधील काही लक्षवेधक कविता | Sanskruti International Multidisciplinary Research Journal Vol. VI Issue-I IFSIJ Impact Factor : | E ISSN 2455-1511 | July to Sept. 2020 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 5.565 URL:www.simrj.org.in Journal UOI : 1.01/simrj Indexed, Peer-Reviewed International Journal | | |
| २ | कवी सुनील कुमरे यांच्या काही लक्ष्यवेधक कविता | Shabdsanchay Issue - II, Vol. - I Editor-Prof.Ganesh Sanoji Painganga Prakashan, Mehkar Pages - 77-82 | 978-81-947409-0-2 | January-to Feb. 2021 |
| ३ | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान | तिफण, वर्ष १२ वे अंक दुसरा, जुलै ते सप्टेंबर २०२१ UGC Care Listed Journal, Pages-29-34. | 2331-573X | जुलै ते सप्टेंबर २०२१ |
| ४ | डॉ. कुंडलिक केदारी यांची मुलाखत, पु. ४५९ ते४६६ | आदिवासी साहित्य : संकल्पना, स्वरूपव वाटचाल संपा, प्राचार्य डॉ. शिवालिंग मेनकुदळे, आविष्कार पब्लिकेशन, तळेगाव दाभाडे, पुणे | 978-81-948864-6-4 | प्र. आ.०५ सप्टें. २०२१ |
| ५ | आदिवासी आत्मकथनांची वाटचाल | फडकी, वर्ष १४ वे, अंक १० वा. संपा. श्री. मारूती आढळ | 2319-6033 | १५ सप्टें. २०२१ |
| ६ | आदिवासी कविता आणि कादंबरी पृ. ४०३ ते ४१४ | परिवर्तनवादी साहित्य : संकल्पना आणि स्वरूप, संपा. डॉ. रामकिशन दहिफळे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद (डॉ. वासुदेव मुलाटे गौरवग्रंथ) | 978-81-949714-8-1 | प्र.आ.०१ नोव्हें. २०२१ |

विभागाचे कामकाज करताना संस्थाचालक, प्राचार्य, सहकारी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सेवक, विभागाचे विद्यार्थी इ. सर्वांचे मोलाचे सहकार्य मिळाल्यामुळे विभाग लौकिकास पात्र ठरला आहे.

## वाणिज्य विभाग

### शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१

**वाणिज्य विभागाची सभा :**

वाणिज्य विभागातील नियोजित सभा मा. प्राचार्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ८/१२/२०२१ रोजी ठिक ११.०० वाजता घेण्यात आली. या सभेमध्ये विद्यार्थी प्रवेश, मागील वर्षाचा निकाल, विषयवार अभ्यासक्रम नियोजन, विषय वाटप इत्यादी विषयावर चर्चा करून निर्णय घेण्यात आला.

**प्रशिक्षण कार्यक्रम :**

दिनांक ६-१०-२०२१ रोजी नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मा. प्राचार्य डॉ. इंद्रजित जाधव यांनी Online पध्दतीने मार्गदर्शन केले. यामध्ये एकूण ५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

**व्यावसायिक कोर्स मार्गदर्शन :**

दिनांक ११ जानेवारी २०२१ रोजी ॲन अकादमी पुणे मार्फत वाणिज्य विभागातील सर्व विद्यार्थ्यांना C.A. ICMA, C.S. या व्यावसायिक कोर्स, अभ्यासक्रम प्रवेश या विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

**Online बँकिंग विषयी मार्गदर्शन :**

दि.१० जुलै २०२१ रोजी Online बँकिंग व इतर आर्थिक पध्दती या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. H.D.F.C. बँकेचे व्यवस्थापक श्री.जोशी साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**शुध्दलेखन कार्यशाळा :**

दिनांक १० जुलै २०२१ रोजी वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांना प्रा. माने. पी. एम. मराठी विभाग घोडेगाव यांनी Online पध्दतीने मराठी शुध्द लेखन, नियम, लेखनपध्दती या विषयी मार्गदर्शन केले.

**रिझ्युम तयार करणे :**

वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांना How To Prepare Resume या विषयावर दिनांक २७/०७/२०२१ रोजी Seven Academy मार्फत श्री. पवन कुमार यांनी Online पध्दतीने मार्गदर्शन केले.

**वाणिज्य विभाग सभा :**

दिनांक ८/२/२०२१ रोजी मा. प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली सभा आयोजित करण्यात आली. यामध्ये प्रात्यक्षिक, परिक्षा, त्यांचे नियोजन, अभ्यासक्रम इ. विषयावर चर्चा करण्यात आली.

**संशोधन कार्य :**

वाणिज्य विभागातील सर्व सहकारी प्राध्यापकांनी या शैक्षणिक वर्षामध्ये एकूण ०८ संशोधन पेपर विविध विषयावर लिहून ते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिध्द केले.

